



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, बुधवार १८ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# भारत-फ्रान्स संबंधांना ‘स्पेशल ग्लोबल स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप’चा दर्जा

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची घोषणा



**मुंबई/प्रतिनिधी :** बदलत्या जागतिक परिस्थितीत भारत आणि फ्रान्स या दोन्ही देशांनी जागतिक स्थैर्य, समृद्धी आणि नियमाधिष्ठीत व्यवस्थेला बळकटी देण्याचा संकल्प करत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारत-फ्रान्स संबंधांना ‘स्पेशल ग्लोबल स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप’चा नवा दर्जा देण्यात येत असल्याची घोषणा केली. फ्रान्स प्रजासत्ताकचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांच्या मुंबई भेटीदरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मॅक्रॉन यांच्यात लोकभवन येथे बैठक झाली. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना दोन्ही नेत्यांनी या द्विपक्षीय सहकार्याला नव्या उंचीवर नेण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी त्यांच्या हस्ते भारतामध्ये एअरबस एच१२५ हेलिकॉप्टरसाठी टाटा अॅडव्हान्स्ड सिस्टिम्सच्या असेंब्ली लाईनचे दूरदृष्यप्रणालीद्वारे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी परराष्ट्र व्यवहार मंत्री एस.जयशंकर यांच्यासह दोन्ही देशांचे शिष्टमंडळ उपस्थित होते.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले की, भारत आणि फ्रान्सचे संबंध विश्वासावर आधारित आहेत. फ्रान्स हा भारताच्या सर्वात जुन्या धोरणात्मक भागीदारांपैकी एक असून राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांच्या नेतृत्वाखाली या भागीदारीला अभूतपूर्व गती आणि उर्जा मिळाली आहे. आजच्या अस्थिर जागतिक परिस्थितीत ही भागीदारी केवळ धोरणात्मक नसून जागतिक स्थैर्य आणि प्रगतीसाठीची भागीदारी ठरेल, असे त्यांनी यावेळी नमूद केले. हेलिकाप्टर असेंब्ली लाईनचे उद्घाटन हे परस्पर विश्वासाचे प्रतीक असल्याचे प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितले. फ्रान्सच्या सहकार्याने माऊंट एव्हरेस्टच्या उंचीपर्यंत उड्डाण करू शकणारे एकमेव हेलिकाप्टर भारतात तयार होणार असून ते जागतिक बाजारपेठेत निर्यातही केले जाणार आहे. त्यामुळे दोन्ही देशांच्या भागीदारीमध्ये खोल समुद्रापासून पासून उंच पर्वतापर्यंत पोहोचण्याची क्षमता असल्याचे ते म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०२६ हे वर्ष भारत-युरोप संबंधांसाठी निर्णायक ठरणार असल्याचे सांगितले. अलीकडेच यूरोपियन यूनियनसोबत झालेल्या मुक्त व्यापार करारामुळे भारत-फ्रान्स व्यापार संबंधांनाही मोठी चालना मिळणार आहे. इंडिया फ्रान्स इयर्स ऑफ इनोव्हेशन उपक्रमांतर्गत संरक्षण, स्वच्छ उर्जा, अवकाश आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रात उद्योग, स्टार्टअप्स, एमएसएमई, विद्यार्थी आणि संशोधक यांच्यासाठी संयुक्त इनोव्हेशन सेंटर्स स्थापन करण्याचाही निर्णय घेण्यात आला असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितले.

# हिंदूंनी 3 मुले जन्माला घालावी -भागवत

**लखनौ/वृत्तसंस्था :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (डच्च) सरसंघचालक मोहन भागवत मंगळवारी लखनउमध्ये म्हणाले की, भारतात राहणारे मुस्लिमही हिंदूच आहेत, ते काही अरबमधून आलेले नाहीत. त्यांचीही घरवापसी करायची आहे. पण हे काम हळूहळू होईल.संघप्रमुखांनी हिंदूंमधील घटत्या लोकसंख्या दरावर सांगितले की, एका कुटुंबात किमान तीन मुले असावीत. सध्या लोकसंख्या दर २.१ आहे. तो किमान ३ असावा. आता जे कोणी मुले लग्न करत आहेत, त्यांना सांगा की त्यांनी किमान तीन मुले जन्माला घालावीत.

जर एखादी व्यक्ती खड्ड्यात पडली असेल तर तिला बाहेर येण्यासाठी हात द्यावा लागेल आणि बाहेर उभ्या असलेल्या व्यक्तीला तिला बाहेर काढण्यासाठी थोडे वाकून हात पुढे करावा लागेल, जेव्हा दोघेही हात पुढे करतील तेव्हाच गोष्ट बनेल. भागवत यांनी समाजाला जातींमध्ये विभागण्यावर आणि विभागले जाण्यावर चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, आपल्याला जातीच्या भानगडीत पडायचे नाही. ही जात अशी गोष्ट आहे, जी आपण अनेक दशकांपासून संपवण्याचा प्रयत्न करत आहोत, पण ही जात काही जात नाहीये.भागवत १७ आणि १८ फेब्रुवारी रोजी लखनउ दौ-यावर आहेत. पहिल्या दिवशी निराला नगर येथील सरस्वती शिशू मंदिरच्या सभागृहात सामाजिक सलोखा बैठकीत त्यांनी सहभाग घेतला. सुमारे अडीच तास चाललेल्या बैठकीत मोहन भागवत यांनी सामाजिक सलोख्याशी संबंधित विषयांवर बैठकीत सहभागी झालेल्या समाजातील विविध स्तरांतील लोकांना उत्तरे दिली. मोहन भागवत म्हणाले की, छत्र्क संदर्भात एका गटाला वाटते की हे आपल्या विरोधात आहे. दुस-या गटाला वाटते की ते आपल्या बाजूने आहे. सरकार नियम बनवते. जर कोणाला ते चांगले वाटत नसेल, तर त्यांनी आपली बाजू मांडली पाहिजे. हे प्रकरण सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. सरकार जो काही कायदा करेल, त्याचे पालन केले पाहिजे. ५०० वर्षे मुघल आणि २०० वर्षे इंग्रजांनी राज्य केले आणि ते निघून गेले, पण हिंदू धर्म संस्कृती इतकी मजबूत आहे की ते तिला मिटवू शकले नाहीत. इतक्या वर्षांत हिंदू धर्माचे कोणी काहीही बिघडवू शकले नाही, तर आता कोण काय बिघडवू शकेल? भारतात राहणारे मुस्लिम देखील हिंदूच आहेत, ते काही अरबमधून आलेले नाहीत. त्यांचीही घरवापसी करायची आहे. पण हे काम हळूहळू होईल. बैठकीत विचारण्यात आलेला प्रश्न: डच्च ने मुस्लिम मंच का बनवला? मोहन भागवत म्हणाले, मुस्लिमही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडले जाउ इच्छितात. त्यांच्याच लोकांनी हा मंच बनवला आहे.



**मोहन भागवत यांनी कुटुंबांना हिंदू परंपरांशी जोडले-** अवधचे प्रांत प्रचार प्रमुख डॉ. अशोक दुबे यांनी सांगितले की, मंगळवारी कुटुंबांना हिंदीमध्ये स्वाक्षरी करणे, धोतर परिधान करणे, देशी भोजन करणे, परदेशात जाण्यापूर्वी आपल्या देशात भ्रमण करणे, आपल्या घरासमोर तुळशीचे रोप आणि पताका लावणे आणि वेलकमऐवजी स्वागतम लिहिणे यांसारख्या परंपरा स्वीकारण्याची व त्यांना प्रोत्साहन देण्याची प्रेरणा देण्यात आली. सामाजिक सलोखा बैठकीत असे सांगण्यात आले की भारतात सनातन धर्माशी संबंधित अनेक प्रवाह आहेत, परंतु त्यांचा मूळ आधार समान आहे. विविध मते आणि पंथांच्या मूलभूत समस्या सारख्याच आहेत असे ते म्हणाले.

# फ्लाइट रेकॉर्डरचे आगीमुळे नुकसान

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** अजित पवारांच्या बारामती येथे २८ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या लियरजेट ४५ विमान व्हीटी-एसएसके च्या अपघाताची सविस्तर चौकशी विमान अपघात तपास संस्था करत असून ही चौकशी विमान (अपघात आणि घटनांचा तपास) नियम, २०१७ आणि आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतूक संघटनेच्या (आयसीएओ) परिशिष्ट १३ मधील आंतरराष्ट्रीय मानके आणि शिफारस केलेल्या पद्धतींनुसार काटेकोरपणे केली जात आहे.या विमानात दोन स्वतंत्र फलाइट रेकॉर्डर बसविण्यात आले होते. अपघाताच्या वेळी हे दोन्ही रेकॉर्डर दीर्घकाळ तीव्र उष्णतेच्या संपर्कात आले आणि आगीमुळे त्यांचे नुकसान झाले. एल३- कम्युनिकेशन्स यांनी तयार केलेला डिजिटल फलाइट डेटा रेकॉर्डर, विमान अपघात तपास संस्थेच्या प्रयोगशाळेत यशस्वीरीत्या डाऊनलोड करण्यात आला. तर हनीवेल कंपनीने तयार केलेल्या कॉकपीट व्हॉइस रेकॉर्डरची सध्या विस्तृत तांत्रिक तपासणी सुरु आहे. डेटा पुनर्प्राप्तीसाठी विशेष तांत्रिक सहाय्य मिळविण्यासाठी उत्पादन करणा-या देशाच्या मान्यताप्राप्त प्रतिनिधीकडून मदत मागविण्यात आली आहे.ही चौकशी समावेशी, वस्तुनिष्ठ आणि पुराव्यांवर आधारित व्हावी यासाठी विमान अपघात तपास संस्था सर्व विहित तांत्रिक आणि प्रक्रियात्मक प्रोटोकालचे पालन करत आहे. संपूर्ण पारदर्शकतेसाठी संस्थेची वचनबद्धता कायम असून चौकशी दरम्यान योग्य वेळी पुढील माहिती सामायिक केली जाईल. विमान अपघात तपास संस्थेने सर्व संबंधित घटकांना कोणत्याही प्रकारचे तर्कवितर्क टाळावेत आणि प्रस्थापित कार्यपद्धतीनुसार चौकशी प्रक्रिया सुरळीतपणे पार पडू द्यावी अशी विनंती केली आहे.



# गडबड करणा-यांवर कठोर कारवाई होणार

## ● मुख्यमंत्र्यांचा सज्जड दम ● अल्पसंख्यांक दर्जा घोटाळा ● उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे चौकशीचे आदेश

**मुंबई/प्रतिनिधी :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर काही तासांतच जवळपास २० संस्थांच्या ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा देण्याचा निर्णय घेतल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. या वादग्रस्त निर्णयाचे गांभीर्य लक्षात घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निर्णयाला स्थगिती दिली होती. या प्रकरणी ज्यांनी कोणी गडबड केली आहे त्यांच्यावर कारवाई होईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनीही या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर काही तासांतच जवळपास २० संस्थांच्या ७५ शाळांना अल्पसंख्यांक दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. अधिका-यांच्या या असंवेदनशील निर्णयाने चोहोबाजूंनी त्यावर टिका झाली. माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या कार्यकाळात त्यांनी या फाईल्सना स्थगिती दिली होती. नंतर हे खाते अजितदादांकडे आले. हे प्रकरण प्रलंबितच होते. पण अजितदादांच्या दुर्दैवी मृत्यूच्या दिवशीच काही तासांच्या आतच ही प्रमाणपत्रे देण्यात आली. अजितदादांच्या निधनादिवशीच ६ शाळांना हे प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. अजितदादांच्या निधनाचा शोक संपूर्ण राज्यात निर्माण झाला होता. हे खातेही त्यांच्याकडे होते. नेमक्या त्याच दिवशी हे प्रमाणपत्र देण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत तातडीने या निर्णयाला स्थगिती दिली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनीही या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. आता या प्रकरणी कोणी गडबड केली आहे त्यांच्यावर कारवाई करण्याचा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.



# पंकजा मुंडेंनी स्वत:वरील गाण्यासाठी आनंद शिंदेंना कोट्यवधी दिले

**बीड/प्रतिनिधी :** भाजप नेत्या तथा मंत्री पंकजा मुंडे यांनी बीडमध्ये महापशुधन एक्सो कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्याचं लक्ष वेधलं होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक दिग्गजांनी येथील प्रदर्शनाला भेट दिली, येथील भव्यता चर्चेचा विषय बनली होती. आता, या महापशुधन एक्स्पोच्या आयोजनावरु न करु णा शर्मांनी मंत्री पंकजा मुंडे यांना डिवचले. महापशुधन म्हणजे प्रपोगंडा करण्याचा प्रकार होता, त्याच्या मंडपासाठी तीन कोटी रु पये खर्च करण्यात आल्याचे करु णा शर्मा यांनी म्हटले. पंकजा मुंडे यांच्यावर गाणे म्हणण्यासाठी आनंद शिंदे यांना बोलवण्यात आलं होतं. पंकजा मुंडे यांचे गाणे म्हणण्यासाठी कोट्यवधी रु पये खर्च करण्यात आले. पशूंसाठी आम्ही ५० कोटी देणार आहोत हे सांगण्यासाठी ५ कोटी रु पये जाहिरातीसाठी आणि सांगण्यासाठी खर्च करण्यात आल्याच आरोप करु णा शर्मा यांनी केला आहे. बीडमध्ये जागोजागी जनावरांना कचरा खाउन जगावे लागत आहे, त्यांना चारा नाही पाणी नाही ते नालीतलं पाणी पिउन जगत आहेत. सत्ता आणि पावर असलेले लोक जनतेचा पैसा खर्च करत आहेत. त्याच्यामुळे पंकजा मुंडेंवर मी एक गाणं तयार केले आहे, असे म्हणत करु णा शर्मांनी पंकजा मुंडेंवर घणाघाती टीका केली. अतिवृष्टीमध्ये शेतक-यांची झालेली नुकसान भरपाई द्यावी. सरकारने शेतक-यांना हेक्टरी २५,००० मदत देण्याची घोषणा केली होती. मात्र, तुम्ही हेक्टरी २००० रु पयेच दिले, असे म्हणत करु णा शर्मा यांनी पंकजा मुंडेंवर गाणंही सादर केलं. पंकजाताई बाग नासवते रे बीजेपीच्या कमळाचा.. असे मिश्किल गाणे म्हणत त्यांनी पंकजा मुंडेवर टीका केली.



# नवी दिल्ली-चेन्नई एक्सप्रेसच्या डब्यात आग; सर्व प्रवासी सुरक्षित



**वर्धा/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात मंगळवारी दुपारी नवी दिल्लीहून चेन्नईकडे जाणा-या (गाडी क्रमांक १२६१६) नवी दिल्ली-चेन्नई ग्रँड ट्रंक एक्सप्रेसच्या एका डब्यात आग लागल्याची घटना घडली. ही घटना सिंधी आणि तुळजापूर स्थानकांदरम्यान घडली. रेल्वे प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, नवी दिल्ली–चेन्नई ग्रँड ट्रंक एक्सप्रेस आपल्या नियोजित मार्गावर धावत असताना सकाळी सुमारे ११ वाजता गाडीच्या शेवटच्या गार्ड डब्यातून धूर निघताना दिसला. धूर दिसताच खबरदारीचा उपाय म्हणून गाडी तात्काळ थांबवण्यात आली.

रेल्वे अधिका-यांनी सांगितले की, सर्व प्रवाशांना सुरक्षित ठिकाणी उतरवण्यात आले असून कोणतीही जीवितहानी झालेली नाही. रेल्वे कर्मचा-यांनी बाधित डबा गाडीपासून वेगळा केला. स्थानिक अग्निशमन दलालाही घटनास्थळी पाचारण करण्यात आले. प्रारंभी डब्यात उपलब्ध अग्निशामक यंत्रांच्या साहाय्याने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. रेल्वे अधिका-यांच्या माहितीनुसार, आग पूर्णपणे विझवण्याची प्रक्रिया सुरू आहे. बाधित डबा हटवल्यानंतर गाडी काही वेळाने आपल्या गंतव्यस्थानाकडे रवाना करण्यात येणार आहे. या घटनेची माहिती देताना मध्य रेल्वेचे प्रवक्ते संजय मुळे यांनी सांगितले की, गाडी नागपूरहून सुटल्यानंतर वर्ध्यातील सिंधी स्थानकाच्या दिशेने जात असताना धूर दिसून आला. बाधित डबा वेगळा करण्यात आला असून सविस्तर चौकशीनंतरच आगीचे नेमके कारण स्पष्ट होईल, असे त्यांनी नमूद केले.

# बारावी परीक्षेदरम्यान वाशिममध्ये सामूहिक कॉपी

## तब्बल 581 विद्यार्थ्यांवर एकाच वेळी कारवाई

**वाशिम/प्रतिनिधी :** वाशिम येथील मैनागिरी विद्यालयात बारावीच्या परीक्षेदरम्यान सामूहिक कॉपीचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी शिक्षण विभागाकडून तब्बल ५८१ विद्यार्थ्यांवर एकाच वेळी कारवाई करण्यात आली आहे. भौतिकशास्त्र विषयाच्या पेपर दरम्यान विद्यार्थ्यांकडून हा सामूहिक कॉपीचा प्रकार घडला आहे. प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय ससाणे यांच्या भरारी पथकाने अचानक धाड टाकत ही मोठी कारवाई केली आहे. दरम्यान, आतापर्यंतची जिल्ह्यातील ही सर्वांत मोठी कारवाई असल्याचे बोलले जात आहे. तर शिक्षण विभागाने कारवाई संदर्भातील अहवाल वाशिमच्या जिल्हाधिका-यांकडे पाठवला आहे. त्यामुळे आता या प्रकरणी केंद्र संचालक, सहाय्यक केंद्र संचालक आणि पर्यवेक्षकांसह ५० हून अधिक कर्मचा-यांवर कारवाई होण्याचे संकेत आहेत.वाशिम जिल्ह्यात बारावीच्या परीक्षेत कॉपी प्रकार घडल्याच्या सातत्याने घटना समोर आल्या आहेत. कॉपीबहाद्दर विद्यार्थ्यांवर कारवाई झाल्यानंतर आता थेट शिक्षकच कारवाईच्या रडारवर आले आहेत. वाशिम जिल्ह्यात विविध परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांकडून कॉपी होत असल्याचे प्रकार उघड झाल्यानंतर प्रशासनाने जबाबदारांवर कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे.जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी अमरावती येथील उपशिक्षण संचालकांना पत्र पाठवत ५ केंद्र संचालक, २ सहायक केंद्र संचालक आणि १४ पर्यवेक्षक अशा एकूण २१ कर्मचा-यांवर कारवाईची शिफारस केली आहे. बारावीच्या इंग्रजीच्या पहिल्या पेपरपासून क?पीमुक्त अभियान अंतर्गत भरारी पथकांनी धाडी टाकताच अनेक केंद्रांवर कारवाई केल्याने परीक्षा व्यवस्थापनातील त्रुटी स्पष्ट झाल्या आहेत.







# तारिक रहमान यांनी बांगलादेशचे नवे पंतप्रधान म्हणून घेतली शपथ

## 49 जणांच्या मंत्रिमंडळात 1 हिंदू व 1 बौद्ध मंत्री

**ढाका/वृत्तसंस्था :** बीएनपीचे अध्यक्ष तारिक रहमान बांगलादेशचे नवे पंतप्रधान बनले आहेत. राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांनी संसद भवनात तारिक यांना पदाची शपथ दिली. भारताचे लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला हे देखील या समारंभात उपस्थित होते.तारिक रहमान पंतप्रधान होण्याची ही पहिलीच वेळ आहे. आज दुपारी बीएनपीच्या खासदारांनी त्यांना संसदीय पक्षाचे नेते म्हणून निवडले. ते माजी पंतप्रधान खालिदा झिया आणि माजी राष्ट्रपती झियाउर रहमान यांचे पुत्र आहेत. १७ वर्षे लंडनमध्ये राहिल्यानंतर ते दोन महिन्यांपूर्वी बांगलादेशला परतले.

रहमान यांच्या व्यतिरिक्त २५ कॅबिनेट मंत्री आणि २४ राज्यमंत्र्यांनीही शपथ घेतली. यामध्ये हिंदू मंत्री निताई राय चौधरी आणि बौद्ध मंत्री दीपेन दिवान चकमा यांचा समावेश आहे. २५ कॅबिनेट मंत्र्यांपैकी १७ नवीन चेहरे आहेत. सर्व २४ राज्यमंत्री नवीन आहेत. गेल्या गुरुवारी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत, बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) ने २९९ पैकी २०९ जागा जिंकल्या, बहुमतासाठी आवश्यक असलेल्या १५० जागा ओलांडल्या. याशिवाय त्यांच्या मित्रपक्षांनी ३ जागा जिंकल्या. बांगलादेशच्या १३व्या राष्ट्रीय संसदेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मंगळवारी राष्ट्रीय संसदेच्या दक्षिण प्लाझामध्ये शपथ घेतली. सकाळी सुमारे १०:४२ वाजता (स्थानिक वेळेनुसार) मुख्य निवडणूक आयुक्तएएमएम नासिर उद्दीन यांनी खासदारांना शपथ दिली. बांगलादेशी माध्यम प्रथम आलो नुसार, हा शपथविधी सोहळा कडेकोट बंदोबस्तात आयोजित करण्यात आला होता, ज्यात १,००० हून अधिक स्थानिक आणि परदेशी पाहुणे सहभागी झाले होते. शपथविधी सोहळ्यापूर्वी कुराणचे पठण करण्यात आले. राज्यमंत्री म्हणून एम रशीदुज्जमां मिल्लत, अनिंद्य इस्लाम अमित, एमडी शरीफुल आलम, सुल्तान सलाहुद्दीन टुकू, बैरिस्टर कैसर कमाल, फरहाद हुसैन आजाद, एमडी अमीनुल हक, मीर मोहम्मद हेलाल उद्दीन, हबीबुर रशीद, एमडी राजीब अहसन, एमडी अब्दुल बारी, मीर शाहे आलम, जोनायद अब्दुर रहीम साकी, इशराक हुसैन, फरजाना शर्मिन, शेख फरीदुल इस्लाम, नुरु ल हक नूर, यासर खान चौधरी, एम इकबाल हुसैन, एमए मुहिथ, अहमद सोहेल मंजूर, बाबी हज्जाज आणि अली नेवाज महमूद खैयाम यांचा समावेश आहे.




# ९ महिन्याच्या बाळाच्या टाळूला अडकलेले बटन काढले

## डॉ.हुतके व डॉ.राठी यांची प्रक्रिया कामगिरी







**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर येथे ९ महिन्यांच्या बाळाच्या टाळूला (तोंडाच्या वरच्या भागाला) घट्ट अडकलेले बटन अत्यंत कौशल्याने व यशस्वीरित्या काढण्यात आले. ही घटना अत्यंत नाजूक व तातडीच्या वैद्यकीय परिस्थितीत घडली.वैद्यकीय शाखेतील प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. मनिष हुतके आणि शल्यचिकित्सक डॉ. नविनकुमार राठी यांच्या संयुक्त प्रयत्नातून ही प्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. बटनावर केमिकल सोल्यूशन असल्यामुळे ते टाळूला अधिक घट्ट व पक्के चिकटले होते. त्यामुळे ते काढणे अत्यंत जटिल व आव्हानात्मक होते.अत्याधुनिक शस्त्र व उपकरणांच्या मदतीने टाळूमध्ये अडकलेले परकीय पदार्थ (फॉरेन मटेरियल) सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. बाळाला कोणतीही दुखापत होऊ न देता बटन यशस्वीरित्या काढणे हे डॉक्टरांसमोर मोठे आव्हान होते; मात्र त्यांच्या अनुभव, अचूकता व दक्षतेमुळे कोणतीही गुंतागुंत न होता बाळ पूर्णपणे सुरक्षित आहे.सध्या बाळाची प्रकृती स्थिर असून त्याच्यावर आवश्यक वैद्यकीय देखरेख ठेवण्यात येत आहे.बाळाच्या पालकांनी दोन्ही डॉक्टरांचे मनःपूर्वक आभार मानले असून, त्यांच्या तत्परतेमुळे मोठा धोका टळल्याची भावना व्यक्त केली. तसेच इतर पालकांनी लहान मुलांच्या आवाक्यात लहान वस्तू ठेवू नयेत, असे आवाहनही त्यांनी केले.

# चपराशीपुरात सिमेंट डेपोमध्ये भीषण आग





अमरावती/प्रतिनिधीः- स्थानिक चपराशीपुरा चौकातील विमको अपार्टमेंट मधील बमावी सिमेंट डेपो हार्डवेअर दुकानात सोमवारी शॉर्ट सर्किटमध्ये आग लागल्याने मोठे नुकसान झाले. दोन तासाच्या अथक प्रयत्नानंतर अग्निशमन विभागाच्या पथकाने आगीवर नियंत्रण आणले. माहितीनुसार सोमवारी सायंकाळी बवामी सिमेंट डेपोमध्ये शॉर्टसर्किटमुळे आग लागली. या दुकानात बिल्डिंग मटेरियल सह ऑइल पेंटचे सामान होते. ऑइल पेंट असल्यामुळे आगीने काही वेळेतच विक्राळ रूप धारण केले. दोन तासाच्या अथक प्रयत्नानंतर फोमच्या मदतीने आगीवर नियंत्रण आणले. दरम्यान तोपर्यंत लाखों रुपयाचे नुकसान यामध्ये झाले होते. अग्निशमन विभागाचे मनोज इंगोले, केंद्रप्रमुख सोनकांबळे यांच्या आदेशाने फायरमॅन मनीष उताने, विशाल भगत, निखिल चौधरी,अमोल निस्ताने, प्रशांत, शेख तौफिक, शेखर कोल्हे, राजू शेंडे, सारंग राठोड यांनी आग आटोक्यात आणण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले.

# उत्सवांच्या काळात ध्वनीक्षेपकांना रात्री १२ पर्यंत मुभा

## जिल्हाधिकाऱ्यांचे १५ दिवसांच्या शिथिलतेचे आदेश

अमरावती/प्रतिनिधीः- आगामी विविध सण आणि उत्सवांच्या पार्श्वभूमीवर अमरावती जिल्ह्यातील नागरिकांसाठी प्रशासनाने मोठा दिलासा दिला आहे. जिल्ह्यात ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यंत्रणेच्या वापरासाठी वर्षभरातील एकूण १५ दिवसांची विशेष शिथिलता देण्याचे आदेश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जारी केले आहेत. केंद्र शासनाच्या ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) सुधारित नियम २०१७ मधील तरतुदींचा आधार घेत ही परवानगी देण्यात आली आहे.

या आदेशानुसार, निश्चित केलेल्या उत्सवांच्या दिवशी सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक वापरता येणार आहे. एरव्ही रात्री १० वाजेपर्यंत असलेली ही मर्यादा आता काही विशेष दिवसांसाठी वाढवण्यात आली आहे. ज्या उत्सवांसाठी ही सवलत लागू असेल त्यात प्रामुख्याने १९ फेब्रुवारी रोजीची शिवजयंती, २६ मार्चला श्रीराम नवमी, १४ एप्रिलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आणि १ मे रोजीच्या महाराष्ट्र दिनाचा समावेश आहे.

तसेच वर्षाच्या उत्तरार्धात ४ सप्टेंबरला श्रीकृष्ण जयंती, १४ सप्टेंबरला गणपती उत्सव, २५ सप्टेंबरला अनंत चतुर्दशी आणि १५ ऑक्टोबरला नवरात्र पंचमीसाठी ही सूट असेल. नवरात्रीचे मुख्य दोन दिवस म्हणजे १९ व २० ऑक्टोबर, तसेच दिवाळीमध्ये ६ नोव्हेंबरला धनत्रयोदशी आणि ८ नोव्हेंबरला लक्ष्मीपूजनाच्या दिवशीही रात्री १२ पर्यंत ध्वनीक्षेपक सुरू ठेवता येतील. वर्षाच्या शेवटी २५ डिसेंबर (नाताळ) आणि ३१ डिसेंबर रोजीही ही सवलत लागू राहील.

मात्र, ही शिथिलता देताना जिल्हाधिकारी येरेकर यांनी काही कडक अटीही घातल्या आहेत. झोननिहाय ठरवून दिलेली ध्वनी मर्यादा कोणत्याही परिस्थितीत ओलांडता येणार नाही. विशेषतः रुग्णालय, शैक्षणिक संस्था आणि न्यायालये यांसारख्या 'शांतता क्षेत्र' घोषित परिसरात ही सवलत लागू असणार नाही. नियमांचे उल्लंघन झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधित आयोजक आणि यंत्रणेवर राहील, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. सर्व नागरिकांनी आणि उत्सव मंडळांनी प्रशासकीय नियमांचे पालन करून उत्सव शांततेत साजरे करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

# शिवजयंतीनिमित्त जिल्हा प्रशासनातर्फे विशेष व्याख्यान

**अमरावती/प्रतिनिधीः-** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून अमरावती जिल्हा प्रशासनाच्या वतीने १८ आणि १९ फेब्रुवारी रोजी शहरात विविध सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. राज्याच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या सूचनेनुसार जिल्हाधिकारी कार्यालयाने या सोहळ्याचे आयोजन केले आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### आदिवासी शेतकऱ्यावर वाघाचा

झाले आहे. घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे पथक तेथे पोहोचले. त्यांनी जखमी मुन्ना यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. या घटनेमुळे रेट्याखेड्या गावात दहशत निर्माण झाली आहे. वनविभागाचा पथक तपास करत आहे.

### इंस्टाग्रामवरील 'ट्रेडिंग' आमिष

लिंक पाठवण्यात आली. त्या लिंकच्या माध्यमातून खाते उघडून खोडस्कर यांनी टप्प्याटप्प्याने एकूण ६ लाख रुपये विविध व्यवहारांद्वारे जमा केले. सुरुवातीला ऑनलाईन पोर्टलवर नफ्याचे आकडे दर्शविले जात होते. मात्र काही दिवसांनी संबंधित मोबाईल क्रमांक बंद लागला. पोर्टलवरही व्यवहारांची खात्रीशीर माहिती उपलब्ध न झाल्याने आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. या प्रकरणी सायबर पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१९(२) तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६(क) व ६६(ड) अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे. संबंधित बँक व्यवहारांचा मागोवा घेण्याचे काम सुरू असून आरोपींचा शोध घेतला जात आहे. सायबर पोलिसांनी नागरिकांना सोशल मीडियावरील अनोळखी गुंतवणूक ऑफर, हमखास नफा देण्याच्या जाहिराती आणि अज्ञात लिंकपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे.

### पंचवटी ते कांता नगर

करावा लागला. दरम्यान जवाहर स्टेडियम प्रभागाच्या नगरसेविका स्नेहा लुल्ला यांचे पती आशिष यांनी घटनास्थळी धाव घेत परिस्थितीची पाहणी केली. त्यांनी तात्काळ महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या अधिकाऱ्याला माहिती देत दुरुस्तीची मागणी केली. पाईप लाईन फुटल्याने लाखों लिटर पाणी वाया गेल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. पाणी पीडीएमसी रुग्णालय परिसरातही शिरल्याने रुग्ण व नातेवाईकांची गैरसोय झाली. संबंधित विभागाकडून रात्री उशिरापर्यंत दुरुस्तीचे काम सुरू करण्यात आले. मात्र पाईपलाईन फुटल्याने शहरातील पाणीपुरवठा आज बंद होता. त्यामुळे नागरिकांना बुधवारी ही पाणी मिळणार नाही. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ने नागरिकांना कळविले आहे कि मोठ्या प्रमाणात अचानक जलवाहिनीवर गळती निर्माण झाल्याने पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

### शासकीय योजनांचा लाभ

इंटरनेट यासारख्या सुविधा देताना वन विभागाच्या परवागींची अडसर येत आहे. त्यामुळे वन विभागाने पुढाकार घेऊन परवानगी आवश्यक असणाऱ्या विभागांशी समन्वय साधावा. तसेच या परवानगी तातडीने मिळावी, यासाठी पुढाकार घ्यावा.

केंद्र शासनाच्या वतीने प्रधानमंत्री ग्रामसडक योजना राबविण्यात येत आहे. त्यामुळे प्रामुख्याने ग्रामीण भागातील रस्ते दुरूस्ती करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. ही कामे चांगल्या दर्जाचे होण्यासाठी प्रयत्न करावेत. इंटरनेटसाठी भारतनेट प्रकल्प राबविण्यात येत आहे. अविरत सेवा मिळावी, यासाठी केबल सुस्थितीत राखण्यात याव्यात. वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात नागरिक जखमी होऊ नये, यासाठी उपाययोजना कराव्यात. हल्ला झाल्यास तातडीने वैद्यकीय मदत पोहोचवावी. कौशल्य विकासाच्या योजनेत विश्वकर्मा योजनेत युवकांनी नोंदणी केली आहे. त्यांना प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी. जिल्ह्यातील आरोग्य सुविधा उत्कृष्ट दर्जाच्या देण्यात याव्यात. पल्लवी गुडधे हिच्या मृत्यूसारख्या घटना घडू नये. त्यांच्या कुटुंबियांना न्याय मिळावा. त्यासोबतच नगरपालिकांना शववाहिका देण्यात येणार असल्याने याबाबतची मागणी आरोग्य विभागाकडे नोंदवावी, असे सांगण्यात आले.

यासोबतच पाणंद रस्ते, खनीज क्षेत्र कल्याण योजना, कौशल्य विकास योजना, उज्ज्वला योजना, जलसंधारण, अमृत सरोवर, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, मध्यान्ह भोजन, अटल भूजल, जलजीवन मिशन, रिचार्ज शाफ्ट, घरकुल योजना, जलयुक्त शिवार योजना आदींचा आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्ह्यातील नगरपालिकांच्या अध्यक्षांनी त्यांना येणाऱ्या अडचणींबाबत माहिती दिली.

### दहेंड्यात 'बोकड्यांचा

वेग आणि चपळाई दाखवत प्रथम क्रमांक पटकावला, तर बोबदो येथील बोकड्यांनी द्वितीय क्रमांक मिळवत आपली ताकद सिद्ध केली. विजेत्या संघांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

शेतकरी वर्ग, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांनी या उपक्रमाचे उत्स्फूर्त स्वागत केले. पारंपरिक खेळांना आधुनिक आणि सुरक्षित स्वरूप देत जतन करण्याचा हा प्रयत्न असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

दहेंडा यात्रेतील 'बोकड्यांचा शंकरपट' हा केवळ क्रीडा उपक्रम न ठरता मेळघाटाच्या ग्रामीण परंपरेला नवा आयाम देणारा ठरला आहे. पुढील वर्षीही ही स्पर्धा अधिक भव्य स्वरूपात आयोजित करण्याचा मानस ग्रामस्थांनी व्यक्त केला.

### शेतात महिलेवर अत्याचार;

इतर पुराव्यांवरून आरोपीविरुद्धचे आरोप सिद्ध झाले. न्यायालयाने कलम ३७६ अंतर्गत १० वर्षांची सक्तमजुरी व ५ हजार रुपयांचा दंड, कलम ४५२ अंतर्गत ३ वर्षांची सक्तमजुरी व २ हजार रुपयांचा दंड, तसेच कलम ३२३ अंतर्गत ६ महिन्यांची सक्तमजुरी व ५०० रुपयांचा दंड अशी शिक्षा सुनावली. सर्व शिक्षा एकत्रित भोगावयाच्या आहेत. सरकारीं पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता ॲड. शशिकिरण भगवतीप्रसाद पलोड यांनी बाजू प्रभावीपणे मांडली.

### छत्रपती शिवराय सुराज्य निर्माण

पत्रकार परिषदेमध्ये आयोजकांनी दिली.

त्यांनी सांगितले की, गुरुवार १९ फेब्रुवारी रोजी सकाळी आठ वाजता भीम टेकडीवरून रॅलीला सुरुवात होणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून खासदार डॉ. अनिल बोंडे ,बळवंत वानखडे, विभागीय आयुक्त श्वेता सिंगल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलीस आयुक्त राकेश ओला, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, तहसीलदार विजय लोखंडे, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, लेखाधिकारी मिलिंद देवरे, शिक्षणाधिकारी प्रकाश मेश्राम उपस्थित राहणार आहे. रॅली दरम्यान राष्ट्रमाता जिजाऊ यांच्यावर आधारित पोवाडा, शिवाजी महाराज यांच्यावर आधारित पथनाट्य शिवाजी विज्ञान संस्थेच्या राष्ट्रीय सेवा योजना पथकाद्वारा प्रस्तुत करण्यात येणार आहे. जयस्तंभ चौकात महात्मा फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करून शिवराय नाटक पथनाट्य सादर केल्या जाणार आहे. इरविन चौकात पथनाट्यचे सादरीकरण केले जाईल. शिवरायाचा वारसा सर्वांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. पत्रकार परिषदेमध्ये सुनील रामटेके व इतर उपस्थित होते.

### विलासनगरात भरदुपारी कार

लॉरी घटनास्थळी दाखल झाली. चालक नितीन इंगोले तसेच फायरमन राजेश गजबे आणि विकी हिवराळे यांनी तत्काळ पाण्याच्या फवाऱ्यांनी ज्वाळांवर नियंत्रण मिळवण्यास सुरुवात केली. आग भडक स्वरूपात पसरल्याने सुमारे ४५ मिनिटे शर्थीचे प्रयत्न करावे लागले. अखेर आगीवर पूर्ण नियंत्रण मिळवण्यात यश आले. एमएच २७ ईसी २८१२ क्रमांकाची 'किया कॅरेन' कार पूर्णतः जळून खाक झाली. वाहनमालक कमलेश रामचंद्र शेवणे यांनी प्राथमिक अंदाजानुसार मोठे आर्थिक नुकसान झाल्याची माहिती दिली. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून तांत्रिक बिघाडाचा संशय व्यक्त केला जात आहे. घटनेदरम्यान परिसरात मोठी गर्दी जमली होती. पोलिसांनी तत्काळ परिस्थिती नियंत्रणात ठेवत वाहतूक सुरळीत केली.

### शिवाजी नगर येथे शॉर्टसर्किटमुळे

लोखंडे,मनोज लोखंडे, नगरसेवक दिनेश पारडे व माजी नगरसेवक अस्लम घानिवाले उपस्थित होते तसेच सांत्वनपर सुधाकर पाटील भारसाकळे, ईश्वर बुंदेले, सुरेश चांडक, सुनिल भारसाकळे, राजू लोखंडे, अस्लम मन्सूरी,अनिकेत पडोळे यांनी भेट दिली.

या घटनेनंतर नागरिकांनी घरातील विद्युत उपकरणे व वायरिंगची नियमित तपासणी करण्याचे आवाहन केले असून अशा घटना टाळण्यासाठी खबरदारी घेणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले जात असून नुकसान झालेल्या घरासाठी आपल्या स्तरावर मदत करण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते यांनी केले आहे.

### बेनोडामध्ये पिसाळलेल्या

सहा जण जखमी झाल्याने ग्रामस्थांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच ग्रामपंचायतीने दवंडी देऊन नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा दिला. ग्रामस्थांच्या मदतीने शोधमोहीम राबविण्यात आली. दुपारी सुमारे १२ वाजता संबंधित श्वानाचा बंदोबस्त करण्यात आला. जखमींना बेनोडा (शहीद) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रतिक्षा उईके यांनी सर्वांना प्राथमिक उपचार करून रेबीज प्रतिबंधक लस दिली. पुढील उपचारासाठी अमरावती ग्रामीण रुग्णालय येथे हलविण्यात आले आहे. डॉ. उईके यांनी सांगितले की, सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर असून पुढील लसीकरण नियमानुसार केले जाईल. ग्रामविस्तार अधिकारी सतीश गिरी यांनीही घटनेची पुष्टी केली असून गावात आणखी संशयित श्वान असल्यास शोध सुरू ठेवण्यात येणार असल्याचे सांगितले. दरम्यान, भटक्या श्वानांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

### श्री दिगंबर जैन सिद्धक्षेत्र मुक्तागिरी

देताना सांगितले की, विदर्भात प्रथमच अमरावती जिल्ह्यातील श्री दिगंबर जैन सिद्ध क्षेत्र मुक्तागिरी येथे १९ फेब्रुवारी रोजी भव्य जैनेश्वरी दीक्षा समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे .यामध्ये विद्या शिरोमणी आचार्य श्री १०८ समय सागर जी महाराज यांची प्रमुख उपस्थितीती आहे.आज १८ फेब्रुवारी रोजी पहाटे पावणे सात वाजता आचार्य भक्ती ,सकाळी गनधरवलय विधान , शांती विधान प्रतिष्ठाचार्य विनयभैय्या बंडा ,संध्याकाळी पावणे सहा वाजता आचार्य भक्ती आणि संध्याकाळी सात वाजता भजन संध्या चे आयोजन करण्यात आले आहे . उद्या १९ फेब्रुवारी रोजी सकाळी सात वाजता ध्वजारोहण संपन्न होणार आहे.पंडाल अनावरण आचार्य श्री पूजन एवं उद्बोधन चे आयोजन करण्यात येणार आहे. सकाळी दहा वाजता आहार चर्या दुपारी एक वाजता दीक्षा संस्कार समारोहचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष अतुल कळमकर यांनी दिली. यामध्ये महाराष्ट्र राज्यातून नव्हे तर मध्य प्रदेश व देशातील विविध भागातून १५ ते २० हजार भाविक - भक्त उपस्थित राहणार आहेत. त्या भक्तांसाठी श्री दिगंबर जैन सिद्ध क्षेत्र मुक्तागिरी येथे राहण्याची, जेवणाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. मैदानात भव्य दिव्य ची मंडपाची निर्मिती करण्यात आलेली आहे .अमरावती व मध्य प्रदेश बैतुल येथील पोलीस प्रशासन ,सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, आरोग्य विभाग, वाहतूक शाखेचे अधिकारी कर्मचारी त्यांचे सुद्धा महत्त्वपूर्ण सहकार्य मिळत आहे .या भव्य दिव्य समारोसाठी जवळपास ६०० स्वयंसेवक सेवा देणार असल्याची माहिती सुद्धा अध्यक्ष अतुल कळमकर यांनी दिली . यासाठी मध्यप्रदेश, महाराष्ट्र राज्य, उत्तर प्रदेश ,आसाम, गुजरात तसेच विविध राज्यातून भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित झाले आहे.१९ फेब्रुवारी रोजी संपन्न होणाऱ्या जैनेश्वर दीक्षा मध्ये एकूण २१ एलेक श्री व क्षुल्लक श्री दीक्षा घेणार आहे. या समारोह साठी ३४ पेक्षा जास्त साधु - संत उपस्थित राहणार असल्याची माहिती सुद्धा अध्यक्ष अतुल कळमकर यांनी दिली.

### महामार्ग ओलांडणाऱ्या वृद्धेला

दुचाकीस्वाराचे नाव आहे. देवेष ला पुढील उपचारासाठी नागपूर हलविण्यात आले आहे.देवेष हा आपल्या एमएच २७ डीके ७५२१ क्रमांकाच्या इलेट्रिक दुचाकीने जात होता. दरम्यान तिवसा डेपोतून नाणीबाई मुन्द्रे या महामार्ग ओलांडत असताना देवेषच्या दुचाकीची जबरदस्त धडक बसली.वृद्ध महिला डोक्यावर पडल्यामुळे त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागला. यावेळी घटनास्थळी उपस्थित असलेले शुभम नाखले यांनी त्यांना तिवसा उपजिल्हा रुग्णालय उपचारासाठी दाखल केले.

### प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ

, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी तसेच कार्यकारी सदस्य नितीन हिवसे, डॉ. पूनाम चौधरी, पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड आणि प्रा. गजानन काळे यांची उपस्थिती लाभणार आहे.

संस्थेचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यक्रम समन्वयक डॉ. आशिष कडू यांच्या नेतृत्वात 'एन्जॉय २०२६'चे नियोजन करण्यात आले असून, महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व तयारी पूर्ण झाली आहे. विद्यार्थ्यांमध्ये कार्यक्रमाबाबत मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

कला, संस्कृती आणि युवा शक्तीचा संगम असलेल्या या भव्य महोत्सवाला रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### मेघे लेआउट परिसरात १.९८

चोरी झाल्याचे स्पष्ट झाले. तत्काळ डायल ११२ वर संपर्क साधण्यात आला. राऊत घरी परतल्यानंतर गोदरेज कपाटाची तपासणी केली असता १० ग्रॅम सोन्याचे दागिने, चांदीचे जोडवे, चार मनगटी स्मार्ट वॉच आणि पूजेसाठी ठेवलेली सुमारे ३० हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण १,९८,००० रुपयांचा माल गायब असल्याचे आढळले. घटनास्थळी पोलिसांनी पंचनामा करून ठसे व इतर पुरावे गोळा केले आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू असून संशयितांचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, शहरात वाढत्या घरफोडीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

**शेत विकणे आहे**

आर्णी ते कोळवण रोडवर अंतर ४ कि. एकूण जमीन मागणी तीन एकर असून गट. क्र.५८
**संपर्क :**
**अशोक लक्ष्मण पोरे.** मो ९६२३३४९६२३.
**दिनेश जाधव,** मो [illegible]
**सचिन पानमरे.** मो [illegible]
मु. सुकळी ता. आर्णी. जि यवतमाळ

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१००/२०२६ ने.ता.१३.०३.२०२६

**अर्जदार -** १. उषा रामरावजी गवळी
वय ६७ वर्षे, धंदा - घरकाम
रा.अंबाडा पो.थडीपवनी, ता.नरखेड, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार हिचे वडील **नामे भदाजी उर्फ भदुजी पांडुरंग उमेकर** हे दि.**२०.०३.१९९७** रोजी लोणी, ता.वरुड, जि.अमरावती येथे मयत झाले. तसेच अर्जदाराची आई **नामे यमुना उर्फ नर्मदाबाई भदुजी उमेकर** हिचा दिनांक **२८.०५.२०१३** रोजी, लोणी, ता.वरुड, जि.अमरावती येथे मृत्यू झाला. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ११.०२.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय,(क.स्तर) मोर्शी

## जाहीर नोटीस

विद्यमान प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब चांदूर बाजार यांचे न्यायालय

मि.अ.क्र./ ने.ता. / /२०२२

**१. अशमीरा सदफ मकसूद अहमद**
**वय १९वर्षे, धंदा – शिक्षण**
**रा. देऊरवाडा, ता. चांदूर बाजार , जि. अमरावती**

**-- विरुध्द --**

गैरअर्जदार-निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी ग्राम पंचायत कार्यालय, देऊरवाडा, ता. चांदूर बाजार , जि. अमरावती वरील अर्जदाराने विद्यमान न्यायालयात जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अंतर्गत जन्माची नोंद घेण्याचे निर्देश गैरअर्जदाराला देण्याकरीता प्रकरण दाखल केलेले आहे.

अर्जदार नामे अशमीरा सदफ मकसूद अहमद ह्याचा दिनांक २१ .११.२००७ रोजी राहत्या घरी देऊरवाडा येथे जन्म झालेला आहे. करीता या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याचे आत वि. न्यायालयात आपला लेखी आक्षेप, प्रकरणात आक्षेप असल्यास नोंदवावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दि.

आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक,
प्रथम श्रेणी न्यायाधीश, चांदूर बाजार

## जाहीर नोटीस

विद्यमान प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब चांदूर बाजार यांचे न्यायालय

मि.अ.क्र./ ने.ता. / /२०२२

**१. मकसूद अहेमद शेख मन्नान**
**वय ५३ वर्षे, धंदा – मजुरी**
**रा. देऊरवाडा, ता. चांदूर बाजार , जि. अमरावती**

**-- विरुध्द --**

गैरअर्जदार-निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी ग्राम पंचायत कार्यालय, देऊरवाडा, ता. चांदूर बाजार , जि. अमरावती वरील अर्जदाराने विद्यमान न्यायालयात जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अंतर्गत जन्माची नोंद घेण्याचे निर्देश गैरअर्जदाराला देण्याकरीता प्रकरण दाखल केलेले आहे.

अर्जदार नामे मकसूद अहेमद शेख मन्नान ह्याचा दिनांक १९ .०७.१९७३ रोजी राहत्या घरी देऊरवाडा येथे जन्म झालेला आहे. करीता या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याचे आत वि. न्यायालयात आपला लेखी आक्षेप, प्रकरणात आक्षेप असल्यास नोंदवावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दि.

आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक,
प्रथम श्रेणी न्यायाधीश, चांदूर बाजार

## महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम
## सिव्हिल लाईन वाशिम

ई-मेल - washim.ee@mahapwd.gov.in दुरध्वनी क्रं- ०७२५२-२३२३३४

## ई-निविदा सुचना ३१ सन २०२५-२६

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वाशिम महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून निविदेतील अटी व शर्तीची पूर्तता करणारे नोंदणीकृत / अनोंदणीकृत कंत्राटदार यांचे कडून निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात आहेत. निविदा [illegible] शासनाच्या संकेतस्थळावर https://maharashtra.etenders.in येथून डाऊनलोड करण्यात याव्यात. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्रं. | कामाचे नांव | निविदा प्रकार | कामाची अंदाजित किंमत रु. |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | वाशिम जिल्ह्यातील केंद्रिय मार्ग निधी अंतर्गत राष्ट्रीय महामार्ग [illegible] ते राष्ट्रीय महामार्ग [illegible] [illegible] (द्वितीय वेळ) | ब-२ | १९,८८,४८,०२१.०० |
| २ | वाशिम जिल्ह्यातील केंद्रिय मार्ग निधी अंतर्गत [illegible] ता. कारंजा जि. वाशिम (द्वितीय वेळ) | ब-१ | ३,९६,४६,८७९.०० |
| ३ | वाशिम जिल्ह्यातील केंद्रिय मार्ग निधी अंतर्गत [illegible] ता. मंगरुळपीर जि. वाशिम (द्वितीय वेळ) | ब-१ | ३,९३,६६,७२४.०० |
| ४ | वाशिम जिल्ह्यातील केंद्रिय मार्ग निधी अंतर्गत [illegible] ता. मानोरा (द्वितीय वेळ) | ब-१ | ६,५०,५४,९३५.०० |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी :-** दिनांक. [illegible] ते दिनांक [illegible]

**ई-निविदा उघडणे :-** मा. अधीक्षक अभियंता सा. बा. मंडळ, अकोला यांचे कार्यालयात दिनांक. [illegible] वेळ [illegible] वाजता खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

1. http://mahapwd.com 2. https://mahatenders.gov.in

(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)

कार्यकारी अभियंता, वाशिम कार्यालय येथील सूचना फलक

जा.क्र. [illegible] दि. [illegible]

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय सार्वजनिक बांधकाम विभाग वाशिम

(शुभम जोशी)
कार्यकारी अभियंता
सा. बा. विभाग वाशिम

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, १८ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# पहिल्याच सभेत मनपा दणाणली!

# पडीक वार्डावरून सत्ताधारी-विरोधक आमनेसामने ; सभागृहात हमरीतुमरी

**अकोला : महानगरपालिकेची पहिलीच सर्वसाधारण सभा सोमवारी जोरदार खडाजंगीने गाजली. पडीक वार्ड आणि झोन निर्मितीच्या मुद्द्यावरून सत्ताधारी शहर सुधार समिती व विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांची मालिका रंगली. काही काळासाठी सभागृहाचे वातावरण अक्षरशः तापले होते. पहिल्याच सभेत झालेल्या या वादामुळे आगामी पाच वर्षे मनपातील राजकारण वादळी ठरणार, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.**

**सभेत स्थायी समिती व महिला-बालकल्याण समिती सदस्यांची निवड करण्यात आली. त्यानंतर झोननिहाय नव्या प्रभाग रचनेला बहुमताने मंजुरी देण्यात आली. मात्र, झोन बदल आणि काही प्रभागांच्या फेररचनेवरून विरोधकांनी आक्षेप घेतला. सत्ताधाऱ्यांनी मतदानाच्या जोरावर सर्व विषय मंजूर करून घेतल्याने विरोधक आक्रमक झाले.**





### झोननिहाय नवी रचना

| | |
|---|---|
| **पूर्व झोन:** | प्रभाग ३, ४, ५, १३, १४ |
| **पश्चिम झोन:** | प्रभाग ६, ८, ९, १०, १२, १७ |
| **उत्तर झोन:** | प्रभाग १, २, ७, ११ |
| **दक्षिण झोन:** | प्रभाग १४, १५, १८, १९, २० |

### पडीक वार्डावरून वाद शिगेला

शहरातील पडीक वार्डाची निविदा नव्याने काढण्याचा विषय चर्चेला आल्यानंतर वातावरण अधिकच ढवळून निघाले. विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर 'सोयीस्कर वार्ड मंजूर केल्याचा' आरोप केला. या वादात नगरसेवक सागर भारुका आणि माजी महापौर विजय अग्रवाल यांच्यात जोरदार शाब्दिक चकमक झाली. काही काळ सभागृहात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

### कचरा घंटागाडी मोफत करा – प्रिया अश्विन शिरसाट

'स्वच्छ भारत–सुंदर भारतची संकल्पना राबवित असताना नागरिकांकडून ३० ते ५० रुपये शुल्क आकारले जाते. हे शुल्क तात्काळ रद्द करून कचरा घंटागाडी सेवा मोफत करावी,' अशी मागणी प्रभाग ९ च्या नगरसेविका प्रिया अश्विन शिरसाट यांनी केली. पडीक–प्रशासकीय वाद टाळण्यासाठी सर्वच वार्ड प्रशासकीय करावेत, अशी सूचनाही त्यांनी केली.

### प्रभागात घाणीचे साम्राज्य – निलोफर सोहेल खान

प्रभाग १ मधील काँग्रेस नगरसेविका निलोफर सोहेल खान यांनी स्वच्छतेच्या प्रश्नावर प्रशासनाला धारेवर धरले. 'सफाई कर्मचारी नियमित येत नाहीत. रस्ते व नाल्यांची दुरवस्था आहे. भेदभाव न करता आमच्या प्रभागातही विकासकामे करा,' अशी मागणी त्यांनी सभागृहात केली.

### 'पडीकची दुकानदारी' बंद करा - निलेश देव

वंचितचे गटनेते निलेश देव यांनी पडीक वार्ड वादावर तोडगा काढताना सर्व ५१ वार्डांचा स्वच्छतेचा ठेका एकाच कंपनीला देण्याची मागणी केली. 'पडीकच्या नावाखाली सुरू असलेली दुकानदारी बंद करा,' असा थेट आरोप त्यांनी केला.

### निकष काय? – मनोज पाटील

प्रभाग ८ चे नगरसेवक मनोज पाटील यांनी पडीक वार्ड बदलाच्या निकषांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. 'पूर्वी पडीक असलेला प्रभाग आता अर्धा पडीक व अर्धा प्रशासकीय करण्यात आला. हा बदल कोणत्या निकषांवर?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

### हा निधी जनतेचा - सागर भारुका

सभागृहात माजी महापौर विजय अग्रवाल यांनी मागील काळात शहर विकासासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी आणला असल्याचा दावा करीत ४० कोटी रुपयांचा निधीवरून मोठा गोंधळ उडाला होता. यावेळी उबाठा सेनेचे सागर भारुका यांनी हा पैसा तुमचा नसून जनतेचा असल्याचा टोला यावेळी लगावला असता सभेत मोठा गोंधळ उडत यावेळी अग्रवाल आणि भारुका यांच्यात मोठी शाब्दिक खडाजंगी पहायला मिळाली.

पहिल्याच सभेत उफाळलेल्या वादामुळे मनपात सत्ताधारी–विरोधक संघर्षाची ठिणगी पडली आहे. आगामी काळात विकासाच्या मुद्द्यांपेक्षा राजकीय संघर्षच अधिक रंगणार का, याकडे अकोलेकरांचे लक्ष लागले आहे.

### महिला व बाल कल्याण समितीची नव्याने रचना - शहरातील महिला बाल प्रश्नांना प्राधान्य

**अकोला :** महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण समितीची नव्याने रचना जाहीर करण्यात आली असून विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना समितीत संधी देण्यात आली आहे. महिला सुरक्षितता, बालसंरक्षण आणि शहर विकासाशी निगडित प्रश्नांवर समिती ठोस भूमिका घेईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

महिला सक्षमीकरण, बालहक्क संरक्षण, अंगणवाडी व्यवस्था बळकटीकरण, शालेय पोषण आहार, बालिकांच्या शिक्षणासाठी विशेष उपक्रम तसेच महिलांच्या स्वावलंबनासाठी विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी या विषयांवर समिती काम करणार आहे.

समितीत शहर सुधार आघाडीकडून निकिता राहुल देशमुख, सोनाली गणेशराव अंधारे, माधुरी सुनिल क्षिरसागर, विद्या सुभाष खंडारे आणि आरती प्रकाश घोगलीया यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसकडून प्रिया अश्विन शिरसाट व निलोफर खान सोहेल खान यांची निवड झाली आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाकडून सोनाली दिनेश सरोदे तर वंचित बहुजन आघाडीकडून जयश्री महेंद्र बहादुरकर यांचा समावेश करण्यात आला आहे.

समितीच्या माध्यमातून शहरातील महिला व बालकल्याणाशी संबंधित विविध उपक्रमांना गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. विशेषतः उपेक्षित व गरजू घटकांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी ठोस धोरणे राबविण्यावर भर दिला जाणार आहे.

समितीची पहिली बैठक लवकरच होणार असून आगामी कामकाजाचा सविस्तर आराखडा निश्चित करण्यात येणार असल्याची माहिती मनपा सूत्रांनी दिली. महिला व बाल प्रश्नांवर केंद्रित नियोजनबद्ध कामकाजामुळे शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## मनपा स्थायी समितीवर १६ सदस्यांची नियुक्ती ; शहर सुधार आघाडीचा वरचष्मा



महानगरपालिकेच्या सर्वाधिक महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या स्थायी समितीवर १६ सदस्यांची नियुक्ती करण्यात आली असून शहर सुधार आघाडीने ९ जागा मिळवत स्पष्ट वर्चस्व प्रस्थापित केले आहे. त्यामुळे मनपातील आर्थिक व धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत नव्या समीकरणांची चर्चा रंगू लागली आहे.

स्थायी समिती ही मनपाची आर्थिक कणा मानली जाते. अर्थसंकल्पास मंजुरी, मोठ्या विकासकामांच्या निविदांना मान्यता, विविध खर्चांना संमती तसेच धोरणात्मक निर्णय घेण्याची जबाबदारी या समितीवर असते. त्यामुळे सदस्य नियुक्तीकडे सर्वांचे लक्ष लागले होते.सर्वसाधारण सभेत झालेल्या निवडीनुसार शहर सुधार आघाडीच्या वतीने विजय अग्रवाल, हरीश अलीमचंदानी, सिद्धार्थ उपर्वट, योगिता पावसाळे, शरद तुरकर, मंजुषा शेळके, विनोद मापारी, नर्गिस परवीन फय्याज खान आणि पल्लवी मोरे यांची निवड करण्यात आली आहे.

काँग्रेस पक्षाला ४ जागा मिळाल्या असून सुवर्णरेखा विजय जाधव, आझाद खान अलीयार खान, मो. फजलु अब्दुल करीम आणि शाहीन अंजुम मेहबूब शेख यांचा समावेश करण्यात आला आहे. शिवसेना (उबाठा) कडून सागर भारुका, वंचित बहुजन आघाडीकडून निलेश देव तर एमआयएमकडून सय्यद रहिम सय्यद हाशम यांची निवड झाली आहे.

शहर सुधार आघाडीला स्पष्ट बहुमत मिळाल्याने स्थायी समितीवरील निर्णय प्रक्रियेत त्यांचा प्रभाव राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. आगामी काळात मनपातील विकासकामांना गती, निधीचे सुयोग्य वितरण आणि प्रशासकीय निर्णयांची दिशा या नव्या समितीवर अवलंबून राहणार आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी ही समिती कितपत प्रभावी ठरते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## बारावीच्या भौतिकशास्त्र परीक्षेत सामुदायिक कॉपीचा गंभीर प्रकार उघड

■ प्रतिनिधी | वाशिम ■

केंद्र क्रमांक ०९०६ श्री मैनागीरी महाराज कनिष्ठ महाविद्यालय, टो-जुमडाफाटा येथे इयत्ता बारावीच्या भौतिकशास्त्र विषयाच्या परीक्षेदरम्यान मोठ्या प्रमाणावर सामुदायिक कॉपी झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. भरारी पथकाच्या अचानक भेटीत तसेच तपासणीत तब्बल ५८१ विद्यार्थ्यांनी एकसारखी उत्तरे लिहिल्याचे निदर्शनास आले.



दि. १६ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.३० वाजता भरारी पथकाने परीक्षा केंद्राची पाहणी केली. या केंद्रावर एकूण ५८४ विद्यार्थ्यांची नोंदणी असून ५८१ विद्यार्थी उपस्थित होते. प्रत्यक्ष पाहणीत अत्यंत दाटीवाटीची बसण्याची व्यवस्था, टिनशेडमध्ये परीक्षा, अपुरी प्रकाशयोजना, पंखे व सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची कमतरता, तसेच वीज खंडित झाल्यास जनरेटरची सुविधा नसल्याचे स्पष्ट झाले. संपूर्ण केंद्रात केवळ ८ सीसीटीव्ही कॅमेरे कार्यरत होते.

विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांची नमुना तपासणी केली असता बहुसंख्य विद्यार्थ्यांची उत्तरे शब्दशः समान असल्याचे आढळून आले. काही उत्तरपत्रिकांवर वस्तुनिष्ठ प्रश्नांवर पेन/पेन्सिलने खूणा केल्याचेही आढळले.

दरम्यान, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनीही परीक्षा केंद्रास भेट दिली होती.

भरारी पथकाच्या तपासादरम्यान एक कर्मचारी मोबाईल फोन घेऊन परीक्षा केंद्रात फिरत असल्याचे आढळले.

मोबाईल तपासणीस टाळाटाळ केल्यानंतर अखेर दोन मोबाईल ताब्यात घेण्यात आले असून पुढील कारवाईसाठी ते संबंधित अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात येणार आहेत. बैठे पथकातील सदस्यांनीही आपल्या अहवालात उपस्थित ५८१ विद्यार्थ्यांनी सामुदायिक कॉपी केली आहे, असे नमूद केले आहे.

भरारी पथकाचा अहवाल, उत्तरपत्रिकांची तपासणी, सीसीटीव्ही फुटेज, अपुऱ्या भौतिक सुविधा आणि संबंधित कर्मचाऱ्याकडे आढळलेले मोबाईल यावरून केंद्र क्रमांक ०९०६ येथे सामुदायिक कॉपी झाल्याचे स्पष्ट होत असून, या प्रकरणी शिक्षण विभागाकडून कठोर कारवाई होण्याची शक्यता असुन संबंधित दोषी कर्मचाऱ्यांविरुद्ध निलंबन व गुन्हा दाखल करण्याबाबतची कार्यवाही सुरू असल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली आहे.

## विशेष कापूस पीक प्रकल्पांतर्गत कापूस कृषीमेळावा

**वाशीम :** भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली तसेच केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर यांच्या सहकार्याने कृषी विज्ञान केंद्र, वाशिम द्वारे विशेष कापूस पीक प्रकल्पांतर्गत 'कापूस पीक कृषीमेळावा' कार्यक्रम शुक्रवार, दि. १३ फेब्रुवारी रोजी महेश भवन, कारंजा (लाड) येथे यशस्वीरित्या आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन कृषी बाजार समिती, कारंजा येथील माजी उपसभापती डॉ. अशोक मुंदे यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी विज्ञान केंद्र, वाशिमचे अध्यक्ष तथा माजी मंत्री व खासदार अनंत देशमुख होते. प्रमुख मान्यवर म्हणून माजी जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. ज्योती गणेशपुरे, प्रयोगशील शेतकरी विजय काळे यांची उपस्थिती लाभली.

## स्काऊट-गाईड जिल्हा मेळाव्यात किड्स पॅराडाईजची दमदार कामगिरी

■ प्रतिनिधी | पातूर ■

भारत स्काऊट्स अँड गाईड्स यांच्या ३६ व्या तीन दिवसीय जिल्हा मेळाव्यात पातूर येथील किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलने उल्लेखनीय यश संपादन करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तेल्हारा तालुक्यातील मनब्दा येथे पार पडलेल्या या मेळाव्यात जिल्ह्यातील विविध शाळांमधील सुमारे एक हजार स्काऊट व गाईड विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलमधील ३२ स्काऊट व १९ गाईड अशा एकूण ५१ विद्यार्थ्यांनी या मेळाव्यात सहभाग घेतला. शारीरिक प्रात्यक्षिके, गॅजेट स्पर्धा, शेकोटी कार्यक्रम, शोभायात्रा तसेच बिनभांड्याचा स्वयंपाक अशा विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी कौशल्याचे दर्शन घडविले. शारीरिक प्रात्यक्षिके स्पर्धेत स्काऊट व गाईड या दोन्ही गटांनी प्रथम क्रमांक पटकावला.



गॅजेट स्पर्धेत स्काऊट गटाने द्वितीय क्रमांक, तर शेकोटी कार्यक्रमात तृतीय क्रमांक मिळविला. शोभायात्रेत विशेष झांकीसाठी प्रोत्साहन पारितोषिक तसेच उत्कृष्ट सादरीकरण व सहभागाबद्दल सन्मानचिन्ह देऊन विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

मेळाव्यातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पथकांचा सत्कार विधान परिषद सदस्य आमदार अमोल मिटकरी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी जिल्हा प्रशिक्षण आयुक्त (स्काऊट) श्रीकृष्ण डांबलकर, जिल्हा संघटक किरण लहाने, मेळावा प्रमुख राजेश पातळे, सुषमा देशमुख, जयमाला जाधव, केंद्रप्रमुख विशाल घोगले, मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष विलास खुमकर, मुख्याध्यापक अविनाश देशमुख, पी. जे. राठोड आदी मान्यवर उपस्थित होते.

मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा संस्थेचे पदाधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. किड्स पॅराडाईजच्या विजयी विद्यार्थ्यांचा व मार्गदर्शक स्काऊटर अविनाश पाटील, क्रीडा शिक्षक अक्षय तायडे, गाईडर रेश्मा शेंडे व दिव्या गव्हाळे यांचा शाळेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे व कार्यकारी संचालिका सौ. ज्योत्स्ना गाडगे यांनी सत्कार केला.

## कारंजा (लाड) येथे तक्षशिला आयुर्वेद कॉलेजतर्फे आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न



■ प्रतिनिधी | कारंजा ■

श्री. संत गजानन महाराज संस्थान, ममता नगर, कारंजा (लाड) येथे तक्षशिला आयुर्वेद कॉलेज, हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, खेर्डा यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले.या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरामध्ये सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तदाब व मधुमेह तपासणी, तसेच विविध आजारांवर आयुर्वेदिक सल्ला व मोफत औषध वितरण करण्यात आले. तज्ज्ञ डॉक्टरांच्या वैद्यकीय चमूने रुग्णांची सखोल तपासणी करून योग्य उपचार व आहार-विहारासंदर्भात मार्गदर्शन केले.या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष मायाताई सोळंके व सोळंके साहेब तसेच स्थानिक नगरसेविका शालिनीताई प्रशांत ठाकरे यांचे विशेष सहकार्य लाभले.त्यांच्या मार्गदर्शनामुळे शिबिराचे नियोजन सुरळीत पार पडले.तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ.शिवानी कोल्हे, डॉ.स्वाती बारसे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ गोकुळा डोंगरदिवे, औषधनिर्माता अन्सार अहमद खान, परिचारिका अश्विनी घुले व प्रियंका तायडे या संपूर्ण वैद्यकीय चमूने परिश्रमपूर्वक सेवा देत शिबिर यशस्वी केले, याबद्दल आयोजकांच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले.ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## भूमीपुजन सोहळा उत्साहात संपन्न

■ प्रतिनिधी | वाशिम ■

तालुक्यातील श्री क्षेत्र पांडव संस्थान, पांडव उमरा येथे १ कोटी ७० लक्ष रुपयांच्या विविध विकासकामांचा भूमीपुजन सोहळा सोमवार दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजता उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन वाशीम–मंगरुळपीर विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्यामभाऊ खोडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे प्रमुख उपस्थित होते. भारतीय जनता पार्टी वाशिम शहराध्यक्ष मनिष मंत्री ,सुभाषराव चौधरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सदर निधीमध्ये १ कोटी रुपये पालकमंत्री यांच्या माध्यमातून तर ७० लक्ष रुपये आमदार श्यामभाऊ खोडे यांच्या निधीतून उपलब्ध झाले आहेत.

**जिल्हास्तरीय पर्यटन विकास कामे :** ५० लक्ष रुपये डोम शेड बांधकाम, २५ लक्ष रुपये रस्ता बांधकाम, ५० लक्ष रुपये पेवर ब्लॉक बसविणे, २५ लक्ष रुपये पेवर ब्लॉक व अन्य अनुषंगिक कामे

**राज्यस्तरीय पर्यटन विकास कामे :**



२० लक्ष रुपये स्टेज बांधकाम व हायमास्ट लाईट कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष शंकरराव ढोबळे साहेब यांच्यासह विश्वस्त मंडळातील नारायणराव ढोबळे, श्रीराम ढोबळे, प्रभुजी ढोबळे, तुकारामजी ढोबळे, सखारामजी ढोबळे, मल्हारी ढोबळे, पांडुरंग महाराज ढोबळे, गोविंदराव ढोबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

तसेच प्रमोद सुभाषराव चौधरी (जिल्हाध्यक्ष रा.यु.कॉ. वाशिम तथा सरपंच पांडव उमरा), पांडुरंग भालेराव (सरपंच तांदळी), सोहन डोडवडे (सरपंच गोंडेगाव), लक्ष्मण कुंभार (उपसरपंच पांडव उमरा), तुळशीराम पानभरे, रामचंद्र कलापड, जगदीश देशमुख, महादेव कव्हर व परिसरातील गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या विकासकामांमुळे श्री क्षेत्र पांडव संस्थान परिसराचा पर्यटनदृष्ट्या विकास होऊन भाविक भक्तांना अधिक सुविधा उपलब्ध होणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रामपंचायत व विश्वस्त मंडळ ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ८३ ■ बुधवार, १८ फेब्रुवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# जनता दरबारात दाखल प्रत्येक समस्येचे निराकरण झाले पाहिजे : पालकमंत्री डॉ.पंकज भोयर

## -पालकमंत्र्यांचा ३५० हून अधिक निवेदनकर्त्यांशी संवाद

**-जनता दरबारला जिल्हाभरातील नागरिकांची उपस्थिती**

**-रात्री उशिरापर्यंत तब्बल ६ तास चालला जनता दरबार**



**वर्धा जनमाध्यम :** पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय जनता दरबार घेण्यात आला. जिल्हाभरातील नागरिकांनी या दरबारला उपस्थित राहून आपले निवेदन, तक्रार, समस्या पालकमंत्र्यांसमोर मांडल्या. जवळजवळ ३५० हून अधिक निवेदने पालकमंत्र्यांनी स्वीकारली. आलेल्या प्रत्येक नागरिकाशी आत्मियतेने संवाद साधत त्यांचे म्हणणे ऐकून घेतले व संबंधितांना त्यांच्या तक्रारींवर वेळेत कारवाई करण्याचे निर्देश दिले.

सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या कालमर्यादेत निकाली निघाल्या पाहिजे. प्रशासनाकडे त्यांच्या प्रलंबित असलेल्या समस्या, प्रकरणांचा निपटारा गतीने व्हावा, यासाठी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्याच संकल्पनेतून या जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीपती मोरे, वर्धा नगरपरिषदेचे उपाध्यक्ष प्रदीपसिंह ठाकूर यांच्यासह सर्व विभागप्रमुख अधिकारी उपस्थित होते.

सकाळी ११ वाजता नोंदणीस सुरुवात झाली. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या नागरिकांनी नोंदणीसाठी गर्दी केली होती. सभागृहासमोर मांडण्यात आलेल्या नोंदणी टेबलवरून प्रशासनाच्यावतीने प्रत्येकाला टोकन क्रमांक देण्यात आले. दुपारी २ वाजता जनता दरबारास सुरुवात झाल्यानंतर पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी स्वत: प्रत्येकाचे निवेदन स्वीकारले. त्यांचे म्हणणे, समस्या जाणून घेतल्या. आलेल्या प्रत्येकाशी आत्मियतेने संवाद साधला.

जनता दरबारास सर्व जिल्हास्तरीय अधिकारी उपस्थित होते. काही प्रकरणात तक्रारदार व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी समोरसमोर चर्चा करून प्रकरण तातडीने निकाली काढण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी केल्या. आपल्या समस्या, प्रश्न निकाली निघतील या अपेक्षेत जिल्हाभरातून नागरिक जनता दरबारात उपस्थित राहिले आहे. त्यामुळे त्यांच्या निवेदनांवर कालमर्यादेत कारवाई करा. जनता दरबारातील एकही प्रकरण प्रलंबित राहू नये, असे निर्देश सर्व विभागप्रमुख अधिकाऱ्यांना पालकमंत्र्यांनी दिले.

**रामनगर लीज नुतनीकरण कारवाई तातडीने करा**

वर्धा शहरातील रामनगर परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांच्या भुखंड लीजचे नुतनीकरण करण्याचा विषय आपण मार्गी लावला आहे. त्यामुळे लीज नुतनीकरण करण्याची कारवाई तातडीने करण्याचे निर्देश पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी वर्धा नगरपरिषद मुख्याधिकारी यांना दिले. तसेच सिंधी समाजाच्या वास्तव्यातील जमीनीचे भूखंड शासनाच्या निर्णयान्वये फ्री होल्ड करण्याच्या कारवाईबाबतही निर्देश दिले.

**अनेक विषयांचे निवेदने प्राप्त**

जनता दरबारात जिल्हाभरातून आलेल्या नागरिकांनी आपल्या समस्या, तक्रारी, प्रश्नच मांडले असे नाहीत, तर मागण्यांची निवेदने देखील सादर केली. दाखल निवेदनांमध्ये महसूल, भूमी अभिलेख, नगरपरिषद, जिल्हा परिषद, पट्टे वाटप, मुख्यमंत्री शेत पाणंद रस्ते, ग्रामीण पाणीपुरवठा अशा प्रमुख विषयांचा समावेश होता. दुपारी २ वाजता सुरु झालेला जनता दरबार तब्बल ६ तास चालला.

सुरुवातीस दिप प्रज्वलन करून जिल्हास्तरीय जनता दरबारचे उद्घाटन करण्यात आले. उपविभागीय अधिकारी दिपक कारंडे यांनी प्रास्ताविक केले. सर्वसामान्यांच्या समस्या निकाली निघाल्या पाहिजे, या भावनेतून पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेला हा चौथा जनता दरबार असल्याचे श्री.कारंडे यांनी सांगितले.

## धावत्या नवी दिल्ली-चेन्नई जी.टी.एक्सप्रेसला भीषण आग

### -प्रवाशांच्या सतर्कतेमुळे टळला मोठा अनर्थ; अडीच तासानंतर मार्ग मोकळा

**सेलू । जनमाध्यम :** नागपूर-सेवाग्राम मार्गावर मंगळवारी सकाळी थरकाप उडवणारी घटना घडली. धावत्या नवी दिल्ली-चेन्नई जी.टी. एक्सप्रेस'च्या शेवटच्या पार्सल डब्याला अचानक भीषण आग लागली आणि काही क्षणांसाठी संपूर्ण परिसर धुराच्या ढगांनी व्यापला. मात्र प्रवाशांच्या प्रसंगावधानामुळे आणि रेल्वे कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे संभाव्य मोठी जीवितहानी टळली.

सकाळी सुमारे ११,२५ वाजताच्या सुमारास सिंदी (रेल्वे) ते तुळजापूर स्थानकादरम्यान हेलोंडी शिवारात, पोल क्रमांक ७८४/१९ व ७८४/१७ दरम्यान गाडीच्या शेवटच्या बोगीतून धूर निघताना दिसला. काही क्षणांतच धुराचे रूपांतर ज्वाळांत झाले. या भोगीत अर्धी बोगी दिव्यांग प्रवासासाठी होती या बोगीत अंदाजे १० ते २५ प्रवासी प्रवास करत होते. परिस्थितीचे गांभीर्य ओळखत प्रवाशांनी तत्काळ साखळी ओढून गाडी थांबवली.



गार्ड डी. आर. मीना यांनी तातडीने खाली उतरून पाहणी केली असता आग लागल्याची खात्री पटली. लोको पायलटशी संपर्क साधून संबंधित बोगी इतर रचनेपासून वेगळी करण्यात आली. आगीचा प्रसार इतर डब्यांपर्यंत होऊ नये, यासाठी ही उपाययोजना निर्णायक ठरली.

घटनेची माहिती मिळताच दहेगाव (गोसावी) पोलिस ठाण्याचे पीएसआय यशवंत कदम पथकासह दाखल झाले. सिंदी पोलिसांनीही मदतकार्य हाती घेतले. प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढून दूर हलविण्यात आले. सिंदी, सेलू व हिंगणघाट येथील अग्निशमन दलाने धाव घेत सुमारे तासाभराच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर पूर्ण नियंत्रण मिळवले.

या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी पार्सल विभागातील मोठ्या प्रमाणावर माल जळून खाक झाला. त्यामुळे रेल्वे प्रशासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे. प्राथमिक अंदाजानुसार शॉर्टसर्किट किंवा ज्वलनशील मालामुळे आग लागल्याची शक्यता वर्तविण्यात येत असून नेमके कारण शोधण्यासाठी चौकशी सुरू आहे. दरम्यान, या घटनेमुळे नागपूर-सेवाग्राम मार्गावरील रेल्वे वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. महाराष्ट्र एक्सप्रेसला सिंदी स्थानकावर सुमारे अडीच तास थांबविण्यात आले, तर जी.टी. एक्सप्रेसही अडीच तास उशिराने पुढील प्रवासासाठी रवाना झाली.

अचानक उसळलेल्या ज्वाळांनी क्षणभर भीतीचे सावट पसरले मात्र प्रवाशांच्या जागरूकतेने आणि प्रशासनाच्या तत्परतेने एक मोठा अनर्थ टळला, अशीच भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### तेरा वर्षांनी संसारात खडा

## १६ व्या वर्षी पळवली; २९ व्या वर्षी पोलिसांची एन्ट्री : पोलिसांच्या कारवाईने चेहऱ्यावरील हरवले मुस्कान

**वर्धा जनमाध्यम :** सोळाव्या वर्षी फूस लावून पळवून नेलेली मुलगीष्ठ काळाच्या ओघात तब्बल तेरा वर्षे लोटलीष्ठ आणि आता ती २९ वर्षांची झाली असून या धामपत्यांना दोन मुलं आणि एक मुलगी असा सुखी संसार असताना अचानक पोलिसांच्या कारवाईने चेहऱ्यावरील मुस्कान हरवले, या कारवाईमुळे एका कुटुंबाच्या संसारात खळबळ उडाली असून तेरा वर्षे पोलिसांनी काय केले? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

दि. १२ जून २०१३ रोजी पोलीस स्टेशन खरांगणा येथे अल्पवयीन मुलीच्या अपहरणाची तक्रार दाखल झाली होती. किशोर नंदु जाधव (रा. गारपीट, ता. कारंजा) याच्याविरुद्ध भादंवि कलम ३६३, ३६६(अ) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. मात्र आरोपी व मुलगी यांचा माग काढण्यात पोलिसांना यश आले नाही. अखेर ३१ डिसेंबर २०१५ रोजी 'अ फायनल' करण्यात आले; तरी तपास कायम ठेवण्यात आला होता.

दरम्यान, अलीकडे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार आरोपी व संबंधित महिला नारायणगाव (जि. पुणे) येथे वास्तव्यास असल्याचे समोर आले. पोलीस अधीक्षकांच्या सूचनेनुसार पथकाने सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीत महिला त्याच्यासोबत राहत असल्याचे स्पष्ट झाले.

मात्र या कारवाईनंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. १६ वर्षांची असताना पळवून नेलेली मुलगी आज २९ वर्षांची झाली आहे. या काळात दोघेही मुला मुलींसह संसारात स्थिरावल्याची चर्चा आहे. अशा परिस्थितीत तेरा वर्षांनी झालेल्या कारवाइ०मुळे त्यांच्या आयुष्यात मोठी उलथापालथ झाली आहे.

कायद्याच्या दृष्टीने अल्पवयीन मुलीचे अपहरण हा गंभीर गुन्हा असला, तरी दीर्घकाळ प्रकरण प्रलंबित राहिल्यानंतर अचानक झालेल्या कारवाईने सामाजिक व कायदेशीर चर्चांना तोंड फोडले आहे. पुढील तपास पोलीस स्टेशन खरांगणा करीत असून या प्रकरणाकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## सेलूच्या आठवडी बाजारात राडा

**सेलू जनमाध्यम :** सेलू शहरातील मंगळवारच्या आठवडी बाजारात आज नगर पंचायत प्रशासन आणि भाजी विक्रेते यांच्यात मोठा संघर्ष पाहायला मिळाला. प्रशासनाने कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक रस्ते रिकामे करण्याची मोहीम हाती घेतल्याने संतापलेल्या विक्रेत्यांनी आपला भाजीपाला रस्त्यावर फेकून तीव्र निषेध नोंदवला.



सेलू येथील आठवडी बाजार मुख्य रस्त्यावर भरत असल्याने होणारी वाहतूक कोंडी आणि अपघातांचे प्रमाण लक्षात घेता, आज नगर पंचायत प्रशासनाने ॲक्शन मोड मध्ये येत कारवाई केली. सकाळी १० वाजेपासूनच मुख्याधिकारी, कर्मचारी आणि पोलीस ताफा बाजारात दाखल झाला. रस्त्यावर बसणाऱ्या विक्रेत्यांना बाजार तळावरील मोकळ्या जागेत जाण्याचे आदेश देण्यात आले. विक्रेत्यांच्या मते, गेल्या आठवड्यात नगर पंचायत किंवा संबंधित ठेकेदाराकडून याबाबत कोणतीही दवंडी किंवा पूर्वसूचना देण्यात आली नव्हती. अचानक झालेल्या या बदलामुळे विक्रेत्यांची मोठी तारांबळ उडाली. दिवसभर चाललेल्या या तणावानंतर सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास विक्रेत्यांचा संयम सुटला आणि त्यांनी आपला माल रस्त्यावर फेकून प्रशासनाचा निषेध केला प्रशासनाने आम्हाला आधी विश्वासात घ्यायला हवे होते. अचानक उठवल्यामुळे आमचे आर्थिक नुकसान झाले आहे. संतप्त भाजी विक्रेते.

## एकजुटीतूनच संघटनेचा वटवृक्ष उभा राहतो : खा.अमर काळे

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा टाईल्स ॲन्ड ग्रेनाईट कंत्राटदार असोसिएशनच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन खासदार अमर काळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संघटन हीच मोठी शक्ती आहे, असे प्रतिपादन करत त्यांनी संघटनेच्या भविष्यासंदर्भात आशावाद व्यक्त केला.



काळे म्हणाले, कोणतीही चळवळ अथवा संस्था शून्यातून उभी राहते. लहानशा रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर होण्यासाठी वेळ, संयम आणि सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक असतात. संघटनेतील प्रत्येक सदस्याचा सहभाग आणि परस्पर सहकार्य यामुळेच संस्थेची मुळे अधिक भक्कम होतात. सुरुवात करणे सोपे असले तरी विविध स्वभावांच्या व्यक्तींना एकत्र ठेवत संघटना टिकवणे ही मोठी जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. संघटनेने केवळ व्यावसायिक हित जोपासू नये, तर सामाजिक दायित्वही पार पाडावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. विधी सल्लागार ॲड. महेश घाळे यांचे मार्गदर्शन संघटनेसाठी महत्त्वाचे ठरेल, असेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला नगर परिषदेचे अध्यक्ष सुधीर पांगुळ, संघटनेचे अध्यक्ष सचिन उडाण व नेगी तसेच पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. उद्घाटनानंतर संघटनेच्या भावी उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली.

## बंधन बँक : कोटक महिंद्रा लाइफ इन्शुरन्सचा 'केमिकल लोचा' उघड

### मृत्यूनंतरही विम्यासाठी वारसदाराची अकरा महिन्यांची फरफट; सेलूत संतापाचा स्फोट

**सेलू जनमाध्यम :** कर्ज देताना चुटकीसरशी प्रोसेसिंग फी आणि विम्याचा हप्ता कपात करणाऱ्या बँका, पण लाभ देण्याची वेळ आली की हात झटकतात सेलू शहरात उघडकीस आलेल्या एका प्रकरणामुळे बँकिंग व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. मृत्यूनंतरही विम्याची रक्कम मिळवण्यासाठी वारसदाराला तब्बल अकरा महिने बँकेचे उंबरठे झिजवावे लागत आहेत.

सेलू येथील मेघा बडे यांनी सुमारे वर्षभरापूर्वी स्थानिक शाखेतून ६५ हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. कर्ज मंजुरीवेळी प्रोसेसिंग फीबरोबरच विम्याचा हप्ता कपात करण्यात आला. त्यांच्या नावावर कोटक महिंद्रा लाइफ इन्शुरन्सकडून एक लाख रुपयांचा विमा उतरविण्यात आला होता. बडे यांनी १३ हफ्ते नियमित भरले. मात्र, अचानक निधनानंतर कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला.



**खाते उघडायला दहा महिने : कोण जबाबदार?**

विम्याचा लाभ मिळवण्यासाठी नॉमिनीचे खाते असणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. पण हे खाते उघडण्यासाठी तब्बल दहा महिने लोटले. वारंवार कागदपत्रांची मागणी, नव्या अटी, अधिकाऱ्यांच्या भेटी या प्रक्रियेत वारसदाराची अक्षरशः दमछाक झाली.

खाते उघडल्यानंतरही उर्वरित कर्जरकमेबाबत लेखी अर्ज घेण्यात आला. त्या प्रक्रियेलाही दीड महिना उलटून गेला. तरीदेखील विम्याची रक्कम आजपर्यंत खात्यात जमा झालेली नाही.

**बँक म्हणते : आमची प्रक्रिया पूर्ण-** या संदर्भात बँकेच्या एरिया मॅनेजर यांनी सांगितले की, आमच्या बँकेची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. आता विषय विमा कंपनीचा आहे. विम्याचा लाभ कधी मिळेल, हे सांगता येणार नाही.

मात्र हा दावा ऐकून नागरिक अधिकच संतप्त झाले आहेत. कर्ज मंजुरीच्या वेळी दोन्ही संस्थांमध्ये समन्वय असतो, मग लाभ देताना का नाही, बँक आणि विमा कंपनी यांच्यातील या 'केमिकल लोचा'चा फटका मात्र सामान्य कुटुंबाला बसत आहे.

**न्यायासाठी अकरा महिन्यांची झुंज-** हफ्ते वेळेवर भरले, विम्याचे पैसे कपात झाले. मग लाभ मिळवण्यासाठी एवढी पायपीट का असा प्रश्न कुटुंबीयांनी उपस्थित केला आहे. संबंधित यंत्रणांनी तातडीने हस्तक्षेप करून वारसदाराला विम्याची रक्कम द्यावी, अशी मागणी होत आहे.सेलूत घडलेले हे प्रकरण बँकिंग व्यवस्थेतील ढिलाईचे प्रतीक ठरत असून, आता प्रशासन काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### सलग दुसऱ्यांदा ५० लाखांचा मान

## माझी वसुंधरा अभियानात मिर्झापूर नेरीचा राज्यात झेंडा

**२१ फेब्रुवारीला मुंबईत मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार दिमाखात गौरव सोहळा**

**आर्वी जनमाध्यम :** पर्यावरण संवर्धनाच्या वाटेवर सातत्य, नियोजन आणि लोकसहभागाची ताकद काय असते, याचा आदर्श नमुना आर्वी पंचायत समिती अंतर्गत मिर्झापूर नेरी या गावाने उभा केला आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या माझी वसुंधरा अभियान ५.० मध्ये राज्यस्तरीय प्रथम क्रमांक पटकावत गावाने तब्बल ५० लाख रुपयांचा पुरस्कार सलग दुसऱ्यांदा मिळवला आहे.

यापूर्वी ४.० अंतर्गतही ५० लाखांचे बक्षीस पटकावून इतिहास घडवणाऱ्या या गावाने यंदाही तीच परंपरा कायम राखली. २१ फेब्रुवारी रोजी मुंबई येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भव्य शासकीय सोहळ्यात पुरस्कार वितरण होणार आहे. ग्रामपंचायतीला अधिकृत निमंत्रण प्राप्त झाल्याची माहिती ग्रामपंचायत अधिकारी संजय यावले यांनी दिली. हा सन्मान मिर्झापूरवासीयांच्या एकजुटीचा आहे, असे सरपंच बाळा सोनटक्के यांनी सांगितले. आमदार सुमित वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांनी जिद्द, चिकाटी आणि नियोजनबद्ध कामाच्या जोरावर पर्यावरणपूरक उपक्रम राबवले. जलसंधारण, वृक्षारोपण, स्वच्छता आणि ऊर्जा बचतीसारख्या उपक्रमांत गावाने लक्षणीय प्रगती साधली. याच अभियानात उत्कृष्ट कार्याबद्दल आर्वी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रदीप चव्हाण यांनाही विशेष पुरस्कार जाहीर झाला आहे. हा केवळ माझा नव्हे, तर संपूर्ण टीमचा विजय आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. सलग दोन वेळा ५० लाखांचा मान मिळवत मिर्झापूर नेरीने पर्यावरण संवर्धनाच्या नकाशावर आपले नाव ठळकपणे उमटवले आहे.

## ग्रामीण महिलांच्या स्वप्नांना 'उमेद'ची हक्काची छत; वर्धेत उभारला जाणार भव्य उमेद मॉल

**वर्धा जनमाध्यम :** चुलीभोवती फिरणाऱ्या हातांनी आता उद्योगाची मशाल पेटवली आहे. बचत गटांच्या माध्यमातून स्वतःचे विश्व उभारणाऱ्या ग्रामीण महिलांना आता स्वतःची हक्काची बाजारपेठ मिळणार आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान उमेद अंतर्गत वर्धा येथे 'उमेद मॉल' उभारण्याचा शासनाचा निर्णय जिल्ह्यासाठी ऐतिहासिक ठरत आहे.

पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे वर्ध्याचा पहिल्या टप्प्यातील १३ जिल्ह्यांमध्ये समावेश झाला आहे. मॉल मंजुरीबद्दल त्यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांची भेट घेऊन कृतज्ञता व्यक्त केली.जिल्ह्यात सध्या १४ हजार ३०९ स्वयं सहाय्यता समूह, ९५२ ग्रामसंघ व ४९ प्रभाग संघ कार्यरत आहेत. महिलांनी १२ हजार ३१० वैयक्तिक व १६५ सामूहिक उद्योग सुरू करून स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारला आहे. 'वर्धिनी' या ब्रँडअंतर्गत तयार होणाऱ्या वस्तूंची विक्री उमेद मार्टसह Flipkart ke Amazon यांसारख्या माध्यमातून होत असली, तरी कायमस्वरूपी विक्रीस्थळाची गरज प्रकर्षाने जाणवत होती.

१० ऑक्टोबर २०२२ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मॉलची मागणी करण्यात आली होती. त्यानंतर सातत्याने पाठपुरावा करून अखेर शासनाने हिरवा कंदील दिला. बॅचलर रोडवरील मनग संग्रहालयाजवळ सुमारे १० हजार चौरस फूट जागेवर हा मॉल उभारला जाणार आहे.

**वाचा :-**भारत सरकार विधी व न्यायविभाग यांचे कडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र
२. जन्म - मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा, २०२३ (२०२३ चा २०) चा खंड १
३. मा. जिल्हादंडाधिकारी, वर्धा यांचे आदेश क्रमांक कक्ष-२ब/म. सहा/गृह/कावि-३५०/२०२५ दिनांक १७/०३/२०२५

## जाहिरनामा

**ज्याअर्थी अर्जदार गौरव नारायण टेकाम, रा. परसोडी (टे.), ता. आर्वी, जि. वर्धा.** यांनी त्यांच्या अर्जात नमूद केले आहे कि, **त्यांचे आजोबा नामे बापुराव अंतु टेकाम यांचा मृत्यु दि. २३/०६/१९९८ रोजी ग्राम पंचायत परसोडी (टे.), ता. आर्वी, जि. वर्धा.** येथे नोंद उपलब्ध नसुन त्यांच्या जन्म- मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) नूसार मृत्युची नोंद करण्याबाबत प्रकरण दाखल केले आहे.

त्याअर्थी, उपरोक्त वाचा क्रमांक १ व २ नुसार व ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीच्या मृत्युची नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तालुका दंडाधिकारी, आर्वी यांचे न्यायालयात स्वतः जातीने/ वकीला मार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामा प्रसिध्दी पासून ३० दिवसाचे आत कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

विहीत मुदतीत आक्षेप/हरकती प्राप्त न झाल्यास मृत्यु बाबतची नोंद घेनेकामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरुन प्रस्तावित मृत्यु नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल. मुदती नंतर प्राप्त झालेले आक्षेप किंवा उजर विचारात घेतले जानार नाही, याची नोंद घ्यावी.

**साईकिरण आवुलवार**
**नायब तहसीलदार, आर्वी**

## जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार श्री. धनंजय पुरुषोत्तमराव बावणे यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणे: मौजा वर्धा (शहर), मौजा नं. ८५, ता. व जि.वर्धा नगर परिषद येथील वार्ड कं. ७ मधिल मालमत्ता कं. जुना ०७०००१६५ नविन ०७-१५२ शिट कं. ४९ भुखंड कं. ११३४ एकूण आराजी १५८.३५ चौ. मी. म्हणजेच १७०३.८४ चौ. फुट असुन त्याची

**चतुःर्सिमा :-**
पुर्वेसः नगर परिषद रोड,
पश्चिमेसः श्री. गवते यांचे मकान,
उत्तरेसः श्री. जिकार यांचे मकान,
दक्षिणेसः श्री. अनिल पांडे यांचे मकान,

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. ३१,५०,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून तीन दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**
**साई नगर वर्धा**
**मो. नं. ९८६००४१३६१**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मुंबई ठरणार जागतिक भांडवलासाठीचे प्रवेशद्वार-मुख्यमंत्री

■ भविष्यातील जागतिक व्यवस्था कॉरिडॉर-आधारित, महाराष्ट्राची भूमिका निणार्यक

■ मंत्री, मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत ग्लोबल इकॉनॉमिक कोऑपरेशन 2026 परिषदेचे उद्घाटन

**मुंबई/प्रतिनिधी :** जागतिकीकरणाच्या नव्या टप्प्यात विश्वासार्ह जागतिकीकरण ही संकल्पना पुढे येत असून महाराष्ट्राचे धोरणात्मक महत्त्व अधोरेखित होते. महाराष्ट्र भारताच्या जीडीपीमध्ये १४ ते १५ टक्के योगदान देतो. परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र आघाडीवर आहे. देशाच्या औद्योगिक उत्पादनात २० टक्के वाटा आणि पश्चिमेकडील बंदरांमधून ६० टक्क्यांहून अधिक कंटेनर वाहतूक महाराष्ट्रातून होते. मुंबई येत्या काळात जागतिक भांडवलाचे प्रवेशद्वार ठरणार आहे. मुंबई आणि महाराष्ट्र जागतिक आर्थिक स्थैर्य घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल.



बहुध्रुवीय जगात विश्वासार्ह भागीदारीच यशस्वी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. विदेश मंत्रालय, फ्युचर इकानामिक कोऑपरेशन कौन्सिल आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय ग्लोबल इकानामिक को-ऑपरेशन परिषदेचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांच्या प्रमुख उपस्थित करण्यात आले. यावेळी एफइसीआयसीचे कार्यकारी संचालक विजय चौथाईवाले, एफइसीआयसीच्या सल्लागार मंडळाचे सदस्य बाबा कल्याणी, आदिल झैनुलभाई, सायरिल श्राफ, प्रतिनिधी, उद्योग क्षेत्रातील नेते, राजनैतिक समुदायाचे सदस्य आणि जागतिक भागीदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**परिषदेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा शुभेच्छा संदेश**

**जगासाठी भारत आशेचा किरण**

परराष्ट्र व्यवहार मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने फ्युचर इकानामिक को-ऑपरेशन कौन्सिल (एफईसीसी) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या उद्घाटनात्मक ग्लोबल इकानामिक को-ऑपरेशन (जीईसी) परिषद जागतिक पातळीवर झपाट्याने घडणा-या बदलांच्या पार्श्वभूमीवर सखोल आंतरराष्ट्रीय आर्थिक संवादाला चालना देण्यासाठी एक महत्वपूर्ण पाउल आहे. व्यापक आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी ही परिषद उच्चस्तरीय व्यासपीठ म्हणून कार्य करते. ही परिषद धोरणात्मक नवोन्मेष आणि आर्थिक संधी यांच्या संगमावर विविध क्षेत्रांतील मंत्री, वरिष्ठ धोरणनिर्माते, अग्रगण्य अर्थतज्ज्ञ, जागतिक उद्योगनेते, गुंतवणूकदार आणि धोरणात्मक प्रतिनिधींना एकत्र आणते. अनिश्चिततेच्या काळात स्थिर नेतृत्वाच्या शोधात असलेल्या जगासाठी भारत आशेचा किरण ठरला आहे. उच्च आर्थिक वाढ आणि कमी महागाई यांचा दुर्मिळ समतोल राखत, भारत जागतिक आव्हानांसाठी व्यावहारिक आणि विस्तारक्षम उपाय प्रदान करत आहे. एक मोठे आव्हान म्हणजे कोणालाही मागे न ठेवता जास्तीत जास्त लोकांपर्यंत कल्याणकारी योजना पोहोचवणे आणि ते कार्यक्षमतेने साध्य करणे. भारताने जागतिक दर्जाच्या डिजिटल सार्वजनिक



पायाभूत सुविधांच्या माध्यमातून उद्दिष्ट हे वास्तवात उतरवले आहे. पारदर्शकता आणि जबाबदारीसह एकाच क्लिकवर नागरिकांपर्यंत कल्याणकारी लाभ पोहोचवले जात आहेत.

आज भारत हा जगातील सर्वात वेगाने वाढणा-या प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक आहे आणि शाश्वतता ही त्याच्या प्रगतीच्या केंद्रस्थानी आहे. देशाच्या एकूण स्थापित उर्जा क्षमतेपैकी ५० टक्क्यांहून अधिक हिस्सा अपारंपरिक (नान-फासिल) उर्जा स्रोतांमधून येतो, ज्यामुळे हा टप्पा गाठणा-या प्रमुख देशांमध्ये भारत अग्रस्थानी आहे. भारत आता ग्लोबल साउथचा आत्मविश्वासपूर्ण आणि विश्वासार्ह आवाज म्हणून उदयास आला आहे. विविध सहभाग आणि दूरदृष्टीपूर्ण अजेंड्याच्या माध्यमातून अधिक संतुलित आणि सर्वसमावेशक जागतिक व्यवस्थेला आकार देण्यात भारत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. ग्लोबल इकानामिक को-ऑपरेशन परिषद अर्थव्यवस्थांमधील एक महत्त्वाचा दुवा ठरू शकते . कल्पना, भांडवल आणि नवोन्मेष यांना जोडत अधिक सहकार्यपूर्ण आणि परस्परसंलग्न जागतिक आर्थिक भविष्यासाठी भक्कम पाया घालू शकते. या परिषदेत यशस्वी आणि परिणामकारक चर्चेसाठी प्रधानमंत्री यांनी शुभेच्छा दिल्या.

**पारदर्शकता, नियमन आणि व्यापकता यात मुंबई आघाडीवर-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आर्थिक सार्वभौमत्व म्हणजे आत्मनिर्भरता नव्हे; तर विविधीकृत व्यापार, उत्पादन क्षमता, उर्जा सुरक्षा आणि तंत्रज्ञान क्षमता यांचे संतुलित संयोजन होय. धोरणात्मक स्वायत्तता आणि सहकार्यपूर्ण सहभाग. हाच दृष्टिकोन महाराष्ट्र स्वीकारतो. भविष्यातील जागतिक व्यवस्था कारिडार-आधारित असेल; भविष्यात महाराष्ट्र महत्वाची भूमिका पार पाडेल. आर्थिक लवचिकता प्रभावी ठरेल. पारदर्शकता, नियमन आणि व्यापकता यात मुंबई आघाडीवर राहील.

मुंबई समुद्री व्यापार, उद्योजकता आणि जागतिक सहभाग यांची परंपरा असलेले शहर आहे. येथून एक स्थिर, सर्वसमावेशक आणि रणनीतिकदृष्ट्या सक्षम आर्थिक व्यवस्था घडवू. बहुध्रुवीय जग हा धोका नाही; योग्य रचनेत ती एक संधी आहे. आणि त्या संधीची रचना करण्यासाठी महाराष्ट्र सज्ज आहे,असा विश्वास यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा गव्हर्नन्स, सेमिकंडक्टर साखळी आणि कौशल्यपूर्ण मानवसंपत्ती यांचे संयोजन भविष्यातील शक्ती ठरवेल. महाराष्ट्र एआय पार्क, डेटा सेंटर क्लस्टर आणि कौशल्य विद्यापीठे उभारत आहे. तसेच हवामान बदल ही आता केवळ पर्यावरणीय नव्हे तर भूराजकीय बाब बनली आहे. ग्रीन हायड्रोजन, सौर आणि पवन उर्जा, हरित गतिशीलता आणि शाश्वत शहरी पायाभूत सुविधा यामध्ये महाराष्ट्र मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सद्यस्थितीत जागतिक व्यवस्था नव्याने आकार घेत आहे. जागतिक व्यापाराची वाढ मोठ्या उलथापालथीतून जात आहे. पुरवठा साखळ्या नव्याने रचल्या जात आहेत. सेमिकंडक्टर, उर्जा, अन्नसुरक्षा, दुर्मिळ खनिजे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारखे धोरणात्मक क्षेत्र आता राष्ट्रीय सुरक्षेच्या धोरणांमध्ये अंतर्भूत झाले आहेत. भांडवली प्रवाह केवळ परताव्यावर नाही, तर भूराजकीय संरेखनावर आधारित होत आहेत. हे आर्थिक राज्यकारभाराचे युग आहे. या युगात भारताची प्रगती ही संरचनात्मक आहे.

## भारताने पुढे केला मैत्रीचा हात

### *बांगलादेशचे पंतप्रधान तारिक रहमान यांना दिल्ली दौ-याचे आमंत्रण*

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**बांग्लादेशात राजकीय सत्तांतरानंतर आज अखेर तारिक रहमान यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली. या शपथविधीसह मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील अंतरिम सरकारचा १८ महिन्यांचा कार्यकाळ समाप्त झाला. या संपूर्ण काळात देशात राजकीय अनिश्चितता आणि अस्थिरतेचे वातावरण होते. मात्र, आता नवीन सरकारकडून स्थैर्याची अपेक्षा केली जात आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी मंगळवारी (१७ फेब्रुवारी) बांग्लादेशाचे नवनिर्वाचित पंतप्रधान तारिक रहमान यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे वैयक्तिक अभिनंदनपत्र तारिक रहमान यांच्याकडे सुपूर्द केले. ओम बिर्ला हे परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांच्यासह भारत सरकारच्या वतीने रहमान यांच्या शपथविधी समारंभाला उपस्थित होते. या दौ-यात त्यांनी मालदीवचे राष्ट्रपती, भूतानचे पंतप्रधान तसेच इतर देशांच्या नेत्यांशीही चर्चा केली.लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी 'X' (माजी ट्विटर) वर पोस्ट करत सांगितले की, बांग्लादेशचे पंतप्रधान तारिक रहमान यांच्याशी अत्यंत सकारात्मक आणि अर्थपूर्ण चर्चा झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे वैयक्तिक पत्र त्यांना सुपूर्द करण्यात आले असून, त्यात लवकरात लवकर भारत दौ-याचे आमंत्रण देण्यात आले आहे.



## मनोज जरांगे पाटील यांनी दिला आंदोलनाचा इशारा

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठा आंदोलनाचे नेतृत्व करणारे मनोज जरांगे पाटील यांनी अद्यापही प्रमाणपत्रांचे अपेक्षित पद्धतीने वाटप होत नसल्याबाबत पुन्हा एकदा आक्रमक भूमिका घेतली आहे. अधिवेशनानंतर ठोस निर्णय झाला नाही, तर पुन्हा आंदोलन उभे करण्याचा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला असल्याचे म्हटले जात आहे. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी चर्चा केली. कॅबिनेटमध्ये हा विषय घेतो, असे आश्वासन दिले आहे. एकनाथ शिंदे आणि विखे पाटील यांनी मराठवाड्यातील सर्व मराठे कुणबी असल्याचे मान्य करून गॅझेटनुसार आरक्षण देउ असे म्हटले होते. मात्र अर्ज देउनही प्रमाणपत्र आणि व्हॅलिडिटी जाणूनबुजून दिली जात नाही, असा दावा मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. अधिवेशनानंतर प्रमाणपत्र वाटपाचा निर्णय झाला नाही तर आम्हाला पुन्हा आंदोलन करावे लागेल. त्याची मोठी राजकीय किंमत मोजावी लागेल. शिंदे समितीला मुदतवाढ देउनही नोंदी का सापडत नाहीत? याचे उत्तर द्यावे; अन्यथा आंदोलन अपरिहार्य होईल. मराठा आरक्षणावरून सरकारमधील काहींची पोटदुखी असू शकते. मात्र गोरगरीबांचा अवमान सहन केला जाणार नाही, असे मनोज जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले. दरम्यान, रक्ताने हात भरलेल्या लोकांना सरकार का सांभाळेल? भाजपमध्ये गेले तरी भाजप का मंत्रीपद देईल? संतोष देशमुख यांना अजून न्याय नाही. फक्त मंत्रिपद द्यायचे म्हटले होते तर अजितदादांचा पक्ष एवढा ट्रोल झाला. त्यामुळे मंत्रिपद दिले तर पक्ष संपेल. रक्ताने हात भरलेल्या लोकांवर कधीच बोलायचे नाही यामुळे माझा दिवस चांगला जात नाही. आम्ही पूर्ण माहिती घेत आहोत. धनंजय मुंडे यांनी आमच्या नादी लागू नये. मी जर मागे लागलो तर माझ्याजवळ २२ पेक्षा अधिक प्रकरण आलेली आहेत, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांना दिला.



### नागपूरमध्ये थरारक स्टंटचा दुर्दैवी शेवट!

## बुलेटवर कट मारताना भीषण अपघात दोन 19 वर्षीय तरुणांचा मृत्यू

**नागपूर :** शहरात रात्री उशिरा बेफाम स्टंटबाजी करताना दोन तरुणांचा जीव गेला, आणि या धक्कादायक घटनेने नागपूरकरांमध्ये दुःख आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शनिवारच्या रात्री काचिपुरा परिसरातून वर्धा रस्त्यावर बुलेटवरून स्टंट करताना एका महिला दुचाकीस्वाराला कट मारण्याचा प्रयत्न करत असताना नियंत्रण चुकल्याने भीषण अपघात झाला. त्या धडकेत दोन्ही बुलेटस्वार १९ वर्षीय युग विशाल चनकापूर आणि १९ वर्षीय रुद्र शशिकांत सोमकुंवर यांचा जागीच मृत्यू झाला.घटनास्थळी पोहचलेल्या स्थानिकांनी ताबडतोब दोन्ही जखमी तरुणांना जवळच्या रुग्णालयात नेले असता, डाक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अपघातानंतर परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते, कारण स्टंटबाजी करताना वाहनधारक वेगवान गतीने सिग्नल जंप करीत होते. पोलीस तपास करत असून बजाज नगर पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार नोंदवण्यात आली आहे. प्राथमिक चौकशीत असे लक्षात आले आहे की, हा अपघात पूर्णपणे वेग आणि निष्काळजीपणामुळे झाला आहे. नागपूरमध्ये युवा पिढीचा स्टंटबाजीप्रती वाढता कल आणि रस्त्यावर अशा प्रकारच्या धोकादायक प्रयोगांचा परिणाम पुन्हा एकदा नकळत जीव घेउन गेला.

## विलीनीकरणाची चर्चा अन् सुनेत्रा पवार, पार्थ पवार फडणवीसांच्या भेटीला

**मुंबई/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार या आता राजकारणात सक्रीय झालेल्या पाहायला मिळत आहे. मंत्रिमंडळ बैठक, पुणे आणि बीड जिल्ह्याची बैठक यात त्यांनी सहभाग नोंदवला. तसेच राज्यातील ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र देण्यात आल्या प्रकरणाची सुनेत्रा पवार यांनी गंभीर दखल घेउन दोषींवर कारवाई करण्याचे निर्देश दिले. याशिवाय दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विलीनीकरणाच्या चर्चा अद्यापही राजकीय वर्तुळात सुरू आहेत. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आणि पार्थ पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली.

उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या अपघाताची केंद्रीय तपास यंत्रणेमार्फत चौकशी व्हावी, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत निवेदन सादर केले. यावेळी पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ तसेच पार्थ पवार उपस्थित होते. अपघाताच्या घटनेची सखोल आणि निष्पक्ष चौकशी



व्हावी, तसेच सत्य परिस्थिती जनतेसमोर यावी, यासाठी प्रकरण सीबीआयकडे सोपविण्याची मागणी शिष्टमंडळाने केली. याबाबत सुनील तटकरे यांनी पत्रकारांना माहिती दिली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, ज्येष्ठ मंत्री हसन मुश्रीफ आणि पार्थ पवार अशा सर्वांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. अजित पवार यांचा अपघाती मृत्यू झाला, त्याबाबत आम्ही मुख्यमंत्र्यांना एक निवेदन दिले. या पूर्ण प्रकरणाची सीबीआयच्या माध्यमातून चौकशी करावी, अशी मागणी आम्ही केलेली आहे. निवेदनाची दखल घेत राज्य सरकार केंद्र सरकारकडे अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूची चौकशी करण्याची मागणी करणार आहे. तसा पत्रव्यवहार केला जाईल. मुख्यमंत्री या नात्याने देवेंद्र फडणवीस यांच्याकडून तशी पावले उचलली जातील, असे सुनील तटकरे यांनी सांगितले. दरम्यान, राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या तात्काळ चर्चेला ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी नकार दिला आहे. याचा सर्वस्वी निर्णय सुनेत्रा पवार यांच्यावर अवलंबून असेल. प्राधान्याने पक्ष हा सुनेत्रा पवार यांचे नेतृत्व मजबूत करणे आणि राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून त्यांची निवड करणे यादृष्टीने काम करत आहे. राष्ट्रीय अध्यक्ष निवडल्यानंतरच विलीनीकरणाचा मुद्दा हाती घेतला जाईल आणि निर्णय त्या घेतील असे भुजबळांनी स्पष्ट केले.

## आता एव्हरेस्टच्या उंचीवर झेपावणारे हेलिकॉप्टर भारतात बनणार

**मुंबई/प्रतिनिधी :**भारत आणि फ्रान्स यांच्यातील सहकार्याची व्याप्ती मंगळवारी एका ऐतिहासिक टप्प्यावर पोहोचली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रान यांनी कर्नाटकच्या वेमगल येथे एअरबस एच१२५ हेलिकॉटरच्या असेंब्ली लाईनचे व्हर्च्युअल पद्धतीने उद्घाटन केले. मेक इन इंडिया अंतर्गत सुरू झालेला हा प्रकल्प भारताच्या संरक्षण आणि नागरी विमान वाहतूक क्षेत्रात क्रांती घडवणारा ठरणार आहे.



यावेळी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, 'भारत आणि फ्रान्स आता मिळून अशा हेलिकाप्टरची निर्मिती करतील जे माउंट एव्हरेस्टच्या उंचीवरही सहज उडू शकेल.' हे हेलिकाप्टर भारताच्या अतिउंच हिमालयीन सीमा आणि दुर्गम भागातील सुरक्षेसाठी गेम चेंजर ठरणार आहे.

**टाटा आणि एअरबसची मोठी भागीदारी**

हा प्रकल्प टाटा अॅडव्हान्स्ड सिस्टिम्स लिमिटेड आणि एअरबस यांचा संयुक्त उपक्रम आहे. महत्त्वाचे म्हणजे, खासगी क्षेत्रात हेलिकॉप्टर निर्मितीचा हा देशातील पहिलाच कारखाना आहे. गुजरातच्या वडोदरा येथील क२९५ मालवाहू विमानांच्या प्रकल्पानंतर टाटा-एअरबसची ही दुसरी मोठी भागीदारी आहे.

एच १२५ हे जगातील एकमेव हेलिकाप्टर आहे ज्याने माउंट एव्हरेस्टच्या शिखरावर यशस्वी लँडिंग करण्याचा जागतिक विक्रम केला आहे. हे हेलिकाप्टर ताशी २५० किमी वेगाने उडू शकते आणि एका प्रवासात ६६२ किमी (बंगळुरू ते हैदराबाद इतके) अंतर कापू शकते. राजस्थानची कडक उष्णता असो वा हिमालयातील गोठवणारी थंडी, हे हेलिकॉप्टर कोणत्याही परिस्थितीत काम करण्यास सक्षम आहे. शोध आणि बचाव कार्य, एअर अॅम्ब्युलन्स, कायदा आणि सुव्यवस्था, अग्निशमन आणि पर्यटनासाठी याचा वापर केला जातो. वेमगल येथील कारखान्यात नागरी हेलिकाप्टरसोबतच लष्करी उपयोगासाठी एच १२५ एमची निर्मितीही केली जाईल. हे हेलिकॉप्टर शत्रुच्या रडारपासून वाचण्यासाठी जमिनीला लागून उडू शकते. यात क्षेपणास्त्रे, रॉकेट आणि गनपॉड बसवण्याची सोय असून, हिमालयातील थंडीत तैनात असलेल्या जवानांसाठी हे वरदान ठरेल.

## देशातील पहिल्या मुंबई क्लायमेट वीकचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**मुंबई/प्रतिनिधी :** हवामान बदलाच्या वाढत्या आव्हानांना उत्तर देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कृती आवश्यक असून मुंबई क्लायमेट वीक हा त्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. हवामान बदलावरील कृती कार्यक्रमाचे नेतृत्व करण्यास महाराष्ट्र तयार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. हवामान कृती ही केवळ पर्यावरणीय जबाबदारी नसून भविष्यातील आर्थिक स्पर्धात्मकतेची किल्ली असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.मुंबई क्लायमेट वीकचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय उर्जा मंत्री प्रल्हाद जोशी, राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे, प्रोजेक्ट मुंबईचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी शिशिर जोशी, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, मुंबईच्या महापौर रितू तावडे, एमएमआरडीएचे महानगर आयुक्त संजय मुखर्जी, संयुक्त राष्ट्र संघाच्या पर्यावरण कार्यक्रम विभागाचे संचालक मार्टिन क्रु से आदी मान्यवर उपस्थित होते.मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, मुंबईसारख्या किनारी महानगराला हवामान बदलाचा फटका बसत आहे. अतिवृष्टीमुळे वाहतूक व्यवस्था विस्कळीत होणे, घरे पाण्याखाली जाणे, व्यवसाय ठप्प होणे आणि उपजीविकेवर परिणाम होणे ही परिस्थिती वारंवार दिसत आहे. उष्णतेच्या लाटांचा परिणाम बांधकाम कामगार, फेरीवाले आणि शेतकरी यांच्यावर होत आहे. ग्रामीण भागात अवकाळी पावसामुळे कापणी केलेली पिके नष्ट होतात, ज्याचा मोठा आर्थिक व सामाजिक परिणाम होतो. त्यामुळे हवामान बदल हा आज प्रशासनासमोरील गंभीर प्रश्न बनला आहे.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने आर्थिक विकास आणि पर्यावरणीय जबाबदारी यांचा समतोल साधण्याचा मार्ग स्वीकारल्याचे त्यांनी सांगितले. देशाने अक्षय उर्जेच्या क्षेत्रात झपाट्याने प्रगती केली असून स्वच्छ उर्जेच्या विस्तारामुळे भारत जागतिक स्तरावर आघाडीवर आहे. महाराष्ट्रही या परिवर्तनात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सध्या राज्यात मोठ्या प्रमाणावर उर्जा क्षमता उभारण्यात आली असून २०३० पर्यंत हरित



उर्जेचा वाटा ५० टक्क्यांहून अधिक करण्याचे उद्दिष्ट आहे. यासाठी स्वच्छ हायड्रोजन, इलेक्ट्रिक वाहतूक, जैवइंधन आणि शाश्वत पायाभूत सुविधांवर भर दिला जात असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र हवामान कृतीकडे केवळ नियमांचे पालन म्हणून पाहत नाही, तर ती गुंतवणूक, नवकल्पना आणि रोजगारनिर्मितीची मोठी संधी मानतो. जागतिक भांडवल शाश्वत बाजारपेठांकडे वळत असून कमी कार्बन तंत्रज्ञानामुळे स्वच्छ उपाय अधिक परवडणारे होत आहेत. जे राज्य वेगाने बदल स्वीकारतील, ते भांडवल आणि कौशल्य आकर्षित करतील. महाराष्ट्र या परिवर्तनाचे नेतृत्व करेल.राज्यात औद्योगिक क्षेत्रात अक्षय उर्जेचा वापर वाढवणे, शहरांमध्ये इलेक्ट्रिक मोबिलिटीला चालना देणे, सार्वजनिक वाहतूक व लॉजिस्टिक प्रणाली अधिक पर्यावरणपूरक करणे यावर भर दिला जात आहे. पूरनियंत्रण व्यवस्था, हवामान स्मार्ट नागरी नियोजन आणि डेटा आधारित अंदाज प्रणाली विकसित करण्याचे काम सुरू आहे. मुंबई महानगर क्षेत्रातील मोठ्या पायाभूत प्रकल्पांमध्ये सुरु वातीपासूनच शाश्वतता आणि आपत्ती प्रतिकारक्षमता यांचा समावेश केला जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

## चौथे विश्व मराठी संमेलन नाशिकमध्ये होणार-डॉ.उदय सामंत

**मुंबई/प्रतिनिधी :**चौथे विश्व मराठी संमेलन यावर्षी नाशिकमध्ये होत असून, हे संमेलन २६, २७, २८ फेब्रुवारी आणि १ मार्च २०२६ या कालावधीत होणार आहे. या चार दिवसांच्या कालावधीत आणि मराठी भाषा दिना निमित्ताने २०२५ चे विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांना, श्री.पु.भागवत पुरस्कार नांदेड येथील निर्मल प्रकाशन संस्थेस, डा.अशोक केळकर भाषा अभ्यासक पुरस्कार डा.दिलीप धोंगडे आणि आपटे वाचन मंदिर, कविवर्य मंगेश पाडगांवकर भाषा संवर्धक पुरस्कार विनोद नारायण कुलकर्णी आणि कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद याच बरोबर २०२४ चे स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाड्मय पुरस्कार देण्यात येणार असल्याची घोषणा मराठी भाषा मंत्री डा.उदय सामंत यांनी मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत केली. मराठी भाषा मंत्री ड?. सामंत म्हणाले, २०२५ यावर्षीचा साहित्यभूषण पुरस्कार ज्येष्ठ साहित्यक भालचंद्र नेमाडे यांना देण्यात येणार असून या पुरस्काराचे स्वरुप मानपत्र, सन्मानचिन्ह आणि दहा लाख रुपये असे आहे. तसेच



कलारत्न पुरस्कार संगीतकार अजय आणि अतुल गोगावले यांना देणात येणार असून या पुरस्काराचे स्वरुप मानपत्र, सन्मानचिन्ह आणि पाच लाख रुपये असे आहे. यावर्षीपासून विश्व मराठी संमेलन विशेष पुरस्कार सुरू करण्यात येत तो आंळदी येथील शांतीब्रह्म गुरुवर्य मारुती बाबा कूरेकर यांना देण्यात येणार असून या पुरस्काराचे स्वरुप मानपत्र, सन्मानचिन्ह आणि पाच लाख रुपये असे आहे. तर डा.अशोक केळकर भाषा अभ्यासक पुरस्कार डा.दिलीप धोंगडे आणि आपटे वाचन मंदिर यांना, तसेच कविवर्य मंगेश पाडगांवकर भाषा संवर्धक पुरस्कार विनोद नारायण कुलकर्णी आणि कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषद यांना जाहीर करण्यात आला असून या पुरस्काराचे स्वरुप मानपत्र, सन्मानचिन्ह आणि दोन लाख रुपये असे आहे. नाशिक येथे १५ फेब्रुवारी २०२६ रोजी पुरस्कार निवड समितीच्या बैठकीत साहित्यक आणि संस्थांची निवड करण्यात आली. २०२४ चे देण्यात येणा-या स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाड्मय पुरस्कार प्रकारातील प्रोढ वाड्मय (२२), बाल वाड्मय (६), प्रथम प्रकाशन (६), सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार (१) अशे एकूण ३५ पुरस्कार देण्यात येणार असल्याचे मंत्री डा.सामंत यांनी यावेळी सांगितले.

## सोनं-चांदी स्वस्त होताच सराफा बाजारात गर्दी

**जळगाव -**सध्या सोन्या-चांदीच्या बाजारात मोठी उलथापालथ पाहायला मिळत आहे. अवघ्या काही मिनिटांत मौल्यवान धातूंच्या किमतींमध्ये मोठी घसरण नोंदवली गेल्याने गुंतवणूकदारांसह सर्वसामान्य ग्राहकांचे लक्ष वेधले गेले आहे. लग्नसराईचा हंगाम सुरू असतानाच दरात घसरण झाल्याने दागिने खरेदीसाठी ही मोठी संधी मानली जात आहे.चांदीच्या दरात गेल्या काही दिवसांपासून सातत्याने घसरण सुरू आहे. काही दिवसांपूर्वी उच्चांक गाठणारी चांदी आता मोठ्या प्रमाणात स्वस्त झाली असून, एका झटक्यात प्रति किलो हजारो रुपयांची घसरण नोंदवली गेली आहे. बाजार उघडताच दर घसरल्याने चांदीच्या दरांचा फुगा फुटल्याची चर्चा सुरू आहे. सोन्याच्याही किमतीत हीच परिस्थिती पाहायला मिळत आहे. अधूनमधून थोडीफार वाढ दिसत असली तरी एकूणच सोन्याचा कल घसरणीकडे आहे. उच्चांकावरून खाली आलेले सोन्याचे दर पाहता, गुंतवणूकदार आणि ग्राहक दोघेही पुन्हा एकदा खरेदीकडे वळताना दिसत आहेत. आजच्या व्यवहारात सोन्याच्या दरात सुमारे १,७०० तर चांदीच्या दरात जवळपास ५,००० रुपयांची घसरण झाली आहे. दरातील या घसरणीमुळे जळगावसह राज्यभरातील सराफा बाजारात हालचाल वाढली असून, अनेक ग्राहकांनी खरेदीसाठी दुकानांची वाट धरली आहे. येत्या काळात दर आणखी घसरणार की पुन्हा वाढणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## सत्ताबदलाचा जनादेश

बांगलादेशातील निवडणूक काल उत्साहात पार पडली. लोकांनी मतदानात हिरिरीने भाग घेतला. ही बाब बांगलादेशासाठी निश्चितच चांगली आहे.कारण बांगलादेश हा तेथील हिंदूंसाठी असहिष्णू देश म्हणून ओळखला जात होता. विशेष हिंसाचार न होता ही निवडणूक पार पडली. ही बाब निवडणूक आयोग आणि राज्यकर्त्यांना उत्साहवर्धक वाटल्याची शक्यता आहे. लोकांच्या आकांक्षांचे प्रतिबिंब या निवडणुकीत पडले. ते साध्य करण्याची जबाबदारी तारिक रेहमान यांच्यावर टाकली. त्यात ते कितपत यशस्वी ठरतात हे येणारा काळ सांगेल; परंतु तारिक रेहमान यांनी एक सुरुवात तर केली. बांगलादेश हा भारताच्या शेजारी देशांपैकी एक आहे. गेल्या काही महिन्यांपासून दोन देशांतील वातावरण अत्यंत तणावपूर्ण झाले होते. हिंदूंवर हल्ले चढवण्यात येत होते आणि त्यामुळे हिंदूंमध्ये नाराजी होती. युनुस सरकार केवळ बघ्याची भूमिका घेत होते आणि भारतीय लोकांनी बांगलादेशला जाण्याचे टाळले होते. तारिक रेहमान हे दिवंगत खालिदा झिया यांचे पुत्र. त्यांनी १७ वर्षांच्या देशातून इंग्लंडमध्ये आसरा घेतल्यानंतर मायदेशी परतले आणि त्यांनी आता काल झालेल्या संसदीय निवडणुकीत विजय मिळवला. त्यांच्या बांगलादेश नॅशनालिस्ट पार्टीने सरकार बनवण्याइतपत जागा मिळवल्या आणि आता ते पंतप्रधानपदाची शपथ घेत आहेत.तारिक रेहमान यांचा मुख्य अजेंडा हा आहे, की भारताबरोबरचे संबंध सुरळीत करणे आणि उभय देशांमध्ये पाणी वाटपापासून ते अन्य प्रश्नांवर चर्चा करणे आणि ते सोडवण्याचा प्रयत्न करणे हा आहे. पंतप्रधान मोदी यांनाही तारिक यांनी आपल्या आगामी शपथविधी सोहळ्याला उपस्थित राहण्याचे निमंत्रण पाठवले. रेहमान यांचे सरकार प्रादेशिक सहकार्यासाठी संतुलित दृष्टिकोन बाळगते असे रेहमान यांच्या जवळच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.तारिक रेहमान यांच्या कार्यकाळात बांगलादेश लोकशाही प्रगतिशील होईल अशी आशा पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केली. त्यामुळे आता रेहमान यांच्यावर जास्त जबाबदारी येते. २०२४ मध्ये शेख हसीना यांची पदच्युती आणि पलायनानंतर बांगलादेशात महंमद युनूस या नोबेल शांतता पुरस्कार विजेत्याला बांगलादेशने अंतरीम पंतप्रधान म्हणून निवडले, पण ते पंतप्रधान म्हणून आपली कारकीर्द यशस्वी करू शकले नाही. त्यांच्याच कार्यकाळात बांगलादेशातील हिंदूंवर अनन्वित अत्याचार झाले आणि अनेक हिंदूंना परागंदा व्हावे लागले. आता रेहमान यांना हे सर्व थांबवावे लागेल आणि बांगलादेशात कोणतीही जमात असुरक्षित नाही अशी खात्री पटवून द्यावी लागेल. दोन वर्षांपूर्वी शेख हसीना यांचे सरकार उलथून पडले. आता त्यांचे पुत्र तारिक रेहमान हे पुन्हा पंतप्रधानपदाची शपथ घेत आहेत. मधल्या काळात भरपूर पाणी पुलाखालून वाहून गेले. अर्थात रेहमान यांच्यावरही भ्रष्टाचाराचे आरोप आहेत आणि या आरोपापासून सुटका होण्यासाठीच ते इंग्लंडला पलायन करते झाले. आपली आई शेख हसीना यांच्या निधनापूर्वी दोन दिवस ते बांगलादेशात डॉक्टर पत्नी आणि बॅरिस्टर कन्येसह मायदेशी परतले. तारिक रेहमान यांच्यावर जसे आरोप आहेत तसेच ते त्यांच्या आईवरही होते. पण आता बांगलादेशवासीयांनी त्यांच्या पुत्राला निवडणुकीत विजयी करून सत्ता सोपवली आहे.तारिकचे पंतप्रधान होणे हे बांगलादेशसाठी स्वागतार्ह असले तरीही शेख हसीना घटक भारतासाठी त्रासदायक ठरू शकतो. कारण शेख हसीना यांना भारताने आश्रय दिला आणि हा घटक भारत-बांगलादेश संबंध सुधारण्यातील अडसर ठरू शकतो. त्यामुळे पंतप्रधान मोदी यांनी त्वरित रेहमान यांचे अभिनंदन केले. भारत-बांगलादेश संबंध रूळावर आणण्याची उत्सुकता दर्शवली. तारिक रेहमान यांनी भारताबरोबरचे संबंध सुरळीत करण्याची भूमिका घेतली आणि त्यामुळे हा भारताला दिलासा आहे. रेहमान यांनी चीन आणि पाकिस्तानपासून बांगलादेशला समान अंतरावर ठेवण्याचे आश्वासन दिले, ते कितपत पाळले जाईल याची साशंकता असली तरीही भारतासाठी हे त्यांचे आश्वासन निश्चितच उत्साहपूर्ण वाटू शकते. महंमद युनूस यांच्या अंतरीम सरकारने चीन आणि पाकशी मैत्री केल्यानंतर रेहमान यांचे संकेत निश्चितच सकारात्मक आहे. पण तारिक यांना हे माहीत आहे, की भारत आणि बांगलादेश यांचे संबंध दोन मार्गावर चालू आहे. एक म्हणजे हे दोन्ही देश व्यापार आणि वीज तसेच कनेक्टिव्हिटीमुळे एकमेकांशी जोडले गेले आहे. त्यामुळे भारताशी संबंध रेहमान यांना सुधारावेच लागतील. तारिक रेहमान यांची भूमिका बांगलादेश फर्स्ट ही महत्त्वाची आहे. पण त्यात भारताला नुकसान पोहोचवण्याची त्यांची मानसिकता नाही ही बाब जास्त महत्त्वाची आहे. अर्थात भारताने हे लक्षात ठेवले पाहिजे की तारिक आता सत्तेच्या केंद्रस्थानी आहे आणि बांगलादेशात भारतविरोधी कट रचले जात होते आणि हिंदूंचे शिरकाण करण्याचा प्रयत्न केले गेले. तेव्हा तारिक यांच्यावर कितपत विश्वास ठेवावा हाही प्रश्नच आहे. तारिक रेहमान यांना काळा राजकारणी म्हणून ओळखले जात होते. पण त्यांच्यापुढे पुढचा प्रवास मात्र दीर्घ आणि अवघड आहे. त्यांच्यासमोर सर्वात अवघड काम आहे ते म्हणजे भारताबरोबर संबंध पुन्हा प्रस्थापित करणे. तसेच बांगलादेशाची अर्थव्यवस्था सुधारण्याचे आव्हान. ते सर्वात अवघड आहे. कारण निर्यात आणि रोजगाराला आधार देणाऱ्या वस्त्रोद्योग क्षेत्राला वाढत्या स्पर्धेचा सामना करावा लागत आहे. बांगलादेशातील महागाई आणि बेरोजगारीमुळे जनतेचा संयम संपला. त्यामुळे आर्थिक सुधारणा ही तारिक रेहमानसाठी अत्यावश्यक अट बनली. आणखी एक आव्हान म्हणजे २०२४ नंतर हिंदूंवर अत्याचार आणि हल्ले वाढले. त्यांचा तारिक रेहमान सरकारला नेटाने बंदोबस्त करावा लागेल. हिंदूची लिंचिंग आणि अवामी लीग कार्यकर्त्यांवर हल्ले हेही बांगलादेशला लागलेले डाग आहे. ही सर्व प्रतिमा तारिक रेहमान यांना पुसून टाकावी लागेल आणि देश एक लोकशाही आणि अनेक धर्मांचा आश्रयदाता अशी त्यांची प्रतिमा करावी लागेल. या निवडणुकीतून आणखी एक सकारात्मक बाब समोर आली आहे, ती म्हणजे जमात ए इस्लामी या कट्टरतावादी पक्षाचा पराभव. त्यामुळे कट्टरपंथीयांना बागलादेशने आसरा दिला नाही ही समाधानाची बाब आहे.

## संधी की नाईलाज?

**भारत आणि अमेरिका यांच्यातील करार भारताच्या फायद्याचा आहे की नाही, अमेरिकेने भारतावर दबाव आणून हा करार करायला भाग पाडले की नाही, रशियाकडून तेल खरेदी कमी करणे हा योग्य निर्णय आहे की नाही, असे प्रश्न या निमित्ताने समोर आले आहेत. अमेरिकेशी व्यापार कराराच्या काही दिवस आधी भारताने युरोपियन युनियनशी मुक्त व्यापार करार केला.**




गेल्या वर्षी, भारताने ओमान, न्यूझीलंड आणि ब्रिटनसोबत मुक्त व्यापार करार केले होते. त्याआधी मॉरिशस, संयुक्त अरब अमिराती, युरोपातील EFTA या नावाने ओळखला जाणारा चार (आइसलँड, नॉर्वे, स्वित्झर्लंड आणि लिखटनस्टाईन) देशांचा गट, आणि ऑस्ट्रेलिया यांच्याशी देखील असेच करार झाले होते. तसेच दक्षिण अमेरिकेतील देशांशी आणि कॅनडाशी मुक्त व्यापार करार करता येईल का, याची चाचपणी चालू आहे. गेल्या सहा वर्षांत भारताने इतक्या विविध देशांशी मुक्त व्यापार करार केले आहेत, याकडे कसे पाहावे? आपली देशांतर्गत बाजारपेठ सहजासहजी खुली करण्यास नाखूष असलेल्या भारताने मुक्त व्यापार करारांबाबत आपली भूमिका का बदलली?

गेली काही वर्षे भारत व्यापाराबाबत अधिक खुलेपणाचे धोरण स्वीकारायला उत्सुक नाही, असेच दिसत होते. मुक्त व्यापाराच्या मूलभूत तत्त्वांकडे आणि आंतरराष्ट्रीय व्यापारातून होणाऱ्या फायद्यांकडे भारताने पाठ फिरवली आहे, हेही स्पष्ट होते. भारताने २०१९ साली 'आरसीईपी' (RCEP) या करारावर सह्या करण्यास नकार दिला होता. आरसीईपी हा जगातील सगळ्यात मोठ्या प्रादेशिक व्यापार गटांपैकी एक गट आहे. या आरसीईपीमध्ये आग्नेय आशियातील दहा देश, जपान, दक्षिण कोरिया, चीन, भारत, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया असे सोळा देश असणार होते. मात्र हा करार प्रत्यक्षात आला तेव्हा १५ देशांनी यावर सह्या केल्या. जपान आणि ऑस्ट्रेलियाने आग्रह करून देखील भारत या करारात सहभागी झाला नाही. या करारामुळे भारतीय बाजारपेठ चीनला खुली होईल आणि त्यामुळे चिनी निर्यात वाढून भारतातील उद्योग संकटात येतील, अशी भीती व्यक्त केली गेली. अनेक देशी उद्योगांनीदेखील सरकारकडे या करारात सहभागी न होण्यासाठी आग्रह धरला होता. त्यामुळे जगातील सगळ्यात वेगाने वाढणाऱ्या आणि डायनॅमिक अशा आर्थिक गटापासून भारत लांब गेला.

मात्र आरसीईपीकडे पाठ फिरवल्यांनंतर वर्षभरातच भारताने मुक्त व्यापार करायला सुरुवात केली. भारताने व्यापार धोरणाविषयी पुनर्विचार का सुरू केला असावा? अत्यंत वेगाने बदलणारी आंतरराष्ट्रीय स्तरावरील राजकीय आणि आर्थिक परिस्थिती हे याचे उत्तर असू शकते. गेल्या सहा वर्षांतील आंतरराष्ट्रीय राजकारणाकडे आणि अर्थकारणाकडे नजर टाकली तर काय दिसते? आधी २०२०-२१ मध्ये कोविडचे मोठे संकट आले. त्यामुळे देशोदेशी अर्थव्यवस्था ठप्प झाल्या, तसेच चीनवरील आर्थिक अवलंबित्व किती धोकादायक आहे, हे जगाला दिसून आले. त्यांनतर २०२१ मध्ये सुएझ कालवा एक मोठे, मालवाहू जहाज अडकल्यामुळे वाहतुकीसाठी बंद झाला. या दोन्हींतून जग सावरत आहे तोवर २०२२ मध्ये रशियाने युक्रेनवर आक्रमण केले. त्यामुळे पेट्रोल आणि डिझेलपासून खते आणि खाद्यपदार्थांचे भाव वाढत गेले. त्यानंतर इस्रायलने २०२३ मध्ये गाझापट्टीत जो विध्वंस सुरू केला त्याला उत्तर म्हणून येमेनमधील हुती बंडखोरांनी सुवेझ कालव्याच्या मार्गावर हल्ले सुरू केले. या सगळ्यावर कहर म्हणजे अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प निवडून आले आणि त्यांनी २०२५मध्ये सगळ्या जगाला आयात शुल्क आणि व्यापारी तूट या मुद्द्यांवरून वेठीस धरले. हा घटनाक्रम पाहिला तर डोके चक्रावून जाते. याच्याच जोडीने आर्टिफिशियल इंटेलिजन्स नावाचा 'जीनी' बाटलीतून बाहेर आलेला आहे. या सगळ्या अस्वस्थेतच्या काळातही जागतिक अर्थव्यवस्था टिकून राहिली, वाढत राहिली. लवचिकता आणि सहनशीलता या दोन्ही कठीण मुद्द्यांवर जागतिक अर्थव्यवस्थेला द्यावेत तितके गुण कमीच पडतील.

अशा या वेगाने बदलणाऱ्या काळात जगभरातच आर्थिक धोरण बदलायला सुरुवात झाली. चीनवरील अवलंबित्व कमी व्हावे यासाठी प्रयत्न सुरू झाले. अमेरिका आणि युरोपने आपल्या देशांत उद्योगनिर्मिती पुन्हा सुरू व्हावी आणि कारखानदारीचे प्रमाण वाढावे यासाठी प्रयत्न सुरू केले. ज्याला 'इंडस्ट्रियल पॉलिसी' म्हणतात त्याचे युरोप आणि अमेरिकेत पुनरागमन झाले. याच काळात भारतानेही आपल्या धोरणाला मुरड घालायला सुरुवात केली. जर २०२० पासून भारताच्या आर्थिक धोरणाकडे पाहिले तर दोन परस्परपूरक गोष्टी दिसून येतात. एक, आत्मनिर्भर भारत हा उपक्रम सुरू करणे. देशांतर्गत स्तरावर औद्योगिकरणाला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे हे सर्वमान्य झालेले उद्दिष्ट आहे. त्यासाठी 'आत्मनिर्भर भारत' हे धोरण आणले गेले. त्याआधी २०१५ मध्ये ' मेक इन इंडिया ' या नावाने असेच धोरण आणले होते. त्याआधीसुद्धा देशांतर्गत स्तरावर औद्योगिकरण वाढावे यासाठी प्रयत्न केले जात होतेच. 'आत्मनिर्भर भारत' हा याच साखळीतील उपक्रम. कोविड संकटाच्या काळानंतर पुन्हा एकदा देशातील औद्योगिक उत्पादन वाढावे यासाठी हा उपक्रम सुरू केला गेला. जमीन अधिग्रहणातील अडचणी, जुनाट कामगार कायदे, सरकारी हस्तक्षेप, प्रशासकीय दिरंगाई आणि अनास्था, उद्योगस्नेही वातावरणाचा अभाव आणि विविध कारणांमुळे उद्योग क्षेत्राला पुरेसा विश्वास न वाटणे इ. कारणांमुळे अजूनही आपले औद्योगिकीकरण हव्या त्या प्रमाणात वाढत नाही. त्यामुळे उत्पादन क्षेत्राबाबत आपले आकडे २०१५ मध्ये जसे होते, तसेच आताही आहेत.

याच जोडीने सुरू केलेल्या दुसऱ्या धोरणाला मात्र आता चांगलीच फळे लागलेली दिसतात. सन २०२० पासूनच शक्य असेल त्या देशांशी भारताने मुक्त व्यापार करार करायला सुरुवात केली. तर्कदृष्ट्या विचार केल्यास दोन्ही पावले एकमेकांना पूरक आहेत असे दिसते. एकीकडे देशांतर्गत औद्योगिक उत्पादन वाढणे आणि दुसरीकडे अधिकाधिक देशांची बाजारपेठ भारतीय उद्योगांसाठी खुली करून घेणे असे हे धोरण दिसते. यापैकी 'आत्मनिर्भर भारत' ची दखल जास्त प्रमाणात घेतली गेली. मुक्त व्यापार करार त्या मानाने कमी प्रमाणात चर्चेत आले. याचे एक कारण असेही आहे की मुक्त व्यापार करार होण्यासाठी किचकट आणि वेळखाऊ वाटाघाटी कराव्या लागतात. तसेच या करारांकडे आंतरराष्ट्रीय स्तरावर पाहिले जाते. त्यामुळे समजा एका देशासाठी एखाद्या क्षेत्राचे दरवाजे उघडले तर दुसऱ्या देशासाठी मात्र ते बंद ठेवले असे करता येत नाही. त्यामुळे मुक्त व्यापार करारांना जास्त वेळ लागला आणि आता एकदम अनेक देशांशी करार होताना दिसत आहेत.

गेल्या सहा वर्षांत करार झालेले देश पाहिले तर काय दिसते? मॉरिशस, संयुक्त अरब अमिराती आणि ऑस्ट्रेलिया ही भारताची खास मित्रराष्ट्रे आहेत. या तिन्ही देशांशी भारताचे राजकीय आणि संरक्षण क्षेत्रात उत्तम संबंध होते. मुक्त व्यापार करारामुळे आर्थिक संबंधही अजून घट्ट होताना दिसत आहेस. ओमान हा पश्चिम आशियातील आणि न्यूझीलंड हा पॅसिफिक महासागर प्रदेशातील देश. ही दोन्ही राष्ट्रे महत्त्वाची पण तुलनेने दुर्लक्षित अशी. या देशांशी व्यापार केल्यामुळे थेट फायदे तर झालेच पण अनुषंगिक फायदेही दिसून येत आहेत.

ओमान आणि संयुक्त अरब अमिराती हे दोन देश गल्फ को-ऑपरेशन कौन्सिलचे सदस्य आहेत. सौदी अरेबिया अनुत्सुक असल्याने ही संघटनादेखील याआधी भारताशी मुक्त व्यापार करार करायला तयार नव्हती. मात्र दोन सदस्य देशांनी करार केल्यामुळे सौदी अरेबियाने आणि गल्फ को-ऑपरेशन कौन्सिलने देखील आता आपली भूमिका बदलली आहे. हा करार पूर्णत्वाला गेला तर कतार आणि सौदी अरेबिया हे दोन आर्थिकदृष्ट्या बलाढ्य देश आपल्या व्यापार करारांच्या नेटवर्कशी जोडले जातील. ब्रिटन, EFTA आणि युरोपियन युनियनशी व्यापार करार झाल्यामुळे युरोपची मोठी बाजारपेठ भारताला खुली झाली आहे. तसेच लष्करी आणि राजकीय क्षेत्रात भारत आणि युरोप अधिकाधिक जवळ येत आहेत. अमेरिकेसारख्या विकसित आणि श्रीमंत बाजारपेठेला पर्याय म्हणून भविष्यात युरोपचा उपयोग होऊ शकतो. ट्रम्प यांच्या आगमनामुळे भारत आणि युरोप यांनी एकमेकांना धरून ठेवणे जास्तच महत्त्वाचे झाले आहे.

न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाशी करार झाल्यामुळे आरसीईपीमधील पंधरापैकी चौदा देशांशी भारताचे मुक्त व्यापार करार झाले आहेत. आसियान, दक्षिण कोरिया आणि जपान यांच्याशी भारताचे मुक्त व्यापार करार २००८-२०१२ या काळातील आहेत. त्यामुळे आरसीईपीचे तोटे वगळता भारताने केवळ फायदे मिळण्याची ही स्ट्रॅटेजी आखलेली आहे असे वाटते. मात्र व्हिएतनामसारखा देश जागतिक पुरवठा साखळीमध्ये जितक्या प्रमाणात जोडलेला आहे, तसे होण्यात त्यांना आरसीईपीचा नक्कीच फायदा झालेला आहे. त्यामुळेच अनेक कंपन्या चीनमधून बाहेर पडताना व्हिएतनामचा विचार करतात. भारत अजूनही त्यांच्यासाठी आकर्षक लोकेशन नाही.

आरसीईपीमध्ये न गेल्याने भारत-चीन व्यापारात काही फरक पडला का? ज्या चीनशी आपला व्यापार २०१८ मध्ये ९० बिलियन डॉलर्सच्या घरात होता त्यांच्याशी आपला आता व्यापार १५५ बिलियन डॉलर्सच्याजवळ पोहोचलेला आहे. त्यामुळे आरसीईपीमध्ये न जाण्याने नेमके काय साध्य केले? मात्र भारत हा आंतरराष्ट्रीय व्यापाराला उत्सुक देश नाही हा संदेश मात्र जागतिक स्तरावर वेगाने गेला. गेल्या सहा वर्षांतील व्यापार करारांमुळे हे चित्र थोडे बदलते आहे. भारताच्या व्यापार धोरणात हेच सातत्य कायम राहील? की ट्रम्प यांचा धोका कमी झाला की पुन्हा आंतरराष्ट्रीय व्यापारावर निर्बंध यायला लागतील, हे पाहायला हवे.

(साभार-म.टा संवाद)

**-संकल्प गुर्जर**

## चांदीच्या किमतीचा जागतिक भडका

**अमेरिकेकडे सध्या सुमारे चेपन्न कोटी औंस चांदीचा साठा असल्याचे सांगितले जाते, जो त्यांच्या नेहमीच्या साठ्यापेक्षा तिप्पट आहे. चीननेदेखील चांदीच्या निर्यातीवर कडक निर्बंध लादले आहेत. जगातील हे दोन मोठे देश जेव्हा चांदीची साठेबाजी करतात आणि निर्यातीवर बंदी घालतात, तेव्हा लंडन आणि न्यूयॉर्कच्या बाजारपेठेत चांदीचा तुटवडा जाणवू लागतो. या कमतरतेमुळे जागतिक स्तरावर चांदीच्या किमतीत भडका उडाला आहे.**



भारतात चांदी ही समृद्धीचे प्रतीक मानली जाते. गरीबांचे सोने म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या पांढऱ्या धातूने आता अशा काही उड्या मारल्या आहेत की, ती सामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर गेली आहे. एकेकाळी किलोच्या भावात मिळणारी चांदी आता सोन्याच्या पावलावर पाऊल ठेवत महागाईच्या आकाशात गोते खात आहे. चांदीच्या किमतींना जणू पंख फुटले असून, दुसरीकडे सोन्यानेही दीड लाख रुपये प्रति दहा ग्रॅमच्या दिशेने आपली वाटचाल वेगाने सुरू ठेवली आहे. मात्र, चांदीने गेल्या वर्षभरात दिलेली १६० टक्क्यांची दरवाढ ही जागतिक अर्थव्यवस्थेसाठी एक मोठा धक्का मानली जात आहे.३ लाख रुपये प्रति किलोच्या पुढे जाणारी चांदी आता सर्वसामान्यांसाठी केवळ शोभेची वस्तू उरते की काय, अशी भीती निर्माण झाली आहे. चांदीच्या दरांचा विचार केला तर गेल्या १२ महिन्यांतील चढउतार थक्क करणारे आहेत. जानेवारी २०२५ मध्ये चांदीचे दर प्रति किलो ८५९१३ रुपये इतके होते.

कोणालाही कल्पना नव्हती की, पुढच्या बारा महिन्यांत हा आकडा थेट २.५ लाखांचा टप्पा ओलांडेल. डिसेंबर २०२५ पर्यंत चांदी २ लाख ४७ हजार रुपयांवर पोहोचली आणि आता जानेवारी २०२६ मध्ये ती ३ लाख रुपयांच्या पुढे धावत आहे. केवळ परवाच्या एका दिवसात चांदीच्या किमतीत १५ हजार रुपयांची वाढ नोंदवली गेली. ही वाढ एवढी प्रचंड आहे की, मध्यमवर्गीय कुटुंबांना आता लग्नसराईसाठी चांदीची भांडी किंवा दागिने खरेदी करणे अशक्य झाले आहे.

सोन्याच्या बाबतीतही परिस्थिती वेगळी नाही. आंतरराष्ट्रीय बाजारात अमेरिकन डॉलरची घसरण आणि जागतिक बँकांनी सोन्याच्या साठवणुकीवर दिलेला भर यामुळे सोन्याचे दर सातत्याने सुसाट वेगाने आसमान गाठत आहेत. सोने दीड लाखाच्या उंबरठ्यावर उभे असताना चांदीने १६० टक्क्यांची वाढ नोंदवून सोन्यालाही मागे टाकले आहे. या दरवाढीमागे केवळ भारतीय बाजारपेठ नसून, जागतिक भूराजकीय घडामोडी आणि बदलती औद्योगिक समीकरणे कारणीभूत आहेत. चांदीच्या किमती वाढण्यामागे सर्वात मोठे कारण म्हणजे, या धातूचा औद्योगिक वापर. पूर्वी चांदीचा वापर प्रामुख्याने दागिने आणि नाणी बनवण्यासाठी केला जात असे. मात्र, आता चित्र बदलले आहे. जगभरात जशी सौर ऊर्जेची क्रांती होत आहे, तशी चांदीची मागणी प्रचंड वाढली आहे. सौर ऊर्जेचे पॅनेल तयार करण्यासाठी चांदीचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. जसजसे देश कार्बन उत्सर्जनाचे लक्ष्य गाठण्यासाठी सौर ऊर्जेवर भर देत आहेत, तसतशी या क्षेत्रातील चांदीची भूक वाढत आहे. तसेच बॅटरी तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रिकल वाहनांच्या निर्मितीतही चांदीचा वापर अनिवार्य झाला आहे.

आधुनिक काळातील स्मार्टफोन, लॅपटॉप आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्ये चांदी ही एक सर्वोत्तम वाहक धातू म्हणून वापरली जाते. पुरवठा मर्यादित असताना उद्योगांकडून येणारी ही मागणी चांदीला महाग करत आहे. सौर ऊर्जा आणि हरित तंत्रज्ञानामुळे चांदीला आता औद्योगिक सोन्याचा दर्जा प्राप्त झाला आहे. सध्याच्या युगातील सर्वात मोठी क्रांती म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स होय. हे क्षेत्र सध्या चमकते क्षेत्र मानले जात आहे. एआय तंत्रज्ञानासाठी आवश्यक असलेले सर्व्हर, हाय स्पीड ट्रान्समिशन आणि स्मार्ट ग्रीड पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी चांदीचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. डेटा सेंटरच्या उभारणीत आणि अत्याधुनिक संगणकीय प्रणालींमध्ये चांदीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

एआय उद्योगाच्या विस्तारामुळे चांदीची मागणी भविष्यातही कायम राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत. स्मार्ट उपकरणांच्या निर्मितीसाठी लागणारी चांदी सध्या बाजारात उपलब्ध असलेल्या साठ्यापेक्षा जास्त मागणीत आहे. यामुळेच गुंतवणूकदारांना ही धातू सोन्यापेक्षा अधिक फायदेशीर वाटू लागली आहे. पुरवठा साखळीतील अडथळे आणि वाढती तांत्रिक गरज यामुळे चांदीचे दर वेगाने वाढत आहेत. जागतिक स्तरावर सध्या प्रचंड अस्थिरता आहे. युद्धाचे ढग आणि आर्थिक मंदीची भीती यामुळे गुंतवणूकदार शेअर बाजारापेक्षा धातू बाजाराला प्राधान्य देत आहेत. अमेरिकेतील केंद्रीय फेडरल बँक आपल्या व्याजदरात सातत्याने कपात करत आहे. जेव्हा व्याजदर कमी होतात, तेव्हा डॉलरची किंमत घटते आणि गुंतवणूकदार सुरक्षित पर्याय म्हणून सोने आणि चांदीकडे वळतात. अमेरिकेतील मोठे गुंतवणूकदार सध्या चांदीमध्ये गुंतवणूक करणे लाभप्रद समजत आहेत. ही प्रवृत्ती केवळ व्यक्तींपुरती मर्यादित नाही. जगातील मोठ्या आणि प्रतिष्ठत बँका आता स्वतःचा चांदीचा साठा वाढवण्यावर भर देत आहेत. चलनाच्या चढउतारापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी चांदी हा एक सर्वोत्तम पर्याय ठरत आहे. जागतिक स्तरावर म्युचुअल फंड्सनीदेखील चांदीमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक सुरू केली आहे. चांदीचा भाव भविष्यात अधिक वाढेल या खात्रीने हे फंड्स मोठ्या प्रमाणात साठेबाजी करत आहेत, ज्याचा थेट परिणाम किरकोळ बाजारपेठेवर होत आहे. चांदीच्या बाबतीत एक तांत्रिक अडचण अशी आहे की, चांदीचे स्वतंत्र उत्पादन फार कमी होते.

बहुतेक वेळा ती सोने, तांबे किंवा शिसे यांसारख्या इतर धातूंच्या उत्खननात एक उपउत्पादन म्हणून मिळते. गेल्या अनेक वर्षांपासून चांदीच्या मूळ खाणकामात कोणतीही मोठी वाढ झालेली नाही. यामुळे नवीन चांदी बाजारात येण्याचे प्रमाण अत्यंत मर्यादित आहे. दुसरीकडे, अमेरिकेने चांदीचे महत्त्व ओळखून ती अत्यंत संवेदनशील आणि दुर्मिळ धातूंच्या यादीत समाविष्ट केली आहे. अमेरिकेकडे सध्या सुमारे चेपन्न कोटी औंस चांदीचा साठा असल्याचे सांगितले जाते, जो त्यांच्या नेहमीच्या साठ्यापेक्षा तिप्पट आहे. चीननेदेखील चांदीच्या निर्यातीवर कडक निर्बंध लादले आहेत. जगातील हे दोन मोठे देश जेव्हा चांदीची साठेबाजी करतात आणि निर्यातीवर बंदी घालतात, तेव्हा लंडन आणि न्यूयॉर्कच्या बाजारपेठेत चांदीचा तुटवडा जाणवू लागतो. या कमतरतेमुळे जागतिक स्तरावर चांदीच्या किमतीत भडका उडाला आहे.

**सतीश पोतदार**

# घाटंजीत लुटेरी दुल्हनचा पर्दापाश

## लग्नाच्या नावाखाली मुलांची २.५० लाखांने फसवणूक!, आरोपीना अटक

**जनमाध्यम प्रतिनिधी**

घाटंजी - आजकाल कोण कुठे फसवेल यांचा नेम नाही. असाच फसवेगीरीची चरणसिमा गाठत विवाहाच्या पवित्र बंधनाचे नावावर गैरफायदा घेत लग्नाला मुलगी शोधून देतो म्हणत तरुणांना जाळ्यात ओढून लाखोंची फसवणूक करणाऱ्या तथाकथित वधूपक्षाच्या टोळीचा घाटंजी पोलिसांनी मोठा शिताफीने पर्दाफाश केला आहे. सविस्तर वृत्त असे कि, लग्नाला आलेल्या मुलास मुलगी दाखवतो या पाहणीच्या बहाण्याने घाटंजी तालूक्यातील चोरांबा येथिल रहीवासी पाटील आडनाव असलेल्या मुलीकडील पक्षाने २ लाख ५० हजार रुपये उकळून एका तरुणाची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून या प्रकरणात मुख्य आरोपींसह इतर मध्यस्थी साथीदारांचाही तपास सुरू आहे.

यात फिर्यादी अविनाश चांगदेव कवडे वय ३२ (रा. बानगाव, ता. नांदगाव जि. नाशिक) ह्या शेतीकरी मुलाने त्यांच्या विवाहासाठी ओळखीतील मध्यस्थामार्फत चोरंबा ता घाटंजी जि. यवतमाळ येथील नामे सिमरन गौतम पाटील वय २५ हिचा प्रस्ताव आला होता. यात दि.१० फेब्रुवारी रोजी अविनाश व त्यांच्या नातेवाईकांनी मुलगी पाहणीस मुलीकडे भेट दिली. या पाहणीदरम्यान मुलीची आर्थिक परिस्थिती हलाकीची आहे.

म्हणून वरपक्षाला विश्वासात घेत मुलगी वधू म्हणून देवू पण लग्न ठरविण्यापूर्वी वराकडून मुलीचे विवाह क्रियासाठी लागणारा खर्च २ लाख ५० हजार रुपये रोख देण्याची अट घालण्यात आली. यामधे सुरुवातीला अविनाश या वराकडून नकार देऊनही त्यांना समाजात मुलीची कमतरता व वधू मिळणे कठीण आहे हे लक्षात आणून देत विश्वासात घेऊन मुलगी दाखवण्याचा कार्यक्रमातच मध्यस्थी कडून २ लाख ५० हजार रक्कम उकळण्यात आली.

तक्रारीनुसार, त्यापैकी २ लाख रुपये विलास राठोड याच्याकडे देण्यात आले, तर ५० हजार रुपये मध्यस्थामार्फत ठेवण्यात आले. तदनंतर वधू सिमरन पाटील, तिचा भाऊ करण पाटील वय २८ व आई आशाबाई पाटील यांनी मुलगी पाहण्यासाठी आलेल्या पाहूण्यांना घरची परिस्थिती बिकट दाखवत पाहणी दरम्यान "पोहे घेऊन येतो" असा बहाणा करत २ लाख रुपये घेऊन स्कुटीवरून पोबारा केले. त्याचवेळी इतरही मध्यस्थि बहाना करत मोटारसायकलवरून पलायन केले. वरपक्ष पाहूणे बराच वेळ प्रतिक्षा करूनही कोणीच परत नआल्याने त्यांना सर्व प्रकार लक्षात येताच घाम फुटला व आपली आर्थिक फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले. या बदल त्यांनी घाटंजी पोलिस स्टेशन गाठून सदर घटना कथन करत तक्रार दीली.

या प्रकरणात मध्यवर्ती भूमिका बजावणारे आरोपी सुनील राठोड व माणिक पवार (रा. नंदपूर मोहा, ता. पुसद) यांचाही तपासात समावेश असून त्यांच्या भूमिकेचा सखोल तपास सुरू आहे. सदर तक्रार दाखल होताच घटनेचे गांभिर्य लक्षात घेत घाटंजी पोलिसांनी धडक कारवाई करत यातील मुख्य आरोपी तिघांना अटक केली. या प्रकरणी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१६(२), ३(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अटकेनंतरच्या प्राथमिक चौकशीत या टोळीने यापूर्वीही राज्यातील विविध जिल्ह्यांत अशाच प्रकारे विवाहाच्या आमिषाने अनेकांना गंडा घातल्याचे धागेदोरे उलगडण्यात येत आहेत.

त्यामुळे तपासाचे चक्र वेगात वाढविण्यात आले असून इतर संभाव्य पीडितांचा शोध घेतला जात आहे. ह्या प्रकरणाचा भांडाफोड घाटंजीचे तडफदार पोलिस निरीक्षक केशव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक सचिन राठोड, उपनिरीक्षक विनाश जाधव, तसेच कर्मचारी प्रवीण ताटकोकुलवार, मेघाली खुपसे, संदीप गोहणे, राजू रनमले, प्रलय खोबरकर यांनी संयुक्तपणे कार्यवाही पार पाडली.

# ESZ नियमांचे पालन तपासणार वनविभाग ; टिपेश्वर परिसरातील बांधकामे चौकशीच्या कक्षेत

## उपवनसंरक्षकांचे प्रत्यक्ष पाहणीचे आदेश तक्रारीनंतर प्रशासन हालचालीत

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - टिपेश्वर वन्यजीव अभयारण्य (ता. केळापूर, जि. यवतमाळ) परिसरातील इको सेन्सिटिव्ह झोन (ESZ) क्षेत्रात कथित बेकायदेशीर बांधकामे, रिसॉर्ट, ढाबे व खाणकामासंदर्भात प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने वनविभागाने चौकशी प्रक्रिया सुरू केली आहे.

यवतमाळ जिल्हा उपाध्यक्ष, ट्रायबल फोरम व संचालक, पर्यावरण स्वास्थ संस्था पांढरकवडा अंकित नैताम यांनी पत्र क्र. २४९/२०२६, दिनांक ०९/०२/२०२६ द्वारे अभयारण्य परिसरातील ESZ नियमांचे कथित उल्लंघन होत असल्याची तक्रार सादर केली होती.

तसेच दिनांक ०८/०२/२०२६ रोजी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातमीचा संदर्भ देत प्रत्यक्ष पाहणीची मागणी करण्यात आली होती.

सदर तक्रारीची दखल घेत विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), पांढरकवडा यांनी दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सहाय्यक वनसंरक्षक (वन्यजीव), टिपेश्वर अभयारण्य यांना पत्र निर्गमित करून संबंधित स्थळांची प्रत्यक्ष पाहणी करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

चौकशीमध्ये तपासल्या जाणाऱ्या प्रमुख बाबी ESZ अधिसूचनेचे पालन झाले आहे का? मॉनिटरिंग कमिटीमार्फत मंजूर/नामंजूर प्रस्तावांची स्थिती दिलेल्या परवानग्यांनुसार बांधकाम झाले आहे का?

आवश्यक वैधानिक मंजुरी व सुरक्षा प्रावधानांची अंमलबजावणी लागू कायदे व न्यायालयीन निर्देशांचे पालन वनविभागाच्या पत्रानुसार, चौकशीदरम्यान परवानगीप्राप्त यादी व संबंधित दस्तऐवजांची पडताळणी करून नियमांचे उल्लंघन आढळल्यास कायद्यानुसार पुढील कार्यवाहीचा विचार करण्यात येणार आहे.

### तक्रारदाराची भूमिका

या संदर्भात अंकित नैताम यांनी म्हटले आहे की "टिपेश्वर वन्यजीव अभयारण्य परिसर हा पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशील पट्टा आहे. ESZ क्षेत्रातील कोणतेही बांधकाम किंवा व्यावसायिक उपक्रम हे कायद्याच्या चौकटीतच असले पाहिजेत. चौकशी निष्पक्ष व पारदर्शक होऊन वस्तुस्थिती जनतेसमोर यावी. नियमभंग आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई व्हावी."

### प्रशासनाची पुढील भूमिका

वनविभागाकडून सादर होणाऱ्या सविस्तर अहवालानंतर पुढील निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती मिळत असून, अभयारण्य परिसरातील विकासकामे व पर्यावरणीय संरक्षण यामध्ये संतुलन राखण्याबाबत प्रशासनाची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

# संत सेवालाल महाराज की जयच्या गजराने वरूड नगरी दुमदुमली

**जनमाध्यम प्रतिनिधी**


राळेगाव : तालुक्यातील वरुड जहांगीर या गावात अनेक जाती धर्माचे लोक गुण्यागोविंदाने एकत्र राहत असून आपापल्या पद्धतीने ते सुद्धा आपापले सण साजरे करतात. अशातच या गावात बंजारा समाज सुद्धा सर्वांसोबत मिळून मिसळून



राहतो. अशातच या बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत सेवालाल महाराज आणि माता जगदंबेचे मंदिर या समाजाने सामाजिक वर्गणीतून बांधले असल्याने गेल्या अनेक वर्षांपासून या वरूड जहांगीर गावातील समाजबांधव एकोप्याने दरवर्षी संत सेवालाल महाराज जयंती साजरी करत असतांनाच मागील काही वर्षांपासून शासनाने या जयंतीला शासनस्तरावर साजरी करण्याचे आदेश दिल्यानंतर या जयंतीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी या समाजबांधवाने सेवालाल महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.या जयंती सप्ताहात सात दिवसाचा सप्ताह पाळण्यात आला. पहिल्या दिवसांपासून संत सेवालाल महाराजाचे अध्यायाचे सात दिवसांपर्यंत आमच्या वरूड जहांगीर येथील ह.भ.प. मधूकर जाधव महाराज यांनी वाचन केले.

## वेचक

### जिओ टॉवर कर्मचाऱ्यांचा आंदोलनाचा सूर कायम ; तीन तासांच्या चर्चेतून समेटाचा प्रयत्न



महागाव - नऊ दिवसांपासून आंदोलनाचा सूर पकडलेल्या जिओ टॉवरवरील 16 जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी जगदीश नरवाडे यांच्या मध्यस्थीने प्रयत्न सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर रिलायन्स जीओ कंपनीचे महाराष्ट्र प्रमुख रवी मोटवानी यांच्यासोबत तीन तास सविस्तर चर्चा करण्यात आली. ही चर्चा कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्याच्या उद्देशाने जन आंदोल आधार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदीश नरवाडे यांच्या पुढाकाराने पार पडली. बैठकीत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या, वेतनवाढ, कामाच्या अटी-शर्ती, तसेच नोकरीच्या सुरक्षिततेसंबंधी मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. नऊ दिवसांपासून सुरू असलेल्या आंदोलनामुळे 16 जिल्ह्यांतील पाचशे पेक्षा जास्त टॉवर कर्मचाऱ्यांचे आंदोलन मुळे कामकाज ठप्प झाले आहे. कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे. तीन तास चाललेल्या चर्चेत काही मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा झाली असली तरी अद्याप ठोस तोडगा निघालेला नाही. मात्र, पुढील टप्प्यात लवकरच तोडगा निघेल, अशी आशा व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, आंदोलनकर्त्या कर्मचाऱ्यांनी न्याय मिळेपर्यंत आपली भूमिका कायम ठेवणार असल्याचे सतीश इंगळे यांनी प्रतिक्रिया दिली. यावेळी जगदीश नरवाडे गोविंद देशमुख पंजाब पवार मंचक खंदारे आकाश चव्हाण सचिन उबाळे तानाजी सुरोशे अतुल शिंदे उपस्थित होते.



### बाभूळगाव येथे महावितरणकडून जनजागृती रॅली

बाभुळगाव - येथील महावितरण कंपनी कडून बाभुळगाव शहरात जनजागृती करिता दीर्घ पदयात्रा (लॉन्ग मार्च रॅली )काढण्यात आली. पदयात्रेची सुरुवात महावितरणच्या बस स्थानका जवळील कार्यालयातून करण्यात आली. रॅलीमध्ये फलक, ऑडिओ क्लिप द्वारे ग्राहकां मध्ये जनजागृती करण्यात आली. या माध्यमातून वीज अपघात टाळण्या करिता उपाययोजना, वीज बिलाचा नियमित भरणा करणे, विजेची बचत काळाची गरज, विज बिला पासून मुक्तता सूर्यघर योजना, तसेच स्मार्ट मीटरचे फायदे या विषयी माहिती देण्यात आली. रॅली मध्ये महावितरणचे उपकार्यकारी अभियंता राजेश दहीकर, सहाय्यक अभियंता ग्रामीण विभाग मिर्झा नवाज बेग रियाज बेग, सहाय्यक अभियंता शहर विभाग स्वप्नील उल्हे, सहाय्यक अभियंता पहुर विभाग,सागर धोंगडे,कनिष्ठ अभियंता, तंत्रज्ञ, नितीन सरडे, सर्व जनमित्र, बाह्यस्त्रोत कर्मचारी, कंत्राटदार शिवाय कार्यालयातील सर्वच पुरुष कर्मचारी, व सर्व महिला कर्मचारी सहभागी झाले होते.

### शिवजयंती महोत्सवाला आजपासून सुरुवात

यवतमाळ - सार्वजनिक शिवजयंती महोत्सवाची सुरुवात बुधवार, १८ फेब्रुवारीपासून होत आहे. पहिल्या दिवशी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून यात शिवसामान्य ज्ञान स्पर्धा, शिवतीर्थ रिल्स स्पर्धा, शिव निबंध स्पर्धा, बुद्धिबळ स्पर्धा, शिव काव्य स्पर्धा आणि रांगोळी स्पर्धांचा समावेश आहे. तसेच सावित्री-ज्योतिराव समाजकार्य महाविद्यालयात शिव वकृत्व स्पर्धा पार पडणार आहे. सायंकाळी वेषभूषा स्पर्धेनंतर छत्रपती महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. या कार्यक्रमाला पालकमंत्री संजय राठोड, नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके तसेच स्वागताध्यक्ष प्रदीप वादाफळे उपस्थित राहणार आहेत. यानंतर "छत्रपती शिवाजी महाराजांची राजनीती व आजचे वास्तव" या विषयावर दिल्ली येथील अशोक वानखडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अनियंत्रित शासकीय वाहनाखाली दोन मोटार सायकलीचा चेंदामेंदा

**जनमाध्यम प्रतिनिधी**



बाभूळगाव - पुसदच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी आपल्या शासकीय वाहनाने अमरावतीला जात असताना त्यांच्या भरधाव वाहनाने दोन मोटार सायकलीला धडक दिली यात एक मोटर सायकल चालक गंभीर जखमी झाला असून त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले आहे. सदर अपघात मंगळवार ला दुपारी फाळेगाव बस स्थानकावर घडला.

पुसद येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे बोलेरो वाहन MH/29/BY-9535 ज्यावर महाराष्ट्र शासन असे लिहिलेले आहे. हे वाहन यवतमाळ वरून बाभुळगाव मार्गे अमरावती येथे जात असताना बाभूळगाव पासून आठ किलो मीटर अंतरावर असलेल्या फाळेगाव बस स्थानकावर भरधाव वेगात चौफुली पार करीत असताना अनियंत्रित झाले व उजव्या दिशेला जाऊन एक पान टपरीच्या शेडला सर्वप्रथम धडकले. त्यानंतर रस्त्याच्या कडेला असलेल्या प्रवाशि निवाऱ्याच्या लोखंडी पाईपला धडकले लोखंडी पाईप तोडत त्या नंतर एक नागरिक आपली मोटर सायकल घेऊन उभा होता. त्याला धडक देत त्याच वेगात पुढे गेले तेथे उभ्या असलेल्या दुसऱ्या मोटरसायकलला धडक देऊ त्याचा चेंदामेंदा केला व यानंतर सदर वाहन लोखंडी खांबाला धडकून बाभूळच्या झाडाला निसटती धडक देत थांबले.

सदर वाहनां मध्ये एक ड्रायव्हर व एक अधिकारी बसून होता असे फाळेगाव बस स्थानकावरील नागरिकांनी माहिती देताना सांगितले. मोटर सायकल वर उभा असलेला इसम गंभीर जखमी झाला त्याला तातडीने यवतमाळ येथे हलविण्यात आले आहे. सदर बातमी लिहे पर्यंत अधिकृतरित्या कोणीही बाभुळगाव पोलीस स्टेशनला तक्रार दिलेली नाही असे पोलीस विभागातर्फे सांगण्यात आले.

# कलावंत वारकरी सेवा विकास समितीच्या शिष्टमंडळाचे राज्यमंत्र्यांना निवेदन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - कलावंत वारकरींच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर राष्ट्रसंत तूकडोजी महाराज कलावंत वारकरी सेवा विकास व सन्मान समितीचे शिष्टमंडळानी नामदार इंद्रनिल नाईक,राज्यमंत्री ह्यांची पूसद येथे भेट घेवून सविस्तर चर्चा केली.

जेष्ठ कलावंताना दरमहा पाच हजार रूपये मानधन योजनेमधे सर्व लहान मोठ्या जिल्ह्यासाठी दरवर्षी सरसकट १०० कलावंतांचे ईष्टांक ठेवले असल्याने मोठ्या जिल्ह्यातील जेष्ठ कलावंतावर अन्याय होत आहे. मोठ्या जिल्ह्यासाठी दरवर्षी ५०० कलावंताचे ईष्टांक ठरवून द्यावे, तसेच आषाढी एकादशी निमित्य मानाच्या १० पालख्या सोबत पंढरपूरला जाणा-या दिंड्याना मिळणारे २०हजार रूपये प्रती दिंडी अनूदान योजनेतील मानाच्या दहा पालख्यामधे वाढ करून यवतमाळ जिल्ह्यातील तिर्थक्षेत्र मुंगसाजी माऊली धामणगाव देव, तिर्थक्षेत्र पोहरादेवी आणि तिर्थक्षेत्र जगन्नाथ बाबा वणी ई. तिर्थक्षेत्र समाविष्ट करावीत कलावंत वारक-याच्या ह्या न्यायोचित मागण्यासाठी संबधीत खात्याचे मंत्री सोबत चर्चा करून मंजूर करून घेणार असे अभिवचन राज्यमंत्र्यांनी दिले. ह्याप्रसंगी कलावंत समितीचे संस्थापक अध्यक्ष ॲड. श्याम खंडारे, राज्य ऊपाध्यक्ष सिध्दार्थ भवरे, राज्य महासचीव गंगाधरजी घोटेकर, जिल्हाध्यक्ष गणेशरावजी धर्माळे, जिल्हा संघटक रमेश वाघमारे, पूसद तालुकाध्यक्ष रणजीत शेजूळे व इतर ऊपस्थित होते.

# शिपाई भरतीत कथित गैरप्रकार ; पंचायत समितीसमोर आमरण उपोषणाचा एल्गार !

**जनमाध्यम प्रतिनिधी**

राळेगाव - १६ फेब्रुवारी २०२६ ग्रामपंचायत वनोजा येथील शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत पारदर्शकता न पाळता कथित गैरप्रकार झाल्याचा आरोप करत संतप्त युवकांनी पंचायत समिती कार्यालय राळेगाव येथे आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. यासंदर्भात गटविकास अधिकारी यांना लेखी निवेदन सादर करण्यात आले असून या निवेदनाच्या प्रती मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ, मा. उपविभागीय अधिकारी राळेगाव, मा. ठाणेदार, पोलीस स्टेशन राळेगाव तसेच मा. सरपंच/सचिव, ग्रामपंचायत वनोजा यांना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे.

निवेदनानुसार, ग्रामपंचायत वनोजा येथे सुमारे ११ महिन्यांपूर्वी तात्पुरत्या स्वरूपात शिपाई पदासाठी नियुक्ती करण्यात आली होती. संबंधित पदाचा कालावधी पूर्ण झाल्यानंतरही नवीन



भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही. त्यामुळे पात्र व गरजू उमेदवारांवर अन्याय होत असल्याची भावना ग्रामस्थांमध्ये निर्माण झाली आहे. यापूर्वीही संबंधित अधिकाऱ्यांकडे अनेक वेळा लेखी तक्रारी व निवेदने सादर करण्यात आली होती. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने संतप्त नागरिकांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. शिपाई पदासाठी नवीन अर्ज मागवून पात्र उमेदवारांची निवड पारदर्शक व न्याय्य पद्धतीने करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची तातडीने दखल घ्यावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# मुडाणा येथील बंगाली डॉक्टरचा रुग्णांवर चुकीचा उपचार

## वडद येथील रुग्णाच्या किडनी व अंगावर सुज,पोलिसात तक्रार

## वणी ते छत्रपती संभाजीनगर व हैदराबाद बस सुरू करण्याची मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

वणी - वणी शहर हे औद्योगिक क्षेत्र म्हणून परिचित असून शहरासह ग्रामीण भागातील अनेक प्रवासी शिक्षण, नोकरी, व्यवसाय तसेच वैद्यकीय कारणांसाठी छत्रपती संभाजीनगर व हैदराबाद येथे नियमित प्रवास करतात. मात्र वणी येथून या दोन्ही शहरांकडे जाण्यासाठी थेट बससेवा उपलब्ध नसल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर वणी ते छत्रपती संभाजीनगर तसेच वणी ते हैदराबाद अशी थेट बससेवा सुरू करण्यात यावी,अशी मागणी जनतेच्या वतीने मानवी हक्क सुरक्षा परिषद तर्फे करण्यात आली आहे. १७ फेब्रुवारी रोजी वणी आगारप्रमुख विवेक बन्सोड यांना देण्यात आलेल्या निवेदनातून ही मागणी



करण्यात आली.

निवेदन देतेवेळी मानवी हक्क सुरक्षा परिषदेचे राज्याध्यक्ष राजु धावंजेवार, महाराष्ट्र प्रदेश संपर्क प्रमुख परशुराम पोटे, महिला जिल्हा संपर्कप्रमुख सुमित्रा नारायण गोडे, वणी विधानसभा अध्यक्ष भाऊसाहेब आसुटकर, वणी शहर महिला अध्यक्ष प्रमिला चौधरी, मनिष सुरेंद्र निब्रड, यवतमाळ जिल्हा महिला उपाध्यक्ष, संजय चिंचोलकर, ज्ञानेश्वर बोनगीनवार, सुरेश बन्सोड, वणी शहर अध्यक्ष अजय चन्ने, यांच्यासह परिषदेचे पदाधिकारी उपस्थित होते. सदर बससेवा तातडीने सुरू करून प्रवाशांची गैरसोय दूर करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# वाईट उद्देशाने हात पकडून महिलेचा विनयभंग

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - पोलीस स्टेशन अंतर्गत दि. 12/02/2026 सौ.दिपीका रामेश्वर चव्हाण वय 30 वर्ष जात बंजारा व्यवसाय मंजूरी रा माळवागद ता. महागाव पोलीस स्टेशन ला पत्ती नामे- रामेस्वर चव्हाण यांचे सोबत येवून जबानी रिपोर्ट दिला की गावातील गैरअर्जदार नामे- सूमित प्रकाश चव्हाम वय अंदाजे 18 वर्ष रा. माळवागद हा बरेच दिवसापासून फिर्यादीला विनाकारण बोलण्याचा प्रयत्न करत होता त्याला खूप वेळा समजावून सांगितले परंतू तो ऐकत नव्हता दि.16/01/2026 रोजी सकाळी 9:00 वाजता सूमारास फिर्यादी ही गावातील सूषमा देवानंद चव्हाण यांचे सोबत शेतातील कापूस वेचण्यासाठी गेली असता त्यावेळी दुपारी अंदाजे 1:30 वा चे सूमारास फिर्यादी व सूषमा चव्हाण अशा दोघ्याही शेतात कापूस वेचत असतांना गैरअर्जदार सूमित प्रकास चव्हाण वय 18 वर्ष जात बंजारा रा माळवागद ता महागाव हा शेतात फिर्यादी दिपीका चव्हाण यांच्या जवळ येऊन म्हणाला की मला तूझ्या सोबत बोलायचे आहे असे म्हणताच फिर्यादीने बोलण्यास नकार दिल्यामुळे आरोपी सुमित चव्हाण याने वाईट उदेशाने हात पकडुन खाली पाडून तिचा विनयभंग केला. त्यावेळी हजर आसलेली सूषमा देवानंद चव्हाण हिणे फिर्यादीला तावडीतून वाचविले तेव्हा आरोपीने तूझ्या नव-याला काही सांगितले तर तूला मी जिवाने खतम केल्याशिवाय राहणार नाही अशी धमकी दिल्याने फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन आरोपी विरुद्ध बि.एन.एस. 75, 352, 351(2)351(3),115,(2), 3(5)अशा विविध कलमान्वये गुन्हे दाखल झाले आहे, आरोपींने धमकी दिल्यामुळे फिर्यादी भयभीत होऊन पती व मुला बाळासह ती पुसदला आपल्या भावाकडे राहत आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक महागाव हे करित आहेत.

# इंदिरा नगर येथील १३ वर्षीय सलोनीची हृदय शस्त्रक्रिया यशस्वी



पुसद - येथील गेल्या पाच ते सात वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात काम करत असलेल्या रुग्ण मित्र फाऊंडेशन,पुसदच्या माध्यमातून तसेच शासकीय योजनेतुन इंदिरानगर तालुका पुसद येथील १३ वर्षीय सलोनी दिलीप चव्हाण या मुलीची आचार्य विनोब भावे हॉस्पिटलमध्ये हृदय शस्त्रक्रिया यशस्वी पार पडली. या शस्त्रक्रिये करिता डॉ. कुणाल चव्हाण पुसद, डॉ. कुणाल पिसोडे यवतमाळ यांचे सहकार्य लाभले. पुसद तालुक्यातील आपल्या परिसरात कोणत्याही रुग्णाला शस्त्रक्रिया, आरोग्य योजना किंवा लहान मुलांच्या हृदय शस्त्रक्रिये बाबत काही अडचणी असल्यास रुग्ण मित्र फाउंडेशन, पुसदचे १)शांतीसागर इंगोले संपर्क नं. ८०८७९०७८८३ २)ऋषिकेश टनमने संपर्क नं.९८५०३५४१८२ या नंबर वरील संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# शौचालय दुरुस्तीचा पैसा कुठे गेला ?

## गोरगरिबांच्या सुविधेवर डल्ला ; नगरपरिषदेला जाब द्या !

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - शहरातील सार्वजनिक स्वच्छतेच्या नावाखाली कोट्यवधींचा गाजावाजा केला जात असताना प्रत्यक्षात गोरगरिबांसाठी उभारण्यात आलेल्या ३४ सार्वजनिक शौचालयांची अवस्था बिकट असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. दुरुस्तीचे टेंडर काढूनही प्रत्यक्ष काम नगण्य झाले असून, केवळ कागदोपत्री सुधारणा दाखवून बिल काढण्यात आल्याचा गंभीर आरोप काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

अनेक शौचालयांचे दरवाजे नादुरुस्त आहेत. पाण्याची सुविधा नाही, नियमित साफसफाई होत नाही. रंगरंगोटी अपूर्ण आहे. काही ठिकाणी सांडपाण्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून आजूबाजूच्या नागरिकांच्या आरोग्यावर थेट परिणाम होत आहे. स्वच्छ भारतचा नारा देणाऱ्या प्रशासनाने प्रत्यक्षात स्वच्छतेकडे पाठ फिरवली का, असा सवाल उपस्थित होत आहे. कुत्र्यांच्या नसबंदीतील कथित भ्रष्टाचारावर राज्यात चर्चा रंगत असताना, यवतमाळात तर थेट सार्वजनिक शौचालयांच्या दुरुस्तीवरच संशयाची सुई रोखली गेली आहे. "कागदावर काम पूर्ण, प्रत्यक्षात शून्य" अशी स्थिती असल्याचा आरोप करत संबंधित अधिकाऱ्यांवर चौकशीची मागणी करण्यात आली आहे. नगरपरिषद प्रशासनाने तात्काळ ३४ शौचालयांची प्रत्यक्ष पाहणी करून कामांची वस्तुस्थिती जाहीर करावी, संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी आणि दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी होत आहे. अन्यथा जनआंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला आहे. गोरगरिबांच्या मूलभूत सुविधांवर डल्ला मारणाऱ्या प्रशासकीय अधिकारी व संबंधित विभागाला संरक्षण देणार का, की पारदर्शक चौकशी करून कारवाई करणार? शासनाने याबाबत स्पष्ट भूमिका घ्यावी तसेच नगराध्यक्ष यांनी या संदर्भात पाठपुरावा करून चौकशी करावी.अशी मागणी जोर धरून आहे.

# दुसऱ्या प्रयत्नात घवघवीत यश : हरीष शिंदे यांची राजपत्रित कृषी अधिकारीपदी निवड



**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - जिद्द, चिकाटी आणि स्पष्ट ध्येय डोळ्यांसमोर ठेवून केलेल्या अथक परिश्रमांचे फळ अखेर मिळाले असून उमरखेड येथील हरीष रविंद्र शिंदे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (MPSC) घेण्यात आलेल्या कृषी सेवा परीक्षेत दुसऱ्या प्रयत्नात यश संपादन करत २५८ जागांमधून राज्यात ६३ वा क्रमांक मिळवला आहे. त्यांची राजपत्रित कृषी अधिकारी पदावर निवड झाली आहे.

हरीष शिंदे यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण साखळे विद्यालय, उमरखेड येथे झाले. त्यांनी २०१३ साली दहावी उत्तीर्ण केली. त्यानंतर वसंतराव नाईक कृषी विद्यालय, बिटरगाव येथून २०१५ साली बारावी पूर्ण केली. पुढे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत असलेल्या कॉलेज ऑफ ॲग्रीकल्चर मधून २०१९ साली त्यांनी कृषी पदवी संपादन केली. पदवीच्या शेवटच्या वर्षात प्रशिक्षण घेत असताना यवतमाळ जिल्ह्यात चुकीच्या फवारणी पद्धतीमुळे पिकांचे नुकसान होऊन अनेक शेतमजुरांनी आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलल्याची घटना त्यांच्या मनाला चटका लावून गेली. ग्रामपंचायतींकडे उपलब्ध असलेल्या स्प्रेईंग किटचे योग्य वाटप झाले असते, तर ही दुर्घटना टळू शकली असती, असा विचार त्यांच्या मनात घर करून गेला. "मी त्या पदावर असतो, तर हे होऊ दिले नसते," या भावनेतूनच त्यांनी कृषी अधिकारी होण्याचा निर्धार केला.

# सह दुय्यम निबंधक कार्यालयात माहिती देण्यास टाळाटाळ..! माहिती अधिकार कायद्याची पायमल्ली ?

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - येथील सह दुय्यम निबंधक श्रेणी-१ कार्यालय, 'कृष्णप्रतिभा' इमारत येथे माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागविलेल्या माहितीबाबत टाळाटाळ केल्याचा आरोप होत आहे. बाबुलाल पुराजी राठोड (रा. गांधीनगर, पुसद) यांनी २६ नोव्हेंबर २०२५ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज सादर करून मौजे वाघजाळी येथील भूमापन क्रमांक ६२ मधील ३ हेक्टर ०८ आर जमिनीच्या २९ जुलै २०२४ रोजी झालेल्या खरेदीखताची साक्षांकित प्रत मागितली होती. संबंधित जमीन मालक वैद्यनाथ चिनकू परदेशी यांच्या नावाने व्यवहार झाल्याचे नमूद आहे.

कार्यालयाकडून ८ डिसेंबर २०२५ रोजी पत्र देत दस्तऐवज शोध शुल्क व नोंदणी कायद्यान्वये (कलम ५७) स्वतंत्र अर्ज करण्याबाबत सूचना करण्यात आल्या. मात्र अर्जदाराचे समाधान न झाल्याने प्रथम अपील सह जिल्हा निबंधक वर्ग-१, यवतमाळ येथे सादर करण्यात आले. १० फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या सुनावणीत केस क्रमांक नसल्याने माहिती देता येणार नसल्याचे सांगण्यात आल्याची माहिती आहे. दरम्यान, संबंधित जमीनमालक मयत असून त्यांच्या नावाने खोटी कागदपत्रे सादर करून व्यवहार झाल्याची चर्चा पुसद परिसरात रंगली आहे. याबाबत पोलिसांत तक्रारही दाखल झाल्याचे सांगितले जाते. तसेच दोन नंबरच्या जमिनी एक नंबरमध्ये परिवर्तित करून व्यवहार झाल्याच्या आरोपांमुळे कार्यालय पुन्हा चर्चेत आले आहे. या प्रकरणात संभाव्य गैरव्यवहाराची चौकशी करून पारदर्शकता आणावी, अशी मागणी नागरिकांकडून होत असून जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# स्मार्ट मीटर बसविण्यात महाराष्ट्राचा देशात प्रथम क्रमांक

## अमरावती परिमंडळात लागले ३ लाख स्मार्ट मीटर

**अमरावती/का.प्र.**

ग्राहकांना अचूक बिलासोबत विविध सुविधा उपलब्ध करून देणारे ८७.५७ लाख अत्याधुनिक स्मार्ट मीटर बसवून महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक मिळविला असून राज्याच्या या यशात महावितरणची ८५.८५ लाख स्मार्ट मीटरसह प्रमुख कामगिरी आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.स्मार्ट मीटर बसविण्यातही महाराष्ट्र राज्य पहिल्या क्रमांकावर आले आहे. आतापर्यंत महावितरणच्या अमरावती परिमंडळात २ लाख ९९ हजार ९१५ स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्यात १ लाख ८० हजार १९३ आणि यवतमाळ जिल्ह्यात १ लाख १९ हजार ७२२ स्मार्ट मीटरचा समावेश आहे.

शंभर टक्के अचूक बिल, ग्राहकांना दर तासाला मोबाईलवर विजेचा वापर समजण्याची सुविधा, सवलतीच्या वीजदराच्या काळात अधिक वीजवापराची उपकरणे वापरण्याचे नियोजन करणे व विजेचा वापर नियंत्रणात ठेवण्याची संधी असे अनेक लाभ असलेले स्मार्ट मीटर महावितरणकडून मोफत बसविण्यात येत आहेत. स्मार्ट मीटर बसविलेल्या घरगुती वीज ग्राहकांना दिवसाच्या वीज वापराबद्दल प्रती युनिट ८० पैसे टीओडी सवलतही देण्यात येत आहे. त्याच प्रमाणे औद्योगिक आणि वाणिज्यिक वीज ग्राहकांनाही सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीज वापरासाठी वीजदरात सवलत देण्यात येत आहे. राज्यात ९ फेब्रुवारी ते २३ फेब्रुवारी या कालावधीत स्मार्ट मीटर जनजागृती पंधरवडा साजरा करण्यात येत आहे.

स्मार्ट मीटर बसविण्याच्या बाबतीत १० फेब्रुवारीपर्यंतच्या ताज्या आकडेवारीनुसार ८७.५७ लाख स्मार्ट मीटरसह महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर असून बिहार (८६.४४ लाख) व उत्तर प्रदेश (८२.७५ लाख) ही राज्ये अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या स्थानावर आहेत. विजेचा वापर कोणत्या वेळेला झाला त्यानुसार वीजदरात सवलत देण्याला टाईम ऑफ डे (टीओडी) सवलत म्हणतात. स्मार्ट मीटरमध्ये अशा प्रकारे वेळेनुसार वीजवापर मोजण्याची सुविधा आहे व ग्राहकांनाही त्यांच्या मोबाईल फोनमधील ॲपमध्ये दर तासाला आपल्या घरात अथवा कार्यालयात किती वीज वापर होत आहे, हे समजते. स्मार्ट मीटरमुळे घरगुती ग्राहकांनाही टीओडी सवलत सुरू केली आहे. राज्यातील ५४ लाख ४२ हजार घरगुती ग्राहकांना जुलै २०२५ ते जानेवारी २०२६ या सात महिन्यांच्या मासिक वीजबिलामध्ये तब्बल ५१ कोटी ४२ लाख रुपयांचा लाभ झाला आहे. याखेरीज या कालावधीत लघुदाब वर्गवारीतील औद्योगिक ग्राहकांना १०६ कोटी ८९ लाख रुपये, वाणिज्यिक ग्राहकांना ४३ कोटी रुपये, सार्वजनिक पाणीपुरवठ्यासाठी ७ कोटी ३० लाख रुपये तर अन्य ग्राहकांना ६ कोटी ७० लाख रुपये टीओडी सवलत लाभ झाला आहे. याची एकूण रक्कम २१५ कोटी ३५ लाख रुपये होते. उच्चदाब ग्राहकांना या कालावधीत दिवसाच्या वीजवापराबद्दल १३४९ कोटी रुपयांचा टीओडी लाभ मिळाला असून त्यामध्ये औद्योगिक ग्राहकांचा वाटा ११०५ कोटी रुपये आहे.

राज्यात सर्व विद्युत फीडरवर स्मार्ट मीटर बसविण्यात आले असून त्यांची संख्या ३०,१६४ आहे तर राज्यात २.८० लाख डिस्ट्रिब्युशन ट्रान्सफॉर्मर्सवर स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. त्यामुळे वीज वितरण प्रणालीतील विजेचा नेमका वापर समजण्यास मदत होत आहे. याच्या आधारे वीज वितरण प्रणालीचे प्रभावी व्यवस्थापन करणे, वीजगळती रोखणे आणि प्रभावी एनर्जी ऑडिटसाठी मदत होणार आहे. विजेच्या मागणीचा पॅटर्न अचूक ओळखून त्यानुसार पुरवठ्याचे नियोजन करण्यासाठी ही आकडेवारी अत्यंत उपयुक्त आहे. आगामी काळात ग्राहकांना ज्या सवलती मिळतील त्या स्मार्ट मीटरमध्ये वेळेच्या आधारे झालेल्या वीजवापराच्या अचूक नोंदीच्या आधारावर असतील. त्यामुळे ग्राहकांकडे स्मार्ट मीटर असणे गरजेचे आहे.

**स्मार्ट मीटरचे लाभ**

शंभर टक्के अचूक बिल, ग्राहकाला दर तासाला मोबाईलवर वीजवापर समजतो, दिवसाच्या वीजवापरसाठी वीजदरात टीओडी सवलत, ग्राहकाला वीज वापरावर नियंत्रण ठेवणे आणि वापराचे नियोजन करण्याची सुविधा.

## संक्षिप्त

### साफल्य विद्यालयात निरोप समारोह



**लेहेगाव**-साफल्य विद्यालय, सावरखेड पिंगळाई येथे सहकारमहर्षी स्व. कॉम्रेड नानासाहेब मंगळे यांचा २२ वा स्मृतिदिन व वर्ग १० च्या विद्यार्थ्यांनाकरीता निरोप समारंभ आयोजित केला होता.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे अध्यक्ष विजय मडके यांनी भूषवले तर प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सचिव संजय नानासाहेब मंगळे, संस्थेचे कोषाध्यक्ष अनिल भोजने, शाळा समिती सदस्य विठ्ठलरावजी निचित, पत्रकार तथा शाळा समितीचे सदस्य कैलाससिंग ठाकूर , सेवानिवृत्त मुख्याध्यापक आर. एन.मोहकर उपस्थित होते. वर्ग ९ वी मधील सावरी महेंद्र वानखडे व उन्नती काळबांडे या विद्यार्थिनींनी तसेच इयत्ता दहावी मधील माही पिंटू धिमान, श्रावणी दीपक वानखडे, ऋतुजा गजानन गवळी, चंचल रवींद्र बादशे या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. परीक्षेला सामोरे जात असताना विद्यार्थ्यांनी एकाग्रतेने अभ्यास केला पाहिजे असे मत संस्थेचे सचिव संजय नानासाहेब मंगळे यांनी व्यक्त केले. पत्रकार कैलाससिग ठाकूर यांनी स्व.नानासाहेब मंगळे यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला. यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक आर. एन. मोहकर, एस. एन. जाणे,एस. बी. खैरकर, प्रतीक्षा राऊत,योगिता हिरुळकर, कॉन्व्हेंट शिक्षिका जोमदे , विनय डहाके उपस्थित होते. संचालन विज्ञान शिक्षक नरेंद्र सुळे व आभार प्रदर्शन मुख्याध्यापक प्रशांत आजनकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता गणित शिक्षक श्रीराम गुंजीटे,आर.बी .मालपे, बी. ओ. ठाकूर यांनी प्रयत्न केले.

### शिवजयंतीनिमित्त 'उड्डाण' तर्फे रक्तदान शिबीर

**अमरावती**-उड्डाण इंजिनीअर्स मल्टिपर्पज सोसायटी, अमरावती तर्फे येत्या १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंतीच्या पावन पर्वावर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर उड्डाण इंजिनीअर्स मल्टिपर्पज सोसायटी यांच्या पुढाकाराने पी.डी.एम.एम.सी. रक्तपेढी येथे सकाळी ९.०० ते दुपारी १.०० या वेळेत आयोजित करण्यात आले आहे. शिवजयंतीच्या प्रेरणेतून समाजासाठी उपयुक्त कार्य घडावे या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, सुरक्षित व शिस्तबद्ध पद्धतीने रक्तसंकलन केले जाणार आहेसर्व इच्छुक व पात्र रक्तदात्यांनी या शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

### बी.ए. सेमि.-३ (एन.ई.पी.) अभ्यासक्रमाच्या परीक्षेत बदल

**अमरावती**-संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची हिवाळी - २०२५ बी.ए. सेमि.-३ (एन.ई.पी.) अभ्यासक्रमातील मेजर - ४ अंतर्गत 'ॲनॉटॉमी व सायकॉलॉजी इन योगा' हा विषय नव्याने परीक्षा योजनेत समाविष्य करण्यात आल्याने सदर विषयाच्या परीक्षेत बदल करण्यात येत असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून कळविण्यात आले आहे.श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला (केंद्र क्र. २०५) या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची परीक्षा श्रीमती आर.डी.जी. महिला महाविद्यालय, अकोला (केंद्र क्र. २०७) ऐवजी श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला या परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल. तसेच बी.एस. पाटील महाविद्यालय, परतवाडा (केंद्र क्र. ११७) आणि स्व. सी.एम.कढी कला व वाणिज्य महाविद्यालय, अचलपूर कॅम्प (केंद्र क्र. १४२) या दोन्ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची परीक्षा बी.एस. पाटील महाविद्यालय, परतवाडा (केंद्र क्र. ११७) ऐवजी विद्याभारती महाविद्यालय, अमरावती (केद्र क्र. १२६) या परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल. यासंदर्भात सर्व प्राचार्य, केंद्राधिकारी, संबंधित महाविद्यालये, परीक्षा केंद्र यांना पत्राव्दारे परीक्षा विभागाकडून कळविण्यात आले असून, वेळापत्रक व परीक्षा केंद्रात झालेला बदल लक्षात घेऊन सर्व विद्यार्थ्यांना माहिती करुन द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे.

## जॅक अँड जिल इंग्लिश स्कूलमध्ये सत्कार समारंभ



**अमरावती/का.प्र.**

स्थानिक जॅक अँड जिल इंग्लिश स्कूल प्रशांत नगर येथे नुकत्याच महानगरपालिकाच्या नगरसेवक निवडणुकीत प्रभाग क्रमांक ११ फ्रेजरपुरा रुख्मिणी नगर मधील नवनिर्वाचित नगरसेवक व नगरसेविकांचा सत्कार समारंभ साजरा करण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर करून कार्यक्रमाची सुरुवात केली. अध्यक्षस्थान प्रभागाचे ज्येष्ठ नागरिक उत्तम बोरकर यांनी ग्रहण केले होते.

कार्यक्रमाला प्रभाग क्रमांक ११ फ्रेजरपुरा - रुक्मिणी नगरचे नवनिर्वाचित नगरसेवक इस्माईल कासम लालू वाले ; सचिन किसन वैद्य,विद्या शिवदत्त माटे व नूतन धनंजय भुजाडे या सर्वांचा सत्कार श्रीमती शांतीदेवी एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक दिलीप गणेश मुदलियार,सचिव दुर्गेश्वरी दिलीप मुदलियार यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन करण्यात आला. कार्यक्रमाला शाळेच्या मुख्याध्यापिका चित्रा सं. डोईफोडे, शालेय सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी तसेच पालक वर्ग यांची उपस्थिती होती. सर्व मान्यवरांनी शाळेच्या वाढ व विकासाकरिता योग्य ती मदत करण्याचे आश्वासन दिले तसेच शाळेच्या कुठल्याही कार्यक्रम किंवा प्रसंगी योग्य ती मदत करण्याचे आश्वासन दिले.

## महाराष्ट्र गोरक्षण संस्था अमरावतीला राज्यस्तरीय पुरस्कार

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र गोरक्षण संस्था अमरावतीला महाराष्ट्रातील शुद्ध देशी गाय सन्मान योजनेअंतर्गत राज्यस्तरीय पुरस्काराने महाराष्ट्र गौसेवा आयोग पुणे आणि महाराष्ट्र सरकारचा पशुविकास विभाग, मुंबई यांनी सन्मानित केले आहे.



हा सन्मान माननीय पशुविकास मंत्री आणि अमरावती विभागाचे गौसेवा आयोग आणि श्री गोरक्षण संस्था, अमरावती यांना 'सर्वोत्तम राजदूत' या पदवीने सन्मानित करण्यात आले आहे. याचे सन्मान प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह बीड येथे आयोजित एका समारंभात महाराष्ट्र गौसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी संस्थेला प्रदान केले. या सन्मानाबद्दल मंत्री ॲड.आर.बी. अटल दीपक यांनी 'गोरक्षण संस्थेचे सर्व विश्वस्त, सदस्य, कर्मचारी आणि अमरावती शहरातील सर्व गोप्रेमींचे अभिनंदन आणि कृतज्ञता व्यक्त केली आहे. ज्यांच्या मार्गदर्शन आणि सेवेमुळे हे कार्य यशस्वी होत आहे.

## अल्पवयीन मुलीची गळफास लावून आत्महत्या

**बेलोरा/वार्ताहर**

चांदूरबाजार पोलीस स्टेशन अंतर्गत जसापूर येथील रोहिणी गोपाळराव मोहेकर (वय पंधरा वर्षे) तिने आपल्या राहत्या घरी रात्रीच्या वेळेस गळफास लावून आत्महत्या केली. सकाळी घरच्या लोकांना माहीत झाले असता लगेच चांदूरबाजार पोलीस स्टेशनला माहिती देण्यात आली. चांदूरबाजारचे ठाणेदार उल्हास राठोड, नितीन डोंगरे, राहुल गावरखेडे घटनास्थळ जाऊन पंचनामा केला. शवविच्छेनाकरिता अमरावती येथे आणण्यात आले.सदर मुलगी टोम्पे कॉलेज चांदूरबाजार येथे अकरावी शिकत होती. तिने गळफास का घेतले अजून पर्यंत याची माहिती मिळाली नाही. चांदूरबाजार चे प्रभारी ठाणेदार उल्हास राठोड यांनी मर्ग हा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास जमदार नितीन डोंगरे, राहुल गवरखेडे करीत आहे.

## दारुच्या नशेत विहिरीत पडून महिलेचा मृत्यू

**बेलोरा/वार्ताहर**

चां.बा.पोलिसस्टेशन अंतर्गत येणा-या सोनोरी मार्गावरील नुर कुरेशी यांच्या शेतात असलेल्या विहिरीत दारुच्या नशेत पडून महिलेचा मृत्यू झाला. फिर्यादी अर्जुन जामुनकर यांच्या तक्रारीवरुन मर्ग दाखल करण्यात आला आहे. सदर महिला चंदा कृष्णा बैठकर (वय ३०रा.दाबला, आटनेर) हि फिर्यादीची बहिन असून गेल्या एक महिन्यापासून ती तुर सोंगण्याकरिता वाडीत आली होती. रविवार १५ फेब्रुवारी रोजी चंदा व तीचा पती हे दोघेही आठवडी बाजारात गेले. तेथुन येतांना दोघांनीही मद्य प्राशन केले. शेतात आल्यावर ती विहिरी जवळ बसली असता तोल जाऊन विहिरीत पडली आणि तिचा मृत्यू झाला. याप्रकरणी पुढील तपास प्रभारी ठाणेदार उल्हास राठोड,जमदार नितीन डोंगरे, राहुल गवरखेडे करीत आहे.

## जिद्द व मेहनत...



तेलंगणा राज्यातून राकेश टिकून हे बाप लेक १६ फेब्रुवारी रोजी आसेगाव बस स्थानकावर महिंद्र जी टू या वाहनावर हळद करणारे यंत्र बसून त्यांनी सकाळी ७ ते १२ वाजेपर्यंत ग्राहकांसमोरच ३०० रू प्रति किलो हळकुंडाची हळद विक्री केली. या ५ तासात जवळपास ५० हजार रुपयाचा व्यवसाय करून आपल्याकडील बेरोजगार तरुणां समोर जिद्द व मेहनत असेल तर पैसा कुठे जाऊन कमावू शकतो. असे एक उत्तम उदाहरण या परप्रांतीय कुटुंबांनी दिले.

**(छाया-किशोर मोकलकर,आसेगाव पूर्णा)**

## जुळ्या शहरात २७ कोटींची थकबाकी

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर नगरपरिषदेच्या मालमत्ता धारकांकडे तब्बल २७ कोटी रुपयांची चालू व थकबाकी आहे. त्यामुळे नगरपरिषद प्रशासनाकडून मालमत्ता कर वसुलीसाठी विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे.अचलपूर नगरपरिषद अंतर्गत परतवाडा-अचलपूर शहरात एकूण ३२ हजार ३०० मालमत्ताधारक असून मालमत्ताधारकांकडे मोठ्या प्रमाणात कर थकीत आहे. प्रचंड कर थकीत असल्याने याचा परिणाम शहरातील विकासकामांवर होत आहे.अचलपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांनी याबाबत आढावा बैठकांचा धडाका लावला आहे. संबंधित विभाग ॲक्टिव्ह झाले आहे. सध्या अचलपूर नगरपरिषद हद्दीतील अचलपूर-परतवाडा या जुळ्या शहरातील मालमत्ताधारकांकडे चालू वर्षाची चार कोटी, तर थकीत तब्बल २३ कोटी, अशी एकूण जवळपास २७ कोटी रुपयांची थकबाकी आहे. यापैकी तीन कोटींची वसुली झाली असून फिनले मिलकडे आठ कोटी व कोर्ट प्रकरणाचे पाच कोटी थकीत आहेत. सर्व मालमत्ताधारकांना सुरवातीला बिले व नंतर थकबाकीदारांना नगरपरिषद प्रशासनाकडून नोटीसेस बजावण्यात आल्या.



मालमत्ताधारकांनी आपल्याकडील कराचा भरणा नगरपारिषद कार्यालयात करावा, असे आवाहनही नगरपरिषद प्रशासनाकडून करण्यात आले आहे.थकबाकीसाठी विशेष मोहीम राबविण्यात येत असून पथके स्थापित करण्यात आले आहेत. तर थकबाकीधारांना नोटीसेस बजावण्यात आल्या आहेत. थकबाकीदारांनी कराचा भरणा करून प्रशासनाला सहकार्य करावे. मुख्याधिकारी असे आवाहन धीरजकुमार गोहाड यांनी केले आहे.

## डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात कौशल्य विकास कार्यशाळा



**अमरावती/का.प्र.**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता विविध तज्ञ व्यक्तींचे उद्बोधन वर्ग तसेच व्यक्तिमत्त्व विकासाकरिता डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात कौशल्य विकास कार्यशाळा घेऊन विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले.

डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती ,येथे विद्यार्थी विकास विभाग ,संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांचा संयुक्त विद्यमाने चार दिवसीय कौशल्य विकास कार्यशाळा संपन्न झाली. त्यामध्ये महाविद्यालयातील अंतीम वर्षाचे महाविद्यालयीन विद्यार्थी यांनी सहभाग घेतला होता. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाने वेगवेगळ्या प्रकारचे उद्बोधन वर्ग आयोजित केले होते. त्यामध्ये डॉ. जितेंद्र बारुळकर,डॉ. क्षितिज शहा, डॉ. पल्लवी मांडवगडे, डॉ. विजय देशमुख या संसाधन व्यक्तींनी , गोल सेटिंग, मोटिव्हेशन, टाइम मॅनेजमेंट अश्या सारख्या दहा विषयावर मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांना या कार्यशाळेबद्दल संपूर्ण समाधान व्यक्त केले.शिक्षणाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना जे कौशल्य आवश्यक आहे त्याबद्दल या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले होते व आमचे भावी जीवनात वकिली व्यवसायात ते आम्हाला नक्कीच उपयोगात येईल असे त्यांनी सांगितले. याकरिता महाविद्यालयाचे विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.डॉ.महेंद्र इंगोले, कार्यशाळेच्या समन्वयीका डॉ. राधिका देशमुख यांनी प्राचार्या डॉ. वर्षा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा यशस्वीरीत्या संपन्न झाली.

## पाचव्या आई -महोत्सवात ३ मे ला संत अच्युत महाराज साहित्य संमेलन

### संमेलनाध्यक्षपदी ॲड संत सचिन देव महाराज

**दर्यापूर/वार्ताहर**

आपल्या अभिनव आयोजनाने संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष केंद्रीत करणारा दर्यापूर येथील आई महोत्सव या बहुआयामी कार्यक्रमाचे आयोजन १ ते ११ मे या दरम्यान दर्यापूर येथे करण्यात आले असून या महोत्सवात ३ मे या दिवशी एक दिवसीय तिसरे संत अच्युत महाराज साहित्य संमेलन संपन्न होत आहे .

या संमेलनाच्या अध्यक्षपदी ब्रम्हलीन संत अच्युत महाराज यांचे परमशिष्य ह भ प ॲड संत सचिन देव महाराज उपस्थिती देऊन आपल्या अमृततुल्य वाणीने संबोधीत करणार आहेत. स्थानिक गाडगेबाबा मंडळाच्या वतीने या बहुप्रतिक्षीत आई महोत्सवाचे



आयोजन दर्यापूर येथे करण्यात येत असते . दर्यापूर येथे आपल्या वार्षिक महाशिवरात्री प्रबोधन सप्ताहात उपस्थित संत सचिन देव महाराज यांचा यथोचित सत्कार करून आई महोत्सव संकल्पनेचे जनक तथा गाडगेबाबा मंडळाचे संस्थापक प्रा गजानन भारसाकळे यांनी महाराजांना संमेलनाचे अध्यक्षपद भूषविण्याची तथा संमेलन आयोजन परवानगीची प्रार्थना केली .या प्रसंगी दर्यापूर- बनोसा-बाभळी संत अच्युत महाराज सत्संग मंडळाचे अध्यक्ष ॲड किरण मोकासदार,अपर्णा मोकासदार, महाराजांचे दैनंदिन सहकारी बंडू गावंडे,एकनाथ देवळे, शुभम देवळे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती . संत अच्युत महाराजांचा प्रबोधनपर साहित्य निर्मितीचा व्यासंग अतिशय प्रचंड असून त्यांचे द्वारे ग्रंथ व पुस्तक निर्मितीचे अलौकीक कार्य घडल्याने या सर्व साहित्याला साहित्य संमेलना द्वारे उजाळा देऊनच मानवंदना दिल्या जाऊ शकते यासाठी या संमेलनाचे आयोजन असल्याचे प्रा भारसाकळे यांनी या प्रसंगी विषद केले. या अगोदरचे दोन्ही साहित्य संमेलने हे अमरावती येथे पार पडले असून या तिसऱ्या साहित्य संमेलनाच्या निमित्याने संत अच्युत महाराजांच्या निष्काम कार्याची ज्योत अखंडपणे तथा प्रखरतेने तेवत ठेवणारे संत ॲड सचिन देव महाराज यांच्या कर्मयोगी कार्यावर प्रकाश टाकणारा एक गौरव ग्रंथ प्रकाशीत होणार असून संत अच्युत महाराजांचे देश विदेशभर पसरलेल्या भाविक भक्तांनी या ग्रंथात लिखाण करण्याची संधी या संमेलनाद्वारे प्राप्त होणार आहे . तसेच या निमित्याने विविध स्पर्धांचेही नियोजन करण्यात येत आहे .या दिवशी स्थानिक रामदेव बाबा मंदीर परिसरापासून साहित्य संमेलन आयोजन स्थळापर्यंत महाराजांच्या ग्रंथ साहित्य दिंडी - पालखी मिरवणुकीचे सुद्धा आयोजन करण्यात येणार आहे . या निमित्याने पुनःच्य एकदा अमरावती येथील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे अच्युत महाराजांच्या भरीव तथा लोक कल्याणकारी साहित्य निर्मिती निमित्य लक्ष केंद्रीत करून त्यांना मरणोत्तर डी . लिट . पदवी मिळण्याची मागणी करण्यात येणार आहे .

## सावित्रींच्या देशात महायुतीचा प्रवास

# 'लाडक्या बहिणी'पासून, आता 'वहिनींच्या हाती सूत्र' देण्यापर्यंत !

**कुणी काहीही म्हणो मात्र ज्या राजकीय लांडग्यांनी अजीतदादांचा घात केला त्यांच्यापासून आता स्वत:चा पक्ष आणि कुटूंबाला सावरायचे आहे याचे भान नक्कीच असल्याचे त्यांच्या गेल्या पंधरा दिवसातील कृतीमध्ये दिसले आहे. कारण या महाराष्ट्राला राजमाता जिजाऊ, येसुबाई, ताराराणी अहिल्यादेवी, झाशीची राणी अश्या असंख्य कर्तबगार, धैर्यशिल महिलांची समृध्द परंपरा लाभली आहे. पती निधनानंतरही वैधव्य प्राप्त झाले तरी खचून न जाता आपल्या पतीला साजेशी दैदिप्यमान कामगिरी करत कर्तव्यभान आणि पराक्रम गाजविणा-या या महिलांच्या यादीतल्याच म्हणून सुनेत्राताई पवार यांच्याकडे पाहिले जात आहे. सावित्रींच्या देशात लाडक्या बहिणीपासून सुरू झालेला महायुतीचा प्रवास आता 'वहिनींच्या हाती सूत्र' देण्यापर्यंत आला आहे!**

### ही 'सावित्रीची लेक' डगमगली नाही

महाराष्ट्रात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शहरी आणि ग्रामिण भागातील निवडणूका पार पडल्या आहेत. राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर त्यांच्या धर्मपत्नी सुनेत्राताईंनी उत्तराधिकारी म्हणून त्यांच्या अपूर्ण कार्याची धुरा आपल्याकडे नेटाने घेतली आहे. राष्ट्रवादीच्या विधीमंडळातील गटनेतेपदी त्यांची निवड अजीत पवार यांच्या निधनाच्या तिस-याच दिवशी झाली. त्यानंतर त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्विकारण्याची इतकी घाई का केली? म्हणून 'मोठ्या' वर्तमानपत्रातून अग्रलेखही प्रकाशित झाले. विलीनीकरणाचे राजकारण, अजित पवार यांच्या अकाली निधनाच्या घटनेत घातपाताची शक्यता अश्या असंख्य विषयांची राळ उठवली जात असतानाच सुनेत्रावहिनी मात्र धिरोदात्तपणे आपल्यावरील राजकीय आणि प्रशासकीय जबाबदा-यांचा निर्वाह करताना दिसत आहेत. त्यांनी नवीदिल्लीत जावून भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची सहकुटूंब भेट घेतली. या भेटीनंतर त्यांच्या दिल्लीच्या दौ-यात हे देखील स्पष्ट झाले की, सध्याच त्यांच्या खासदारकीचा राजीनामा त्यांनी दिलेला नाही. आणि पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदीही त्याच विराजमान होणार आहेत. त्यामुळे काळाचा अचानक घाला आला तरी ही 'सावित्रीची लेक' डगमगली नाही हेच अधोरेखीत झाले आहे.



बीड आणि पुण्याच्या जिल्हा नियोजनाच्या बैठकीला त्यांनी हजेरी लावली, भल्या सकाळी दादांप्रमाणेच बारामती येथे जनता दरबारही घेतला. दादांच्या निधनामुळे खचलेल्या कार्यकर्त्यांना धीर देताना 'मी तुमच्या पाठिशी आहे' असे सांगत आपले 'डोंगरा एवढे दु:ख' बाजुला ठेवल्याचे दिसले. कुणी काहीही म्हणो मात्र ज्या राजकीय लांडग्यांनी अजीतदादांचा घात केला त्यांच्यापासून आता त्यांना स्वत:ला आणि पक्ष आणि कुटूंबाला सावरायचे आहे याचे भान नक्कीच असल्याचे त्यांच्या गेल्या पंधरा दिवसातील कृतीमध्ये दिसले आहे. कारण या महाराष्ट्राला राजमाता जिजाऊ, येसुबाई, ताराराणी अहिल्यादेवी, झाशीची राणी अश्या असंख्य कर्तबगार, धैर्यशिल महिलांची समृध्द परंपरा लाभली आहे. पतीनिधनानंतरही वैधव्य प्राप्त झाले तरी खचून न जाता आपल्या पतीला साजेशी दैदिप्यमान कामगिरी करत कर्तव्यभान आणि पराक्रम गाजविणा-या या महिलांच्या यादीतल्याच म्हणून सुनेत्राताई पवार यांच्याकडे पाहिले जात आहे. माजी मंत्री पदमसिंह पाटलांच्या घरात जन्मलेल्या या लेकीला राजकारणाचे बाळकडू बालपणापासून मिळाले आहे. शिवाय पवार घराण्याची सून म्हणून मागील चाळीस वर्ष त्यांनी अनेक व्यावसाईक कौटूंबिक जबाबदा-यांचा निर्वाह केला आहे. बारामती टेक्नो पार्क पासून विद्याप्रतिष्ठान पर्यंत अनेक व्यावसाईक कार्यात त्या पहिल्यापासून सक्रिय आहेतच. शिवाय मागील दोन वर्षापासून त्या राज्याच्या राजकारणात सक्रीय झाल्या आहेत. बारामतीच्या लोकसभा निवडणूकीत नणंदबाई सुप्रिया सुळे यांच्याकडून पराजीत झाल्यानंतरही अजीत पवार यांच्याकडून त्यांना राज्यसभेवर पाठविण्यात आले. तो निर्णय किती अचूक होता हेच आताच्या राजकीय स्थितीमध्ये प्रकर्षाने जाणवले आहे. त्यानंतर त्या सक्रिय राजकारणात कार्यरत राहिल्याच आहेत. अचानक अनपेक्षीतपणे त्यांच्या या राजकीय प्रवासाला सुरूवात झाली असली तरी अजीतदादासोबत त्यांची 'सावली' म्हणून चालणा-या या माऊलीकडे आता लोकांकडून अजीतदादांचे 'प्रतिबिंब' म्हणून पाहिले जावू लागले आहे. याची जाणिव त्यांना आहे.

### राज्य शासन-प्रशासनात फेरबदल?

असे असलेतरी अजितपवार यांच्याकडे आग्रहपूर्वक असलेल्या वित्तविभागाला वगळून भाजपने सुनेत्रावहिनींकडे सध्या ती जबाबदारी दिली नाही. याचे कारण लवकरच राज्याचा अर्थसंकल्प तयार करण्याची अणि सहा मार्चला तो सादर करण्याची घाई असल्याने हे पद तुर्तास मुख्यमंत्र्याकडे ठेवण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. मात्र लवकरच राज्य मंत्रिमंडळात फेरबदल होण्याचे शक्यता असून सुनेत्रा पवार यांनी त्यासाठी आग्रह धरावा आणि दिलीप वळसे पाटील किंवा जयंत पाटील यांच्यासारख्या अनुभवी नेत्यांकडे ही जबाबदारी सोपवावी असे बोलले जात आहे. सध्या धनंजय मुंडे आणि माणिकराव कोकाटे या दोन मंत्र्याच्या जागा मंत्रिमंडळात खाली आहेतच. त्यामध्ये राष्ट्रवादीच्या रिक्त मंत्र्याच्या जागा भरताना काही खाती बदलून घेतली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे राज्याचे सध्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडील खाते राष्ट्रवादीला दिले जाण्याची शक्यता असून भोसले यांच्याकडे महसूल विभागाचा कार्यभार दिला जाण्याची शक्यता आहे. या शिवाय सध्याचे महसूलमंत्री बावनकुळे यांच्याकडे वित्तखात्याची जबाबदारी दिली जाण्याची शक्यता सूत्रांनी व्यक्त केली आहे. या शिवाय शिवसेना (शिंदे) यांच्या पक्षाच्या तीन चार मंत्र्याच्या खात्यांमध्येही बदल अपेक्षीत असून शिक्षण, उद्योग, सामाजिक न्याय अश्या खात्यांना नवे मंत्री दिले जाण्याची शक्यता आहे असे या सूत्रांनी सांगितले. भाजपच्याही काही मंत्र्यांना घरचा रस्ता पहावा लागण्याची शक्यता असून काही नव्या मंत्र्याची वर्णी लागण्याची शक्यता आहे. येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर हे फेरबदल अपेक्षीत असून त्याबाबत दिल्लीश्वरांच्या पातळीवर चाचपणी सुरू झाली आहे, असे सांगण्यात येत आहे.राज्याच्या प्रशासकीय भाकरीला देखील फिरवले जाण्याची शक्यता असून अनेक महत्वाच्या खात्याच्या सचिवांच्या तसेच महापालिका आयुक्त्यांच्या बदल्या येत्या दोन महिन्यात अपेक्षीत असल्याचे सांगण्यात येत आहे. राज्य सरकारमध्ये प्रशासनावर मुख्यमंत्री फडणवीस यांच्यानंतर वचक असलेल्या अजीत पवार यांच्या एक्झीटनंतर नवा डाव मांडला जात असून शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांना आणि मंत्र्याना त्यात कश्या प्रकारचे स्थान मिळणार आहे हा देखील महत्वाचा प्रश्न आहेच.

### पुन्हा एकदा फाटाफुटीचे राजकारण?

खरेतर आता नव्या सरकारचा दोन वर्षाचा कार्यकाळ येत्या नोव्हे महिन्यात पूर्ण होणार असून त्यापूर्वी राज्य महामंडळाचे वाटप करण्याचे वेध लागले आहेत. त्यात मागील काळात सत्तापदे मिळू न शकलेल्या दिग्गजांना सामावून घेण्याचा भाजपचा प्रयत्न असून राष्ट्रवादी शरद पवार किंवा ठाकरेंच्या शिवसेनेतील काही नेते गळाला लावण्याचा प्रयत्न केला जाण्याची शक्यता आहे. ही शक्यता काँग्रेस पक्षाच्या काही दिग्गज नेत्यांबाबत देखील सांगण्यात येत असून शतप्रतिशत भाजपच्या २०२९च्या तयारीचा भाग म्हणून अनेक राजकीय उलथापालथी केल्या जाण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादीच्या दोन गटाचे विलीनीकरण झाल्यास त्यातून काही आमदारांचा गट वेगळा होण्याची किंवा भाजपसोबत जाण्याची शक्यता व्यक्त केली जात असून तसे झाल्यास शिवसेनेतही पुन्हा एकदा फाटाफुटीचे राजकारण केले जाण्याची शक्यता सूत्रांकडून व्यक्त केली जात आहे.

### 'कुछ भी हो सकता है'

अजीत पवारांच्या अकाली एक्झीट नंतर राजकारणात काहिशी भिती आणि हतबलतेची भावना असून 'कुछ भी हो सकता है' यावर सर्वाचा विश्वास दृढ झाला आहे. मात्र रोहित पवार यांच्याकडून अजित पवार यांच्या मृत्यूप्रकरणाची चौकशी करण्याबाबत टामपणे मागणी होत असताना दोन्ही बाजूच्या बड्या नेत्यांकडून मात्र याबाबत सावध भुमिका त्यामुळेच व्यक्त केली जात आहे. अनेकांना आपल्या राजकीय अस्तित्वाची चिंता असल्याने आपल्यामागे आपल्या कुटूंबियांच्या चिंतेमुळे अनेकजण मूकबधीर झाल्यासारखे झाले आहेत, असे जाणकार सूत्रांकडून सांगण्यात येत आहे. असे असले तरी ज्या हिमतीने रोहित पवारांकडून दादांचा घात झाल्याचे सूचित केले जात आहे ते पाहता फार दिवस याबाबत चुप्पी साधणे सरकार आणि यंत्रणेलाही शक्य होणार नाही. गोपीनाथ मुंडे यांच्या निधनानंतरही अशीच स्थिती असल्याने यावेळी देखील लोकांकडून ही गोष्ट काही दिवसांनी विसरली जावी यासाठी प्रयत्न केले जाण्याची शक्यता आहे, तपास यंत्रणावर अविश्वास नको हे मुख्यमंत्र्याचे वक्तव्य त्यातूनच आले आहे. मात्र 'एका मंत्र्याच्या जिवीताची हमी' सरकार घेवू शकत नसेलतर मुख्यमंत्र्यानाही असे बोलताना 'नैतिक अधिष्ठान' राहते का? याचा विचार केला पाहिजे. असे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे सीआयडी तपास केला जाण्याची घोषणा झाली तरी उच्चस्तरीय चौकशीची मागणी आता जोर धरत आहे, त्यात मंत्रीपदावर असलेल्या झिरवाळ सारख्या मंत्र्याना कसे रोखायचे? असा प्रश्न राष्ट्रवादीच्या नेत्यांपुढे असल्याचे दिसत आहे. त्यातूनच झिरवाळ यांच्या कार्यालयात ३५ हजार (की ५०?) लाच प्रकरणाचा गाजावाजा होताना दिसत आहे. मात्र मुळात मंत्रालयात दहा हजारापेक्षा जास्त रक्कम आणायला मज्जाव असताना संबंधितानी त्यापेक्षा जास्त पैसे मंत्री कार्यालयात दुस-या मजल्यावर आणलेच कसे? मंत्रालयाची डिजीटल सुरक्षा यंत्रणा काय करते? असा वेगळाच सवाल निर्माण झाला आहे. राजकीय दबावतंत्राच्या राजकारणात असे चमत्कार आता होत राहणार आहेत ते पहायचे आणि गप्प रहायचे का? असा प्रश्न सुज्ञास सतावणे स्वाभाविक आहे नाही का? तुर्तास इतकेच!

**किशोर आपटे**

---

## शिक्षण क्षेत्राच्या समस्या सोडविण्यासाठी शिक्षकच प्रतिनिधी हवा!



**शि**क्षक मतदारसंघ ही व्यवस्था शिक्षकांना त्यांच्या व्यावसायिक हितासाठी, शैक्षणिक धोरणांवर प्रभाव टाकण्यासाठी आणि सशक्त लोकशाहीदृष्ट्या आवाज मिळवण्यासाठी दिलेली एक विशिष्ट घटना आहे. ही जागा म्हणजे शिक्षकांच्या प्रतिनिधीत्वाची व्यासपीठ आहे, जेथे खऱ्या अर्थाने शिक्षक असलेली, शिक्षणाशी बांधिलकी असलेली आणि शिक्षकांच्या प्रश्नांची जाण असलेली व्यक्तीच निवडून यायला हवी. पण आज दुर्दैवाने, शिक्षक नसलेले, शिक्षण क्षेत्राशी संबंध नसलेले, पदवीधर देखील नसलेले, काही वेळा बारावी पास न झालेल्या राजकीय लोकांनीही फक्त धनशक्तीच्या जोरावर या मतदारसंघात निवडणूक लढवण्याचा अट्टाहास सुरू केला आहे. ही परिस्थिती चिंताजनकच नव्हे, तर शिक्षकी प्रतिष्ठेचा घात करणारी आहे.

### शिक्षक प्रतिनिधी म्हणजे शिक्षकच!

शिक्षकांच्या प्रतिनिधीत्वाची जबाबदारी केवळ शिक्षकानेच पार पाडावी, हे एक स्वाभाविक तत्त्व आहे. ज्याला शिक्षण व्यवस्थेतील समस्या माहित नाहीत, विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतील आशा समजत नाही, शासनाच्या परिपत्रकांचा अर्थ लागत नाही, शिक्षणधोरणाच्या बैठकांना कधी सामोरे गेले नाही अशा व्यक्तीला शिक्षकांचे प्रश्न, व्यथा, गरजा आणि दिशा कशी कळणार? प्रतिनिधी हा आपल्या पथदर्शकांसाठी असतो. जर त्याला शिक्षणाच्या प्रवाहाची आणि नियामक यंत्रणांची जाणीवच नसेल, तर तो शिक्षकांचे नेतृत्व करेल कसे?

### निवृत्त नव्हे, सक्रिय शिक्षक हवा

गेल्या काही वर्षात विधानपरिषद निवडणूक लढवून आमदार होणे सहज वाटत असल्यामुळे धन दांडग्या उद्योगपती व राजकारणी लोकांनी आमदार होण्याच्या हौसे पायी या मतदारसंघावर आपले प्रभुत्व प्रस्थापित केले आहे, पण सध्याच्या शिक्षकांसाठी, शासन धोरणांशी सतत झुंजणाऱ्या प्रश्नांसाठी आणि आजच्या शिक्षकांच्या मानसिक, आर्थिक, शैक्षणिक गरजांसाठी एक सक्रिय, सशक्त आणि वर्तमानाशी जोडलेला शिक्षकच उपयोगी ठरणार आहे. शिक्षकांचा प्रतिनिधी हा आज शिक्षणव्यवस्थेचा भाग असलेला आणि विद्यार्थी व शिक्षकांच्या प्रश्नांची जाण असलेला असायला हवा, निवृत्तीनंतर मूकदर्शक बनलेला नव्हे.

### पैशाच्या जोरावर प्रतिनिधीत्व नको

मत हे शिक्षकाचे अस्त्र आहे. ते अस्त्र विचारपूर्वक, विवेकाने आणि मूल्याधिष्ठित नेतृत्वासाठी वापरणे ही काळाची गरज आहे. जे शिक्षक नसूनही पैशाच्या जोरावर गिफ्ट्स, डिनर पार्टी, भेटवस्तूंच्या माध्यमातून तुमचं मत विकत घेऊ पाहत आहेत, त्यांना ठामपणे नकार देणे हेच खऱ्या शिक्षकाचे कर्तव्य आहे. हा मतदारसंघ सामाजिक दर्जा, सेवाभाव, आणि शिक्षणाशी निष्ठा यांच्यावर आधारित असावा, केवळ संपत्ती, राजकीय संबंध, किंवा जातीय समीकरणांवर नव्हे.

### शिक्षकांनी विवेक जागवण्याची वेळ

शिक्षक हा समाजाचा विवेक आहे. तो जर मोह, दडपण, किंवा अज्ञानाच्या प्रवाहात वाहून गेला, तर शिक्षणव्यवस्थेचे भविष्य अंधारात जाईल. म्हणूनच शिक्षक मतदार म्हणून तुमचे मत हे फक्त मत नाही, ते शिक्षण क्षेत्राच्या भविष्याचे दार ठरवणारे बोट आहे. त्यामुळे शिक्षक मतदारसंघाचे विधान परिषदेतील खरे प्रतिनिधित्व शिक्षकच करू शकतो. कोणीही बिल्डर, कंत्राटदार, राजकारणी, शिक्षण संस्था संचालक किंवा सेवानिवृत्त व्यक्ती खरे प्रतिनिधित्व करू शकत नाही.ज्या भारतीय संविधानाने शिक्षकांच्या प्रश्नासाठी विधान परिषदेची निर्मिती केली, त्या संविधानाला अभिप्रेत असणाऱ्या उमेदवाराची निवड करणे काळाची गरज आहे..

**डॉ. प्रवीण बनसोड,** अमरावती
मो.९४२३४ २५१२९

---

# बदलीला समस्या नाही तर संधी बनवा...

**शि**क्षक हा फक्त अध्यापक नसतो, तो एक विचारवंत, संस्कारकर्ता आणि समाज घडवणारा असतो. परंतु जेव्हा त्याच्याच कार्यक्षमतेला बदल्यांचे ओझे टोचू लागते, तेव्हा तो मानसिकदृष्ट्या खचतो. बदल्यांचे आदेश हातात येताच बऱ्याच शिक्षकांच्या चेहऱ्यावर निराशेची छाया दिसते. कारण त्यांना हव्या त्या गावात किंवा परिसरात नेमणूक होत नाही.नव्या ठिकाणी अनोळखी समाज, अपुरी सोयी-सुविधा, मुलांमधली अनोळख, आणि कौटुंबिक दूरता यामुळे एक अस्वस्थतेची भावना मनात घर करते.पण आपण विचार केला पाहिजे, ही बदली ही खरंच एक समस्या आहे का? की ती एक नव्या संधीची सुरुवात आहे. प्रत्येक बदलामध्ये एक नवी दिशा, एक नवा अनुभव, एक नवा दृष्टिकोन दडलेला असतो.या बदलाकडे जर आपण सकारात्मक नजरेने पाहिले तर ती एक सुवर्णसंधी ठरू शकते.स्वतःला सिद्ध करण्याची, नव्या मुलांपर्यंत पोहोचण्याची आणि नव्या समाजात आपले ज्ञानाचे रोप रुजवण्याची.



शिक्षकांच्या बदल्या म्हणजे फक्त स्थानांतर नव्हे, तर एक ज्ञानवहनाची प्रक्रिया आहे. एका भागातील शिक्षणपद्धती, अनुभव आणि उपक्रम दुसऱ्या भागात घेऊन जाण्याची ही संधी असते. त्यामुळे शिक्षणक्षेत्रात समानतेचा प्रसार होतो. उदाहरणार्थ, एखादा शिक्षक जो तंत्रज्ञानस्नेही आहे.त्याने जर एखाद्या ग्रामिण शाळेत रुजवलेले डिजिटल शिक्षणाचे प्रयोग नव्या शाळेत सुरू केले, तर त्या परिसरातील विद्यार्थ्यांच भवितव्य उजळू शकत.शाळा बदलली तरी विद्यार्थ्यांची गरज तीच असते समजून घेणारा, प्रेमळ आणि मार्गदर्शक शिक्षक. एका ठिकाणी मिळालेला अनुभव, चुकांमधून शिकलेले धडे, नव्या ठिकाणी अमलात आणता येतात. बदल हा व्यक्तिमत्त्व विकासाचा महत्त्वाचा भाग आहे. जो बदल स्वीकारतो, तोच प्रगती करतो.

हे खरे आहे का, बदलीमुळे कधी कधी कौटुंबिक अडचणी, घरापासून दूर राहणं, आणि आर्थिक अडचणीही निर्माण होतात. पण शिक्षण खात्यानेही या भावनांची दखल घेऊन बदल्यांची प्रक्रिया अधिक पारदर्शक, सुसूत्र आणि शिक्षकांना अनुकूल अशा रीतीने करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर, शिक्षकांनीही आपले मनोबल उंच ठेवून, नवीन ठिकाणी जास्त जोमाने काम करण्याचा निर्धार ठेवावा.'बदली' या शब्दातच 'बदल' आहे.प्रत्येक बदल म्हणजेच प्रगतीची पहिली पायरी. ही संधी आहे स्वतःला नव्याने सिद्ध करण्याची, नव्या विद्यार्थ्यांशी नवी नाती बांधण्याची आणि एका वेगळ्या गावाच्या शिक्षण इतिहासात आपलं पान लिहून ठेवण्याची. प्रत्येक नव्या गावात एक नवीन अनुभव, एक नविन संघर्ष, पण त्यातूनच येतो एक नवा विजय. शिक्षकांनी हे लक्षात ठेवायला हवे की ते जिथे जातात, तिथे एक नवा उजेड घेऊन जातात. त्यांची उपस्थिती म्हणजे त्या गावातील ज्ञानाचा नवा सूर्य.म्हणूनच, बदलीला 'समस्या' न मानता 'संधी' म्हणून स्वीकारा. कारण शिकवणे ही फक्त व्यवसाय नाही . ती एक तपश्चर्या आहे. आणि तपश्चर्येला स्थान नसते, असते एकच ध्येय समाज घडवणे.

प्रभारी मुख्याध्यापक
**किरण गादेकर**
जि.प.प्रा. मराठी शाळा
गडगाभांडूम केंद्र ढाकणा
पं स.चिखलदरा,
जि.प.अमरावती

---

# गर्दीत हरवलेला आवाज : लोकशाहीतील विचारस्वातंत्र्याची शोकांतिका

**स**भागृहांचा गोंगाट, सोशल मीडियावरील कोलाहल आणि क्षणिक प्रतिक्रियांच्या लाटेत लोकशाहीतील विचार स्वातंत्र्याचा खरा आवाज हरवत चालला आहे. मतभिन्नतेचा आदर कमी होत असून संवादाऐवजी संघर्ष वाढतो आहे. माध्यमे, शिक्षण आणि नागरिकांची जबाबदारी यांद्वारे विवेक, संयम आणि सखोल चर्चेची संस्कृती पुन्हा रुजवली गेली, तरच लोकशाहीचा प्राणवायू असलेले विचारस्वातंत्र्य जिवंत राहील.

आजच्या सार्वजनिक जीवनात एक विचित्र विरोधाभास दिसून येतो. सभागृहं भरलेली आहेत, रस्त्यांवर मोर्चे निघत आहेत, सोशल मीडियावर लाखो प्रतिक्रिया उमटत आहेत; परंतु या सर्व गोंगाटामध्ये सखोल आणि संयत विचारांचा आवाज मात्र हरवताना दिसतो. समाजात गर्दी वाढत आहे, पण संवाद कमी होत आहे. आवाजांची संख्या प्रचंड आहे, परंतु त्यामागील चिंतन, विवेक आणि आत्मपरीक्षण क्षीण होत चालले आहे' असे निरीक्षण राहुल गडपाले,यांनी अमरावती येथे मराठी पत्रकार, अमरावती द्वारा उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार वितरण प्रसंगी मांडले. लोकशाहीचा कणा मानले जाणारे विचारस्वातंत्र्य घोषणांच्या कोलाहलात, ट्रोलिंगच्या आक्रमकतेत आणि क्षणिक प्रतिक्रियांच्या वेगात विरघळत आहे.

सोशल मीडियाच्या युगाने प्रत्येकाच्या हातात व्यासपीठ दिले आहे. कोणतीही घटना घडली की काही क्षणांत हजारो प्रतिक्रिया उमटतात. पण या प्रतिक्रियांमध्ये संयम, अभ्यास आणि विवेक यांचा अभाव जाणवतो. विचार मांडण्यापेक्षा तात्काळ प्रतिक्रिया देणे सोपे वाटते. 'लाईक' आणि 'शेअर'च्या आकड्यांनी मतांची किंमत ठरवली जाते. परिणामी, सखोल विश्लेषणापेक्षा भावनिक उद्रेक अधिक प्रभावी ठरतो. या प्रक्रियेत विचारांची खोली कमी होत जाते आणि संवादाचा दर्जा खालावतो.

गर्दीची मानसिकता ही व्यक्तीच्या स्वतंत्र विचारक्षमतेवर परिणाम करते. मानसशास्त्र सांगते की, समूहाच्या दबावाखाली व्यक्ती स्वतःचे मत दडपते आणि बहुसंख्यांच्या मताला अनुसरते. गर्दीत उभा असलेला माणूस अनेकदा स्वतःच्या अंतःकरणाचा आवाज ऐकण्याऐवजी समूहाच्या घोषणांमध्ये सामील होतो. अशा परिस्थितीत प्रश्न विचारण्याची वृत्ती कमी होते. लोकशाहीत प्रश्न विचारणे हे देशद्रोह नसून सजग नागरिकत्वाचे प्रतीक आहे; परंतु आज प्रश्न विचारणाऱ्यांकडे संशयाने पाहिले जाते. टीका म्हणजे विरोध आणि विरोध म्हणजे शत्रुत्व अशी सरसकट समजूत पसरते. परिणामी, संवादाचे क्षेत्र संकुचित होते आणि वैचारिक विविधता कमी होते.

माध्यमांची भूमिका या संदर्भात अत्यंत महत्त्वाची ठरते. माध्यमे समाजाचे प्रतिबिंब दाखवतात, परंतु त्याचबरोबर समाजाला दिशा देण्याची शक्तीही त्यांच्याकडे असते. जबाबदार पत्रकारिता ही केवळ घटना सांगत नाही, तर त्या घटनांचे संदर्भ, परिणाम आणि पर्यायही स्पष्ट करते. वृतपत्रातील लेखन हे लोकमत घडविण्याचे प्रभावी साधन आहे. तथापि, आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक युगात सनसनाटीपणाला अधिक महत्त्व दिले जाते. टी.आर.पी.ऊँझ, क्लिकबेट आणि तात्काळ प्रसिद्धीच्या स्पर्धेत सखोल विश्लेषण मागे पडते. गंभीर प्रश्नांवर संयत चर्चा कमी होत आहे. जर माध्यमांनी विवेक, संतुलन आणि तटस्थता जपली नाही, तर ते समाजातील गोंगाट वाढविण्याचे साधन ठरू शकतात.

आज आवश्यक आहे ती संवादाची संस्कृती पुन्हा जिवंत करण्याची. सार्वजनिक चर्चांना संस्थात्मक स्वरूप देणे, माध्यमांनी विविध मतप्रवाहांना समान स्थान देणे, सोशल मीडियावर जबाबदार वापराची जाणीव निर्माण करणे आणि शिक्षण व्यवस्थेत विचारस्वातंत्र्याला प्राधान्य देणे ही काही आवश्यक पावले आहेत. टीका आणि असहमतीला सकारात्मकतेने स्वीकारले गेले, तरच लोकशाही अधिक सशक्त होईल. लोकशाही ही केवळ मतदानाची प्रक्रिया नाही; ती सतत चालणारी संवाद यात्रा आहे. गर्दीचा गोंगाट थांबवून प्रत्येक व्यक्तीचा आवाज ऐकला गेला, तरच समाजाचे बौद्धिक आरोग्य सुदृढ राहील. आजचा खरा प्रश्न गर्दीचा नाही, तर त्या गर्दीत व्यक्तीचा स्वतंत्र विचार जिवंत आहे का, याचा आहे. जर तो जिवंत ठेवायचा असेल, तर संवादाचे दरवाजे पुन्हा उघडावे लागतील आणि मतभिन्नतेला सन्मानाने स्थान द्यावे लागेल. कारण विचारांचे स्वातंत्र्य हेच लोकशाहीचे प्राणवायू आहे. तो प्राणवायू जपणे हीच आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

**प्रशांत विघे,** अमरावती
राज्यशास्त्र विभाग प्रमुख ,
मो.९३२६८७७७४९

# पातुर तलाव कालव्याच्या दुरवस्थेमुळे २५० हेक्टर शेती सिंचनाविना

■ प्रतिनिधी | पातूर ■

*पातुर तालुक्यातील पातुर तलाव सध्या सुमारे ९० टक्के भरलेला असतानाही कालव्याच्या दुरुस्तीअभावी सुमारे २५० हेक्टर शेती सिंचनापासून वंचित राहिली आहे. तलावात मुबलक पाणीसाठा असताना पाणी शेतीपर्यंत न पोहोचल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.*

## शेतकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा



दरवर्षी या तलावाच्या माध्यमातून परिसरातील शेतजमिनींना सिंचनासाठी पाणीपुरवठा होतो. मात्र यंदा कालव्याची योग्य दुरुस्ती न झाल्याने पाणी बोडखा परिसरापर्यंत पोहोचले नसल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. सन २०२४-२५ या वर्षात कालवा दुरुस्तीसाठी नाम फाउंडेशन यांच्या माध्यमातून काम करण्यात आल्याची माहिती आहे; परंतु प्रत्यक्षात दुरुस्ती अपुरी व निकृष्ट दर्जाची झाल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

कालवा दुरुस्तीच्या नावाखाली दरवर्षी लाखो रुपयांचा अपव्यय होत असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. या प्रकाराची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

याबाबत कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, आमदार नितीन देशमुख (बाळापूर मतदारसंघ), जिल्हाधिकारी कार्यालय अकोला, पातुर तहसीलदार तसेच पातुर तलाव पाणी वापर संस्था अध्यक्ष यांच्याकडे परिसरातील शेतकरी किशोर काळपांडे, सै. अमिर सै. रहुफ, सै. बाबू सै. रहमान, शेख वाजिद कंटोलवाल, शेख लुकमान, म. गाझी म. हमिद, सै. फज्जू, शेख हबीब, सै. इनुस, सै. खाजा सै. अकबर, शेख सत्तार, शेख हुसेन, शेख रहीम, शेख अनिस, नझीर खान, शेख तौसिफ, शेख आसीफ, सै. मुजमील, अलियाल खान आदींनी लेखी तक्रार दाखल केली आहे. योग्य न्याय न मिळाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे. तलावात पाणी असूनही शेती कोरडी राहिल्याने प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून कालव्याची दुरुस्ती पूर्ण करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

# हिंदू महिलांवरील अत्याचाराविरोधात बजरंग दल आक्रमक; कठोर कारवाईची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरात हिंदू महिलांवर कथितपणे काही गुन्हेगारी प्रवृत्तीच्या घटकांकडून छळ व शारीरिक शोषणाच्या घटना वाढत असल्याचा आरोप करत बजरंग दलने तीव्र निषेध व्यक्त केला आहे. संबंधित प्रकरणांमध्ये दोषींवर कठोर कारवाई करून खटले फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवावेत, अशी मागणी संघटनेने प्रशासनाकडे केली आहे.

बजरंग दलाचे विदर्भ प्रांत सहसंयोजक सूरज भगेवार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, काही गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक प्रेमाचे जाळे पसरवून किंवा अन्य मार्गांनी महिलांना लक्ष्य करीत आहेत. त्यामुळे शहरात भीती व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होत आहे. सातत्याने समोर



येणाऱ्या घटना चिंताजनक असून, वेळीच ठोस पावले उचलली नाहीत तर अशा गुन्हेगारांचे मनोबल वाढू शकते, असा इशाराही त्यांनी दिला. महिलांच्या सुरक्षेबाबत प्रशासनाने अधिक सतर्क राहण्याची गरज असल्याचे भगेवार यांनी नमूद केले. अशा प्रकरणांमध्ये तातडीने चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा व्हावी, तसेच पीडित महिलांना कायदेशीर मदत व आवश्यक संरक्षण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. संघटना कोणत्याही निर्दोष व्यक्तीविरोधात नसून केवळ गुन्ह्यात सहभागी असलेल्यांविरोधातच कारवाई व्हावी, असे स्पष्ट करत प्रशासनाने 'झिरो टॉलरन्स' धोरण स्वीकारावे, असेही त्यांनी म्हटले. दरम्यान, या मागण्यांमुळे शहरात महिला सुरक्षा व कायदा-सुव्यवस्थेबाबत चर्चा अधिक तीव्र झाली असून, पोलिस प्रशासनाकडून अधिकृत प्रतिक्रियेची प्रतीक्षा आहे.

# अखेर सावरगावचे सचिव समाधान साळोकार निलंबित

■ **महिला सरपंच व ग्रामस्थांसोबत असभ्य वर्तन भोवले**
■ **सावरगाव व खेट्रीचा प्रभार काढला**

■ प्रतिनिधी | पातूर ■

पातूर पंचायत समिती अंतर्गत सावरगाव येथे कार्यरत ग्रामसेवक तथा सचिव समाधान उकर्डा साळोकार यांना अखेर निलंबित करण्यात आले आहे. जिल्हा परिषद अकोला येथील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली.

साळोकार हे सावरगाव ग्रामपंचायतीत कार्यरत असताना महिला सरपंचांना विश्वासात न घेता मनमानी कारभार करत असल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. तसेच महिला सरपंच व ग्रामस्थांशी असभ्य वर्तन करणे, वरिष्ठांच्या आदेशानुसार कामे न करणे व कर्तव्यात हलगर्जीपणा करणे, असे तीन ते चार गंभीर आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले होते.

या पार्श्वभूमीवर मुख्य कार्यकारी



अधिकाऱ्यांनी उच्चस्तरीय चौकशी समिती गठित केली होती. चौकशीअंती त्यांना तात्काळ निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले. त्या आदेशाची अंमलबजावणी पंचायत समिती पातूर चे गटविकास अधिकारी सतीश नायसे यांनी मंगळवारी (दि. १७ फेब्रुवारी २०२६) केली.

निलंबनाबरोबरच साळोकार यांच्याकडील सावरगाव व खेट्री ग्रामपंचायतींचा प्रभारही काढून घेण्यात आला आहे. सावरगाव ग्रामपंचायतीचा तात्पुरता प्रभार एस. बी. चवरे यांच्याकडे सोपविण्यात आला असून, खेट्री ग्रामपंचायतीचा प्रभार डी. एस. वाहोकार यांच्याकडे देण्यात आला आहे. दरम्यान, साळोकार यांना मुख्यालयी म्हणून तेल्हारा येथे पाठविण्यात आले आहे.

दरम्यान, 'साळोकार यांच्यावर तीन ते चार आरोप ठेवण्यात आले होते. त्यानुसार १७ फेब्रुवारी २०२६ रोजी निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे,' अशी माहिती गटविकास अधिकारी सतीश नायसे यांनी दिली. या कारवाईमुळे सावरगाव परिसरात चर्चा रंगली असून, ग्रामपंचायतीच्या कामकाजात पारदर्शकता व शिस्त राखली जावी, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

# सरपंच पुत्राकडून नोकरीचे आमिष; लाखोंचा गंडा

## पैसे परत न मिळाल्यास पोलीसांत तक्रारीचा इशारा

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील अतिदुर्गम भागातील एका ग्रामपंचायतीतील सरपंचाच्या पुत्राने शासकीय कामे मिळवून देण्याचे आमिष दाखवत सुशिक्षित बेरोजगार तरुणांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. 'तुमच्या नावाने शासकीय कामे मंजूर करून देतो,' असे सांगत संबंधितांनी अनेकांकडून आगाऊ रक्कम घेतल्याचा आरोप होत आहे. मात्र प्रत्यक्षात कोणतीही कामे मिळाली नसून घेतलेली रक्कमही परत करण्यात आलेली नाही.

फसवणूक झालेल्या तरुणांनी सांगितले की, सुरुवातीला विश्वास संपादन करून विविध शासकीय विभागांमध्ये ओळखी असल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर काम मंजूर करून देण्यासाठी आगाऊ पैसे मागण्यात आले. काहींनी तर कर्ज काढून रक्कम दिल्याचेही समोर आले आहे. परंतु अनेक महिने उलटूनही कामांचा पत्ता नाही.

पैसे परत मागण्यासाठी संपर्क साधल्यास सरपंच पुत्रासह कुटुंबीयांकडून उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याचे संबंधितांचे म्हणणे आहे. त्यामुळे लाखो रुपयांची फसवणूक झाल्याचे तरुणांच्या निदर्शनास आले आहे.

यापूर्वीही ग्रामपंचायतीच्या कारभारात हस्तक्षेप करत विविध शासकीय योजनांच्या नावाखाली गोरगरीब ग्रामस्थांकडून पैसे उकळल्याचे आरोप होत आहेत. विहीर, घरकुल, ताडपत्री, कांदा चाळ यांसारख्या शासनाकडून मोफत मिळणाऱ्या योजनांचा लाभ मिळवून देण्याचे आश्वासन देत काही लाभार्थ्यांकडून छोट्या-मोठ्या रकमा घेतल्याची चर्चा गावात रंगली आहे. 'योजना मोफत असताना पैसे कशासाठी?' असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. काही लाभार्थ्यांच्या म्हणण्यानुसार, 'फाईल पुढे सरकवण्यासाठी' आणि 'नाव मंजूर यादीत समाविष्ट करण्यासाठी' पैशांची मागणी करण्यात आली होती. दरम्यान, या प्रकरणामुळे संबंधित कारभाराच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पैसे तातडीने परत न केल्यास फसवणूक झालेल्या तरुणांनी एकत्र येत पुराव्यांसह पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्याचा इशारा दिला आहे. या प्रकरणी संबंधितांकडून अधिकृत प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

# अकोल्यात आरोग्यासोबत घुमला 'झाडे जगवा'चा मंत्र

## पिता–कन्येच्या जनजागृतीची वाकेथॉनमध्ये भुरळ

■ प्रतिनिधी | अकोला ■

आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनाची अनोखी सांगड घालत शहरात पार पडलेल्या 'तीक्ष्णगत आयएमए वाकेथॉन–२०२६'ला अकोलेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. धावण्याच्या या उपक्रमातून शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच निसर्गरक्षणाचा प्रभावी संदेश देण्यात आला. 'झाडे लावा, झाडे जगवा' हा नारा देत वृक्षमित्र



सुनील गोहर व त्यांची कन्या कु. आंचल गोहर यांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधले.

Indian Medical Association (आयएमए) आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने Lal Bahadur Shastri Stadium येथे या वाकेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला आंतरराष्ट्रीय पॅराॲथलीट Sangeeta Vishnoi यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

हजारो नागरिक, युवक-युवती तसेच शालेय विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत उत्साहात धाव घेतली. या गर्दीत सुनील गोहर व आंचल गोहर यांनी पर्यावरण संवर्धनाचे फलक, संदेश आणि घोषणांद्वारे जनजागृती केली. 'केवळ व्यायामाने आरोग्य सुधारत नाही, तर शुद्ध हवा, स्वच्छ वातावरण आणि हिरवळ यांचीही तितकीच गरज आहे,' हा संदेश त्यांनी प्रभावीपणे मांडला. धावण्यासोबतच निसर्ग वाचवण्याचा दुहेरी उद्देश अकोलेकरांना भावला. उपस्थितांनी या पिता–कन्येच्या उपक्रमाचे कौतुक करत आरोग्य आणि पर्यावरण जपण्याची सामूहिक जबाबदारी स्वीकारण्याची गरज व्यक्त केली. आरोग्यदायी जीवनशैली आणि हरित भविष्यासाठीचा हा उपक्रम शहरासाठी प्रेरणादायी ठरला.


**Change In Name**

I have changed my name in my Passport No. (Z3564112), Old Name **PRIYANKA RAMESH BHARADIA** New Name **PRIYANKA PIYUSH ATAL**, R/o Plot No. 52, Ram Nagar, Behind L.R.T. College, Akola, Tg. Distt. Akola - 444 001 AKOLA.
Date : (Priyanka Piyush Atal)

**Change In Name**

I Have Change My Name From- **ABDUL KHALIQ ABDUL BARI** -- To -- **ABDUL KHALIQ ABDUL BARI SHAIKH** PASSPORT NO.:- N1989150 My Residential Address Is:- K-4, Kedar Mandar App., Damle Chowk, Ramdas Peth, AKOLA. PIN CODE : 444006

**Change In Name**

I Have Change My Name From **ABDUL BASIT ABDUL KHALIQ** --To-- **ABDUL BASIT ABDUL KHALIQ SHAIKH** PASSPORT NO.:- N1989150 My Residential Address Is:- C/O:-Abdul Khaliq Shaikh K-4, Kedar Mandar App., Damle Chowk, Ramdas Peth, AKOLA. PIN CODE : 444006

**Change In Name**

I Have Change My Name on My Children Educational Documents From **ZARINA AMIN** --TO-- **ZARINA PARVEEN MOHAMMAD DAOUD AMIN** My Residential Address is Shah Jahan Road Dr ishaq Chawl, Opp. Punch bungla Mominpura Akola 444001 MH

**Change In Name**

I have Changed My Name Form **NASRIN BANO SHAIKH HUSSAIN** --To-- **NASRIN PARVIN SHEKH IRFAN** My residential Address in Sanjay Nagar ward no 1 Near Govsiya Masjid, Nayagao Akola 444003

**Change In Name**

I Have Change My Name on Educational Documents OR KYC Documents FROM MOHAMMAD ZAKIR ABDUL KADIR /आणि/ ABDUL ZAKIR ABDUL KADIR -- TO -- SHAIKH ZAKIR ABDUL KADIR QURESHI निवासी पत्ता - Fish Market, Kagzi Pura, Subhash Road, Akola 444001MH. मुझे पहले विभिन्न दस्तावेज़ों में KASAB / KASAI / QURESHI उपनाम से भी जाना जाता था। आगे से मुझे सभी सरकारी, गैर-सरकारी, कानूनी तथा अन्य अभिलेखों में केवल SHAIKH ZAKIR ABDUL KADIR QURESHI नाम से ही जाना और पहचाना जाएगा।

**जाहीर नोटीस**

सर्वत्र जनतेस वित्तीय संस्थाना बँकांना या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते कि आमचे पक्षकार पिरामल फायनान्स लि. शाखा अकोला ता. जि अकोला यांनी ग्राहक नामे श्री. संदीप हरिदास वसू रा. टाकली बु., ता.अकोट जि. अकोला यांनी आमचे पक्षकाराकडे सदरची मिळकत गहाण ठेऊन कर्ज मिळण्या करीता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :**

मौजे - टाकली बु. अनु. क्र. ८७ मालमत्ता क्र. ८०, क्षेत्रफळ १९८० चौ.फु. व त्यावरील बांधकामासह ग्रा. पंचायत टाकली बु. हद्दीतील, ता. अकोट जि. अकोला.

त्यास चतुर्सिमा :- पूर्वेस : मारोती संस्थान पश्चिमेस :- भगवान वसू उत्तर:- केशव वसू दक्षिण:- रस्ता वरील सदरहू मालमत्ता हि श्री. हरिदास महादेव वसू यांची वडिलोपार्जित मालमत्ता आहे. सदरहू मालमत्ता ही जे. एम. फीनंसिअल होम लोनस येथे रजि. गहाण खत क्र. १५२/२०२४ दिनांक ०८/०१/२०२४ रोजी गहाण केली आहे. तरी वरील मालमत्तेवर जे. एम. फीनंसिअल होम लोनस शिवाय आज रोजी कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्कसंबंध, खरेदी, गहाण, बोजा व ईसार व इतर काही व्यवहार असल्यास वर दिलेल्या पत्यावर ७ दिवसाच्या आत लेखी हरकत नोंदवावी अन्यथा कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नाही. असे समजून आमचे पक्षकार पिरामल फायनान्स लि. शाखा -अकोला वरील मालमत्ता गहाण ठेऊन वरील ग्राहक यांना कर्जाची रक्कम वितरित करतील त्या नंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही करीता जाहीर नोटीस.

दिनांक : १७/०२/२०२६
ठिकाण : अकोला

**अधिवक्ता रुपेश ना. इस्तापे**
(नोटरी भारत सरकार)
ऑफीस: आनंद बेकरी जवळ,
रामदास पेठ, अकोला मो. ९४२३४३०१७१

**जाहीर नोटीस**

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४२/२०२६ — प्रोसेस नं.६५८/२०२६
चौ.ता. २४/०२/२०२६ — दिनांक : १४/०१/२०२६

**अर्जदार :** १. श्री सुरेंद्र प्रभाकर पाठक रा. हरिप्रभा, ओक मार्ग, रेजेन्सी लॉन समोर, जठारपेठ, अकोला, ता. जि. अकोला. २. सौ. विद्या यादुनाथ कुलकर्णी रा. फ्लॅट नं. बी ११०५, विंडोज कोऑप. हाउसिंग सोसायटी, सस-नांदे रोड, ताकसेन वस्ती जवळ, बस. स्टॉप, सस—गाव, पुणे सिटी, पुणे ४११०२१ ३. विनायक प्रभाकर पाठक रा. प्लॉट नं. ४, लहाने हॉल जवळ, केशव नगर, अकोला. ता. जि अकोला. ४. विलास प्रभाकर पाठक रा. हरिप्रभा, ओक मार्ग, रेजेन्सी लॉन समोर, जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला,

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** श्री गजानन प्रभाकर पाठक रा. १०१, सीव्हीआर कॉम्प्लेक्स, झेड कॉर्नर जवळ, मुंडवा, मांजरी रोड, मांजरी पुणे. ता. जि. पुणे. ४१२३०७
**मयताचा पत्ता :-** मयत : १. प्रभाकर शंकरराव पाठक २. नलिनी प्रभाकर पाठक
**पत्ता :-** रा. प्लॉट नं. ४, लहाने हॉल जवळ, केशव नगर, अकोला. ता. जि अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रभाकर शंकरराव पाठक यांचे दि. २९/०३/१९९९ रोजी अकोला ता. जि. अकौला. येथे निधन झाले आहे. तसेच मयत नलिनी प्रभाकर पाठक यांचे दि. ०४/१२/२०१० रोजी बुलढाणा ता. जि. बुलढाणा येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २४/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १४/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १९५४/२०२५ — प्रोसेस नं.२००४६/२०२५
चौ.ता. ३०/०३/२०२६ — दिनांक : ०५/१२/२०२५

**अर्जदार :** श्रीमती लक्ष्मीबाई प्रल्हाद ढोके
रा. देशमुख फाईल, दुर्गा चौक, मोहनसिंग ठाकूर यांचे घराजवळ अकोला ता. जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** १. श्रीमती राधा संतोष ढोके रा. व्दारा दादाराव ठाकरे, १९५ नागेश नगर म्हसाळे रोड वार्ड नं. ०६ नालवाडी, ता. जि. वर्धा २. डिवीजनल मॅनेजर, नांदेड विभाग दक्षिण मध्य रेल्वे नांदेड ता. जि. नांदेड
**मयताचा पत्ता :-** मयत : संतोष प्रल्हाद ढोके
**पत्ता :-** रा.देशमुख फाईल, दुर्गा चौक, मोहनसिंग ठाकूर यांचे घराजवळ अकोला ता. जि. अकोला

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी भारतीय उत्तराधिकार अधिनियमाचे कलम ३७२ अन्वये उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे. त्यांनी अर्जामध्ये असे नमूद केले आहे की. मयत १. संतोष प्रल्हाद ढोके यांचे दि. १०/०४/२०२४ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

अर्जामध्ये पूढे असेही नमूद केले आहे की, सदरहू संतोष प्रल्हाद ढोके हे दक्षिण मध्ये रेल्वे नांदेड विभाग कार्यालय नांदेड ता. जि. नांदेड येथे सर्विसमध्ये कार्यरत होते त्यांची सर्विसमध्ये असतांना अकोला येथे बदली झाली होती, त्यांचे मृत्यू नंतर त्यांचे सर्विसचे लाभ जसे पगार, पेंन्शन भविष्य निर्वाह निधी, उपदान, तसेच सर्विसचे इतर सर्व फायदे इत्यादी.

सदर लाभ मिळण्याकरीता उपरोक्त अर्जदाराने उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळणेसाठी उपरलिखित अर्ज केला आहे. अर्जामध्ये पूढे असेही नमूद केले आहे की, वरील अर्जदार यांच्या शिवाय मयतास कोणीही उत्तराधिकारी नाही. सबब, उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे. करीता अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पातुर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५/२०२६ — प्रोसेस नं.१६५/२०२६
चौ.ता. १६/०३/२०२६ — दिनांक : ०४/०२/२०२६

**अर्जदार :** १. शोभा देविदास अंधारे वय ७५ वर्ष धंदा - घरकाम २ विरेंद्र देविदास अंधारे वय ५५ वर्ष धंदा-शेती ३ जितेंद्र देविदास अंधारे वय ५० वर्ष धंदा- शेती ४. गजानन देविदास अंधारे वय ४९ वर्ष धंदा- शेती अर्जदार क. १ ते ४ रा. शिर्ला ता. पातुर जि. अकोला ५. अनिता सतिष महाले वय ५३ वर्ष धंदा - घरकाम रा. प्रभाग नं. १, जळंब रोड, अमृता नगर, महादेव मंदिरा जवळ खामगांव ता. खामगांव जि. बुलढाणा

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : देविदास बळीराम अंधारे
**पत्ता :-** रा. शिर्ला ता. पातुर जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत देविदास बळीराम अंगारे यांचा मृत्यु दि. ११/०९/ २०२२ रोजी शिर्ला ता. पातुर जि. अकोला येथे झाला. तसेच मयत यांचे आई वडील हे बरेच वर्षापुर्वी मयत झाले. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६/०३/ २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक :- ०३/०२/२०२६
पातुर
शिक्का
**आदेशानुसार**
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क-स्तर), पातूर

**जाहीर नोटीस**

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४३/२०२६ — प्रोसेस नं.६०७/२०२६
चौ.ता. २३/०२/२०२६ — दिनांक : १३/०१/२०२६

**अर्जदार :** १. गजानन मधुकर ठकार रा. जिजाई टॉवर, रामदासपेठ, अकोला. ता. जि. अकोला. २. दत्तात्रय मधुकर ठकार रा. कोजुली, पोस्ट सामुंदी, नाशिक, ता. जि. नाशिक. ३. श्रीमती प्रज्ञा प्रदीप जोशी रा. धनश्याम अपार्टमेंट, फ्लॅट नं. १०, गंगोत्री विहार, अमृत धाम, नाशिक ता. जि. नाशिक ४. सौ. श्रद्धा श्रीकांत घाटे रा. डी.वाय.पाटील मेडिकल कॉलेज समोर, ४८१ / २७२७ संत तुकाराम नगर, पुणे. पिंपरी, पुणे. ५. सौ. प्रिती विजय पांडे रा. सिद्धेश हायस्कुल जवळ, मानिक नगर, भवन, सिल्लोड, संभाजी नगर, ६. सौ. प्राची अविनाश जोशी रा. मु. पो. आगर, ता. जि. अकोला. ७. पुष्पक रविंद्र कळविट रा. प्रतिग अपार्टमेंट, जवाहर नगर, अकोला, ता. जि. अकोला. ८. केतन रविंद्र कळविट रा. फ्लॅट नं. ११, आर्शिवाद ब्लूझुम, सोमेश्वरी कॉलनी, मारोती मंदिरासमोर, सातपूर, नाशिक ९. पंकज परशुराम राजहंस रा. वृंदावन अपार्टमेंट जवळ, डी.एम.पी. ऑफिस, पी अॅण्ड टी कॉलनी, नाशिक, ता. जि. नाशिक. १०. आकांशा विद्याधर जोशी रा. विश्वनाथ पार्क, फ्लॅट नं. २, गंगापूर रोड, नाशिक, ता. जि. नाशिक.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. मधुकर उर्फ चिंमामण वासुदेव ठकार २. मालती मधुकर ठकार
**पत्ता :-** रा.रामदासपेठ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मधुकर उर्फ चिंमामण वासुदेव ठकार यांचे दि. २७/०१/१९९० रोजी अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत मालती मधुकर ठकार यांचे दि. १४/०४/१९९० रोजी निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/०२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १३/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८७/२०२६ — प्रोसेस नं.१५८९/२०२६
चौ.ता. १२/०३/२०२६ — दिनांक : ०५/०२/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती शिला कृष्णराव पेशवे रा. सिद्धेश्वर गणपती मंदिर, रणपिसे नगर, अकोला. ता. जि. अकोला. २. श्रीमती दिपा मंगेश पेशवे ३. राधिका मंगेश पेशवे ४. समृद्धी मंगेश पेशवे अर्जदार क्र. २, ३ व ४ रा. कपिलेश्वर अपार्टमेंट, रणपिसे नगर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मंगेश कृष्णराव पेशवे
**पत्ता :-** रा. सिद्धेश्वर गणपती मंदिराजवळ, रणपिसे नगर चौक, रणपिसे नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मंगेश कृष्णराव पेशवे यांचे दि. २६/१२/२०२५ रोजी अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ८०**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# जिल्ह्यातील सर्व शेत पाणंद रस्त्यांची कामे हाती घ्या-पालकमंत्री

## मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ता योजनेचा आढावा

**वर्धा/जनमाध्यम**

ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या वहिवाटीसाठी पाणंद रस्ते अतिशय महत्वाचे आहे. या रस्त्यांचे मजबुतीकरण, अतिक्रमण निष्कासित करुन रस्ते वहिवाटीसाठी मोकळे करण्यासाठी शासनाने मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते ही महत्वाकांक्षी योजना सुरू केली आहे. या योजनेतून टप्प्याटप्प्याने जिल्ह्यातील सर्व शेत पाणंद रस्त्यांची कामे हाती घ्या, त्यासाठी चांगला आराखडा तयार करण्याचे निर्देश पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात या योजनेच्या जिल्हास्तरीय समितीची बैठक समितीचे अध्यक्ष पालकमंत्री डॉ.भोयर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीपती मोरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक वैशाली रसाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमोल भोसले, बांधकामचे कार्यकारी अभियंता एकनाथ टिकले, जिल्हा नियोजन अधिकारी अनिरुद्ध राजुरवार, जिप बांधकामचे कार्यकारी अभियंता शुभम गुंडतवार, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता रेहान खान आदी उपस्थित होते.शेत पाणंद रस्त्यांना गती देण्यासाठी पुर्णपणे यंत्रसामुग्रीच्या सहाय्याने या



योजनेतून कामे केली जाणार आहे. ग्रामपंचायतींसह विविध यंत्रणांद्वारे ही कामे केल्या जातील. कामांसाठी २५ किलोमीटर क्षेत्राचा क्लस्टर तयार करुन प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या योजनेत तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेची प्रक्रिया देखील सुटसुटीत करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना अतिशय दिलासा देणारी योजना असून जिल्ह्यात जास्तीत जास्त कामे या योजनेतून होणे आवश्यक असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले.विविध योजनांच्या अभिसरणातून पाणंद रस्त्यांसाठी निधी उभारण्याची तरतूद योजनेत करण्यात आली आहे. त्यासाठी प्रयत्न करुन आपल्या विभागामार्फत अधिकाधिक कामे करण्याचे नियोजन संबंधित यंत्रणेने करावे. पाणंद रस्त्यांवर झालेले अतिक्रमण विशिष्ठ कालावधीत काढून टाकण्याचे अधिकार तहसीलदारांना देण्यात आले आहे, अशी अतिक्रमणे असल्यास शासन निर्णयातील तरतुदीनुसार कारवाई करावी, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

योजनेच्या उत्कृष्ट अंमलबजावणीसाठी शासनाने ग्रामपंचायत, महसूल यंत्रणा, पोलिस विभागाची जबाबदारी निश्चित करून देण्यात आली आहे. जिल्हास्तरीय समितीसह विधानसभा मतदारसंघनिहाय समित्या करण्यात आल्या असून त्यांच्या देखील जबाबदारी निश्चित केल्या आहे. या समित्यांनी पाणंद रस्त्यांची यादी करुन आपल्या क्षेत्रातील सर्व पाणंद रस्ते लवकरात लवकर कसे मजबूत होतील यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचना पालकमंत्री डॉ.भोयर यांनी केल्या.

# उमलत्या पिढीत राष्ट्राचे भविष्य

## चंद्रकांत उदगीरकर यांचे प्रतिपादन

**वर्धा/जनमाध्यम**

शालेय शिक्षणाबरोबरच कला, साहित्य आणि सामाजिक जाण यांचे संस्कार विद्यार्थ्यांवर होणे अत्यावश्यक आहे. शिक्षण व ज्ञान या वेगवेगळया बाबी असल्या तरी त्या परस्परपूरक असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दोन्हींची आवश्यकता आहे, असे मत माजी पोलीस उपायुक्त चंद्रकांत उदगीरकर यांनी व्यक्त केले.

येथील सेंट थॉमस इंग्लिश स्कूल बोरगाव मेघे येथे आयोजित विद्यार्थ्यांशी संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. आजच्या विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता लक्षणीय असून त्यांना योग्य दिशा देण्याचे दायित्व शिक्षक, पालक आणि समाजाने पार पाडणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.



आजची उमलती पिढी ही राष्ट्राची संपत्ती व वैभव आहे. त्यांच्या योग्य संगोपनातूनच देशाचे भविष्य घडणार आहे, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमात इमरान राही यांनी विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी व राष्ट्रीय जाणीव वाढविण्याची गरज अधोरेखित केली. शाळेच्या मुख्याध्यापिका प्रीती सत्याम यांनी राष्ट्रभिमान, सामाजिक सौहार्द आणि कौटुंबिक मूल्यांचे शिक्षण शालेय स्तरावर देणे काळाची गरज असल्याचे सांगितले.यावेळी विजय सत्याम, मोहन मोहिते, उल्हास वाघ, वर्षा देशपांडे, वेदांत सत्याम, रुची तिवारी, संचाली भलमे, अश्विनी गुरुनुले, लक्ष्मी तिवारी, अपर्णा डफळे, वैशाली नेजेकर, रिजवाना शेख यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत संवाद साधला.

# पाणी कुठं आणि दर्जा कुठं!

## खडका-जयपूर रस्त्यावर ठेकेदाराची मनमानी; उघडी पडलेली गिट्टी, नियम धाब्यावर



**चानकी कोपरा/जनमाध्यम**

खडका ते जयपूर या मार्गावर सुरू असलेल्या नव्या रस्त्याच्या कामात गंभीर त्रुटी समोर आल्याने परिसरात संतापाची लाट उसळली आहे. कच्चा मसाला टाकल्यानंतर आवश्यक त्या प्रमाणात पाणी न मारल्यामुळे रस्त्यावरील गिट्टी उघडी पडली असून कामाच्या दर्जावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वाहनचालकांना सैल दगड, धूळ आणि उखडलेला पृष्ठभाग यामुळे रोज त्रास सहन करावा लागत आहे.

**गावाजवळ पाणी, बाकी ठिकाणी कोरडेपणा**

विशेष म्हणजे, गावाच्या हद्दीत ठेकेदाराकडून पाण्याचा मारा होताना दिसतो; मात्र उर्वरित लांब पट्ट्यात पाण्याचा मागमूसही नाही.

दाखवण्यासाठी काम आणि उरलेला रस्ता देवावर सोपवला का असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे. तांत्रिक निकषांनुसार योग्य दाब आणि पुरेसा पाण्याचा वापर न झाल्यास रस्ता लवकर उखडण्याची शक्यता असते. तरीही काम घाईघाईत पूर्ण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप होत आहे.

**नालीची माती रस्त्यालगत; मजबुतीवर संशय**

रस्त्याच्या कडेला करण्यात आलेल्या नालीतील माती सरळ रस्त्यालगत टाकण्यात आल्याने कडांची मजबुतीही संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. पावसाळ्यात ही माती वाहून जाऊन रस्त्याची धूप होण्याची भीती नागरिक व्यक्त करीत आहेत. आजच गिट्टी उघडी, उद्या खड्डे तयार, अशी प्रतिक्रिया वाहन चालकांकडून दिली जात आहे.

### नियमांची पायमल्ली?

खराब दर्जाचे काम झाल्यास ठेकेदार आणि संबंधित शासकीय अभियंत्यावर गुन्हा नोंद करण्याचा शासनाचा स्पष्ट जीआर असताना, या कामात नियम डावलले जात असल्याची ओरड परिसरातून होत आहे. स्थानिक नागरिकांनी तातडीने अधिकाऱ्यांनी पाहणी करून कामाची गुणवत्ता तपासावी आणि दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.आम्हाला टिकाऊ रस्ता हवा, तात्पुरता दिखावा नको, असा स्पष्ट इशारा खडका येथील नागरिकांनी दिला आहे. संबंधित विभागाने वेळीच हस्तक्षेप न केल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. रस्त्याच्या दर्जाबाबत प्रशासनाची कसोटी लागली असून, आता कारवाईचीच प्रतीक्षा आहे.

# युवकांनी शक्ती आणि विवेकाच्या आधारे समर्थ बनावे-क़ादर नवाज़ खाऩ

## माझा युवा भारत अंतर्गत अंतर जिल्हा युवा आदान-प्रदान कार्यक्रमाचे उद्घाटन

**वर्धा/जनमाध्यम**

महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाच्या सहकार्याने, माझा युवा भारत वर्धा आणि भारत सरकारच्या युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयाने आयोजित केलेल्या अंतर जिल्हा युवा आदान-प्रदान कार्यक्रमाच्या उद्घाटन समारंभात विद्यापीठाचे कुलसचिव क़ादर नवाज़ खाऩ म्हणाले की, युवकांनी त्यांच्या शक्ती आणि विवेकाचा वापर करून समर्थ बनून भारताच्या विकासाच्या उद्दिष्टाच्या दिशेने आपले योगदान द्यावे. समता भवनातील माधवराव सप्रे सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात माझा युवा भारत वर्धाचे उपनिदेशक शिवधन शर्मा आणि विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी बी. एस. मिरगे मंचावर उपस्थित होते. १६ ते २० फेब्रुवारी या पाच दिवसीय आदान-प्रदान कार्यक्रमात पुणे जिल्ह्यातील ३७ युवक युवती सहभागी होत आहेत, जे वर्धेच्या ऐतिहासिक स्थळांचे भ्रमण, खानपान, राहणीमान आणि सांस्कृतिक क्रियाकलापांमध्ये सहभागी होतील. या दरम्यान ते बापू कुटी, सेवाग्राम, परमधाम आश्रम, पवनार, मगन संग्रहालय, शांती स्तूप, गोपुरी यांसारख्या स्थळांना भेट देतील.उद्घाटन समारंभात क़ादर नवाज़ खाऩ यांनी सर्व युवकांचे स्वागत करत पुढे सांगितले की, भारत सरकार विविध योजनांद्वारे युवकांना देशाच्या विकासाशी जोडत आहे. स्वामी विवेकानंद आणि महात्मा गांधी यांच्या प्रेरक उद्धरणांचा संदर्भ देत त्यांनी युवकांना आवाहन केले की, त्यांनी शिक्षणासोबतच क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घेत आपल्या क्षेत्रात सर्वोच्च स्थान मिळवावे. त्यांनी वेळेचे व्यवस्थापन, संवाद कौशल्य आणि सकारात्मक विचारांद्वारे उद्दिष्ट निश्चित करण्याचा सल्ला दिला.शिवधन शर्मा यांनी 'माझा युवा भारत' या कार्यक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट करत युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी हाती घेतलेल्या सरकारच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. बी. एस. मिरगे यांनी विद्यापीठाची रचना, सुविधा, वैशिष्ट्ये आणि अभ्यासक्रमांची माहिती देत पाच दिवसांच्या कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. या पाच दिवसांत योग, क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल.कार्यक्रमाचे संचालन सानिका तुरणकर यांनी केले, तर श्रावणी रावडे यांनी आभार व्यक्त केले.या प्रसंगी माझा युवा भारत वर्धा कार्यालयाचे दयाराम रामटेके, शुभम ताकसांडे, सतीश इंगोले, नितेश बेसेकर आणि आदान-प्रदान कार्यक्रमात सहभागी युवक-युवती यांची उपस्थिती होती.

### गुरूजींना दिलासा

**वर्धा**-खासगी अनुदानित शाळांतील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर उपाययोजना करण्यासाठी विशेष बैठक पार पडली. शिक्षणाधिकारी (माध्य.) कार्यालयात झालेल्या बैठकीत चार प्रकरणांचा तत्काळ निपटारा करण्यात आला. वैद्यकीय देयके, अनुकंपा नियुक्ती, शालार्थ आयडी, सेवासातत्य मान्यता आदी मुद्द्यांवर चर्चा झाली. जयप्रकाश थोटे, मनोज धंदरे यांच्या वैद्यकीय देयकांसह सीमा चव्हाण व अक्षय चांदूरकर यांच्या सेवासातत्यास मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे शिक्षक वर्गात केले.

# उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कारासाठी प्रवेशिका आमंत्रित

**वर्धा/जनमाध्यम**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्यावतीने दरवर्षी उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार दिले जातात. सन २०२५ च्या या पुरस्कारांसाठी दि.१५ मार्च पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

स्पर्धेसाठी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतच्या कालावधीत प्रसिध्द झालेले लेखन, छायाचित्रे, वृत्तकथा यांचा समावेश असावा. या स्पर्धेत फक्त मराठी भाषेसाठी राज्य व विभागीयस्तर पुरस्कार आहेत. इंग्रजी, हिंदी, उर्दू या भाषेतील पुरस्कार तसेच समाज माध्यम आणि स्वच्छ महाराष्ट्र जनजागृती पुरस्कार हे केवळ राज्यस्तरीय आहेत.उत्कृष्ट लेखन पुरस्कारासाठी पाठवावयाच्या प्रवेशिकेसोबत मूळ लेखनाचे कात्रण त्याच्या २ प्रतीसह पाठवावे. पत्रकाराला सलग दोन वर्ष पुरस्कार प्राप्त झाला असल्यास तिसऱ्या वर्षी त्याची प्रवेशिका विचारात घेतली जाणार नाही. प्रत्येक गट व भाषेसाठी संबंधित पत्रकारांनी एकच प्रवेशिका पाठवावी. समाजमाध्यम पुरस्कार ही स्पर्धा वृत्तविषयक, चालू घडामोडी विषयक संकेतस्थळे व ब्लॉग या समाज माध्यमात प्रसारित मराठी भाषेतील वृत्तविषयक विशेषत: शासकीय मजकुरासाठी आहे. आपल्या लेखनातून लोकांमध्ये स्वच्छता विषयक जनजागृती करणाऱ्या पत्रकारांसाठी स्वच्छ महाराष्ट्र जनजागृती ही स्पर्धा आहे.इलेक्ट्रॉनिक माध्यमातील पत्रकारांना पु.ल.देशापांडे उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा पुरस्कार देण्यात येतो. ही स्पर्धा मराठी भाषेतील वृत्तकथेसाठी असून दूरदर्शन, खाजगी चित्रवाहिन्या, स्थानिक केबल न्यूज व शासकीय उपक्रम यांना यामध्ये सहभाग घेता येईल. वृत्तकथा किमान ३ मिनिटे असावी. तोलाराम कुकरेजा उत्कृष्ट वृत्तपत्र छायाचित्रकार पुरस्कार स्पर्धा ही मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू भाषेतील वृत्तपत्रातील पूर्णवेळ छायाचित्रकारांसाठी आहे.विविध विकासकामांची दखल, आपल्या अग्रलेखांद्वारे घेणाऱ्या पत्रकार, संपादकांना, पत्रकार सुधाकर डोईफोडे अग्रलेखन पुरस्कार देण्यात येईल. वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या किमान २५ अग्रलेखांची कात्रणे त्याच्या प्रसिद्धीच्या तारखेच्या माहितीसह सादर करावे. स्पर्धेविषयीची सविस्तर माहिती आणि अर्ज dgipr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच जिल्हा माहिती अधिकारी कार्यालयात उपलब्ध आहेत. या स्पर्धेत जिल्ह्यातील पत्रकारांनी अधिकाधिक संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी मंगेश वरकड यांनी केले आहे.

## अतिमद्य प्राशनाने मृत्यू; दोन आत्महत्या

**सेलू/वर्धा** - अतिमद्य प्राशनामुळे प्रकृती खालावल्याने अशोक गव्हाळे (४५) रा. जामणी यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. दारूच्या व्यसनामुळे त्यांची प्रकृती बिघडल्याची माहिती आहे.दरम्यान, वर्ध्यात दोन जणांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या. द्वारकानगर, सिंदी (मेघे) येथे गजानन बावणकर (४०) यांनी राहत्या घरी आत्महत्या केली. तसेच मालगुजारीपुरा येथे फरीद ईलियास चिनी (४०) यांनीही गळफास घेत जीवन संपविले. दोन्ही घटनांमध्ये आत्महत्येचे कारण स्पष्ट झाले नसून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**वर्धा/जनमाध्यम**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्यकर्तृत्व व शौर्यावर आधारित विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १८ व १९ फेब्रुवारी रोजी कार्यक्रम पार पडणार आहेत.दि.१८ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता विकास भवन, वर्धा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित नाट्य प्रदर्शित करण्यात येणार आहे. तसेच दि. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजता महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनकार्यावर आधारित विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, जिल्हा प्रशासन,



जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येत आहे.दि.१९ फेब्रुवारी रोजी कार्यक्रमाचे उद्घाटन पालकमंत्र्यांच्या हस्ते होणार असून जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व मान्यवर अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे, असे जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी कळविले आहे.


## 'हर हर महादेव'च्या जयघोषात प्रहारचा सेवा यज्ञ पूर्ण

# ढगा येथील 'लहान महादेव' यात्रेत स्वच्छतेचा संकल्प; वनसंवर्धनाचा जागर संदेश


**वर्धा/जनमाध्यम**

महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर ढगा येथील 'लहान महादेव' म्हणून ख्याती असलेल्या प्राचीन शिवमंदिर परिसरात भरलेल्या भव्य यात्रेत यंदाही भक्तीचा महासागर उसळला. लाखो भाविकांच्या गर्दीत शिस्त, सेवा आणि पर्यावरणसंवर्धनाचा अनोखा आदर्श प्रहार समाज जागृती संस्थेने उभा केला. गेल्या तब्बल ३० वर्षांची परंपरा जपत 'महाशिवरात्री सेवा प्रकल्प' यंदाही यशस्वीपणे राबविण्यात आला.

१२ ते १६ फेब्रुवारीदरम्यान चाललेल्या या सेवा उपक्रमात एक लाखांहून अधिक भाविकांनी दर्शन घेतले. दर्शनासाठी रांगा सुव्यवस्थित



दर्शना करीता वृद्ध व्यक्तीला गडावर चढविताना रेंजर गाईड्स



भाविकांच्या सेवेकरीता प्रहारचे स्वयंसेवक व रोव्हर्स रेंजर्स

लावणे, चौरागडावर चढताना वृद्ध, अपंग आणि महिलांना सहाय्य करणे, पिण्याच्या पाण्याची सोय, प्रथमोपचार केंद्राची उभारणी, यात्रेत शिस्त राखणे आदी जबाबदाऱ्या स्वयंसेवकांनी समर्थपणे सांभाळल्या.यात्रेच्या गर्दीतही पर्यावरणाची जाणीव जपण्याचा संदेश देत वनसंपत्ती संवर्धनाबाबत जनजागृती करण्यात आली. यात्रेची सांगता होताच १६ फेब्रुवारी रोजी स्वयंसेवकांनी मंदिर परिसर व डोंगराळ भागातील कचरा, पॉलिथिन, पाण्याच्या बाटल्या व बेलफुलांचे अवशेष गोळा करून स्वच्छता मोहीम राबविली. 'भक्तीबरोबर स्वच्छता' हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देण्यात आला.या सेवा प्रकल्पाचे नेतृत्व संस्थेचे अध्यक्ष तथा रोव्हर स्काऊट जिल्हा आयुक्त कॅप्टन मोहन गुजरकर, सचिव तथा रोव्हर लीडर संतोष तुरक, कोषाध्यक्ष तथा राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक प्रा. रवींद्र गुजरकर, प्रसिद्धी अधिकारी गणेश शेंडे व संचालक डॉ. राजेंद्र बोरकर यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसेवकांनी अहोरात्र परिश्रम घेतले.देवळी येथील एस.एस.जे. महाविद्यालय तसेच सिंदी (रेल्वे) येथील केशरीमल नगर कनिष्ठ महाविद्यालयातील रोव्हर्स, रेंजर्स व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांसह प्रहारचे ४५ स्वयंसेवक या प्रकल्पात सहभागी झाले होते. रेंजर लीडर कल्याणी लिखार, उदय काळे, सत्तेश्वरी सावरकर, तेजस वाघाडे, पंकज पवार, साहिल जगनाडे, राधिका नागोसे, तनिषा उईके, राम देशमुख, प्रवेश किटे, सोमेश्वर पोराटे, स्नेहा मडकाम, आरती मरघडे, दर्शना कदम, भूषण ठोके, विपुल पेंदाम, यामिनी पारधी आदी स्वयंसेवकांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली.भक्तीच्या या सोहळ्यात प्रहारच्या सेवा यज्ञामुळे यात्रेचे व्यवस्थापन अधिक सुकर झाले. 'सेवा हीच खरी शिवभक्ती' हा संदेश देत महाशिवरात्रीचा हा उपक्रम समाधानाच्या आणि कृतज्ञतेच्या भावनेत झाला.

## जाहीर सूचना

माझे ग्राहक श्री. हरेश हर्सुखलाल वोरा व श्री. नयन हर्सुखलाल वोरा हे खालीलप्रमाणे मालमत्तेचे मालक आहेत – मौजा वर्धा, मौजा क्र. ८५ नवीन (जुना मौजा क्र. २५५), ता. व जि. वर्धा, नगरपालिका परिषद वर्धा हद्दीत, शीट क्र. ६८ मधील भूखंड क्र. २५३० चा भाग, क्षेत्रफळ ३००.५४ चौ.मी. (३२३३.८१ चौ.फुट), वॉर्ड क्र. २३, झोन क्र. १, समर्थवाडी, वर्धा, ४४२००१.

**सदर मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणे –** पूर्वेकडील भाग क्षेत्रफळ १५०.२७ चौ.मी. (सदर भागाचे मालक श्री. हरेश हर्सुखलाल वोरा) पूर्व – श्री. डोंगरे यांची मोकळी जागा पश्चिम – श्री. नयन हर्सुखलाल वोरा, यांचा उर्वरित प्लॉट, उत्तर – इंदिरा मार्केट रोड, दक्षिण – श्री. धोंमणे व आदमणे, यांचे घर पश्चिमेकडील भाग क्षेत्रफळ १५०.२७ चौ.मी. (सदर भागाचे मालक श्री. नयनसुख हर्सुखलाल वोरा) पूर्व–श्री.हरेश हर्सुखलाल वोरा यांचा उर्वरित प्लॉट पश्चिम – श्री. बडगिलवार यांचे घर, उत्तर–इंदिरा मार्केट रोड, दक्षिण–श्री. धोंमणे व आदमणे, यांचे घर तसेच श्री. रवींद्रकुमार सत्यनारायणजी बजाज यांनी भूखंड क्र. २५३० मधील पूर्वेकडील १५०.२७ चौ.मी. क्षेत्रफळाचा भाग दिनांक ०९-०९-१९९२ रोजी दस्त क्र. २०/१९९२ अन्वये उपनिबंधक, वर्धा यांच्या समोर माझे ग्राहक श्री. हरेश हर्सुखलाल वोरा यांना विक्री केला.त्यानंतर श्री. रवींद्रकुमार सत्यनारायणजी बजाज यांनी भूखंड क्र. २५३० मधील पश्चिमेकडील १५०.२७ चौ.मी. क्षेत्रफळाचा भाग दिनांक ०७-०४-१९९३ रोजी दस्त क्र. १२९८/१९९३ अन्वये उपनिबंधक, वर्धा यांच्या समोर माझे ग्राहक श्री. नयनकुमार हर्सुखलाल वोरा यांना विक्री केला.सदर मालमत्तेचा फेरफार (म्युटेशन) नोंद स्वतंत्रपणे दोन्ही मालकांच्या नावे मालमत्ता पत्रकात करण्यात आलेला आहे. तसेच नगरपालिका परिषद, वर्धा यांचेकडून कर पावती संयुक्तपणे श्री. नयनकुमार हर्सुखलाल वोरा व श्री. हरेश हर्सुखलाल वोरा यांच्या नावे देण्यात येते.माझ्या ग्राहकांनी वरील ३००.५४ चौ.मी. क्षेत्रफळाच्या मालमत्तेबाबत दिनांक ०६-०४-२०२५ रोजी श्री. अश्विन अजय साहू व सौ. पूजा अश्विन साहू यांच्यासोबत विक्री करारनामा केला आहे.माझ्या ग्राहकांकडून दस्त क्र. २०/१९९२ दिनांक ०९-०९-१९९२ चा मूळ विक्रीपत्र हरवले असून त्याबाबत पोलिस स्टेशन येथे तक्रार नोंदविण्यात आलेली आहे.याद्वारे सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणास काही हरकत असल्यास अथवा सदर मूळ विक्रीपत्र आढळल्यास, ही जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा. अन्यथा कोणतीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही.

**ॲड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा.मो. ९८२२४२६१६८**

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ८३**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल–atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## २० पासून 'राज्यस्तरीय खादी प्रदर्शन व महोत्सव'

**अमरावती/प्रतिनिधी:-** खादी आणि ग्रामोद्योग आयोग, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्यम मंत्रालय (भारत सरकार) यांच्यामार्फत दि. २० फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ या कालावधीत अमरावती येथे 'राज्यस्तरीय खादी प्रदर्शन' आयोजित करण्यात आले आहे. हे प्रदर्शन गाडगे नगर, वलगाव रोड येथील संत गाडगे बाबा समाधी स्थळ यात्री मैदान येथे संपन्न होईल.

खादी आणि ग्रामोद्योग आयोग ही संसदेच्या कायद्याद्वारे स्थापन झालेली वैधानिक संस्था असून, ग्रामीण भागात रोजगार निर्मिती करणे आणि लोकांना स्वावलंबी बनवणे हे आयोगाचे मुख्य उद्दिष्ट आहे. 'व्होकल फॉर लोकल' आणि 'आत्मनिर्भर भारत' हे स्वप्न साकार करण्यासाठी दरवर्षी अशा प्रदर्शनांचे आयोजन केले जाते.

विभागीय कार्यालय, नागपूर यांच्या माध्यमातून आयोजित या प्रदर्शनात देशभरातील विविध खादी संस्था, स्फुर्ती क्लस्टर आणि पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत स्थापित लघु उद्योगांची उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध असतील. यामुळे कारागिरांना हक्काची बाजारपेठ मिळून त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होणार आहे.

विदर्भातील नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन खादी वस्त्रे व ग्रामोद्योग उत्पादने खरेदी करावीत, जेणेकरून स्वदेशी उद्योजकांचा आत्मविश्वास वाढवण्यास मदत होईल, असे आवाहन आयोगामार्फत करण्यात आले आहे.

## नगर परिषद कार्यालय, पांढरकवडा, जि.यवतमाळ
## कोंडवाडा विभाग

### जाहीर लिलाव

सर्वत्र नागरिकांना याद्वारे सुचित करण्यात येते की, पांढरकवडा नगर परिषदेला खालील प्रमाणे जाहीर लिलाव दिनांक २५.०२.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता नगर परिषद सभागृह येथे करावयाचा आहे. अनामत रक्कम दिनांक २४.०२.२०२६ ला दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारल्या जाईल. तसेच बोली कायम झाल्यास १/४ रक्कम ॲडव्हॉन्स स्वरुपात न.प.कडे जमा करावी लागेल व उर्वरित रक्कम सम प्रमाणात ९ हप्ते पाडून दर महिन्याचे २५ तारखेच्या आत भरावी लागेल.

| अ.क्र. | लिलावाचे विवरण | भरावयाची अनामत रक्कम | शासकीय बोली रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | न.प.कोंडवाडा कंत्राट पध्दतीने चालविणे | रु.८,०००/- | रु.७९,५३०/- | आदेशानुसार |

तरी इच्छुक लिलाव धारकांनी लिलावात भाग घेण्याकरीता वेळेवर उपस्थित रहावे

**अटी व शर्ती -**

१) सदर लिलाव रद्द किंवा मंजूर करण्याचे अधिकार मुख्याधिकारी न.प.यांनी राखून ठेवले आहेत.

२) लिलावाच्या अटी व शर्ती तथा ईतर माहिती कोंडवाडा विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.

(आतीश ल.बोरेले) नगराध्यक्ष, नगर परिषद, पांढरकवडा
(अतिष ता.चव्हाण) उपनगराध्यक्ष, नगर परिषद, पांढरकवडा
(पंकज गावंडे) मुख्याधिकारी, नगर परिषद, पांढरकवडा

## तहसीलदार मोर्शी यांचे कार्यालय

क्र.रामाक्र./२६/MRC-८१/काटसूर/२०२५-२०२६

### जाहीरनामा

या कार्यालयाद्वारे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **नंदकुमार अमृतराव अंबुलकर**, रा.काटसूर, ता.मोर्शी, जि.अमरावती यांनी त्यांचे आजी नामे **नर्मदा चंपतराव अंबुलकर** मृत्यूची नोंद ग्रामपंचायत काटसूर ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं.काटसूर येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र इ. अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत.

त्याअर्थी, प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

शिक्का

**तहसीलदार, मोर्शी**

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१००/२०२६ ने.ता.१३.०३.२०२६

**अर्जदार -** १. उषा रामरावजी गवळी,
वय ६७ वर्षे, धंदा - घरकाम
रा.अंबाडा, पो.थडीपवनी, ता.नरखेड, जि.नागपूर

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार हिचे वडील **नामे भदाजी उर्फ भदुजी पांडुरंग उमेकर** हे दि.**२०.०३.१९९७** रोजी लोणी, ता.वरुड, जि.अमरावती येथे मयत झालेले असून अर्जदाराची आई नामे **यमुना उर्फ नर्मदाबाई भदुजी उमेकर** हिचा दिनांक **२८.०५.२०१३** रोजी लोणी, ता.वरुड, जि.अमरावती येथे मृत्यू झाला. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ११.०३.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

अर्ज क्र. 02/19/2026

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक: **श्री.संत गजानन महाराज सेवा समिती चॅरिटेबल ट्रस्ट, प्रिया पार्क, वलगांव रोड, ता.जि.अमरावती**

बाबत अर्जदार - **श्री.संजय पुंडलिकराव भोकसे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

(अ) **जंगम मिळकत (वर्णन ) -** निरंक

**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक १२.०२.२०२५ रोजी दिली.

शिक्का

**(श्री.र.र.ठाकरे)**
**अधीक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,अमरावती

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १६२**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१८१/२०२६
**श्रीमती छाया अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.०९.०३.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Chaya Devkumar Khandekar, Age 49 Yrs. Occu.: Labour R/o At Datala, Po.Bhatori, Tq.Murtizapur, Dist.Akola
2. Sandhya Rameshrao Sadanshiv @ Sandhya Ravindra Dhandar (After Marriate) Age 44 Yrs. Occu.: Service R/o C/o Ravindra Wasudeorao Dhandar, 36, Survey No.3/2 Behind Gokhale Layout Pawan Nagar, Navsari V.M.V. Amravati
3. Nandkishor Ramesh Sadanshiv, Age 42 Yrs. Occu.: Labour R/o At Po. Asegaon Purna, Tq.Chandur Bazar, Dist.Amravati.
4. Harshawardhan Ramesh Sadanshiv, Age 40 Yrs. Occu.: Labour R/o At Po. Asegaon Purna, Tq.Chandur Bazar, Dist.Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **रमेश आकारामजी संदाशिव** हे दिनांक 30.11.2007 रोजी **आसेगांव पूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** येथे मयत झाले. व **सुमित्रा रमेशराव संदाशिव** ही दिनांक **०८.११.२०१५** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मरण पावली. अर्जदार **छाया अधिक तीन** विरुध्द निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **छाया अधिक तीन** विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०५.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३०८८/२०२५
**अनिता पवार अधिक पाच -वि- निरंक**
पुढील ता.१८.०२.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Anita Gajanan Pawar, Age 51 Yrs. Occu.: Household R/o Gopal Nagar, Amravati.
2. Rahul Gajanan Pawar, Age about 32 Yrs. Occu.: Welder R/o Maya Nagar, Sai Nagar, Amravati.
3. Sau.Mayuri Sachin Khatari, Age about 29 Yrs. Occu.: Housewife R/o Near Ghode Kirana Maya Nagar, Sai Nagar, Amravati.
4. Sau.Sapana Gopal Solanke, Age about 25 Yrs. Occu.: Housewife R/o Jivan Vikas School, Gopal Nagar, Sai Nagar, Amravati.
5. Swati Gajanan Pawar, Age about 22 Yrs. Occu.: Student R/o M.I.D.C.Road, Near Anuradha Transport, Maya Nagar, Gopal Nagar, Sai Nagar, Amravati.
6. Shrawan Gajanan Pawar, Age about 19 Yrs. Occu.: Student R/o Maya Nagar, Sai Nagar, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Gajanan Pralhadrao Pawar हे दिनांक 15.12.2022 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Anita Gajanan Pawar + 5 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Anita Gajanan Pawar + 5 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२८.०१.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१८/२०२६
**मनोज कांबळे अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.११.०३.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Manoj Narayanrao Kambale, Age about 45 Yrs. Occu.: Labour
2. Hanumant Narayanrao Kambale, Age about 50 Yrs. Occu.: Labour R/o Ramkrushan Colony, Amravati.
3. Sharda Raju Ghadage, Age about 52 Yrs. Occu.: Household R/o Plot No.24-B, Dhamani Road, MSEB Housing Society, Sangali, Tq.Dist.Sangali

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Manakabai Narayan Kambale हे दिनांक 14.05.2023 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. तसेच Narayan Sadhuji Kambale हे दिनांक ११.११.२००४ रोजी सांगली येथे मयत झाले. अर्जदार Manoj Narayanrao Kambale + 2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Manoj Narayanrao Kambale + 2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०७.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश-२, यांचे न्यायालय**

एम.ए.सी.पी.क्रमांक ३२८/२०२३ ने.ता.२३.०४.२०२६

**पिटीशनर - लिला रामदास निंघोट व ईतर**
**-- वि --**
**रिस्पांडंट - शेख तनवीर शेख मुश्ताक व ईतर**

Respondent : 1. Shaikh Tanveer Shaikh Mustaque
Gajanan Pohokar, Galli No.6, Namuna, Amravati.
2. Mohd.Sakeb Anwar Mohd.Ajaj UR Rahim
R/o Nagpuri Gate, Talab Pura, Amravati-444601

Application U/s 166 of Motor Vehicle Act 1988 for Grant of Compensation

ज्याअर्थी वरील पिटीशनर लिला रामदास निंघोट यांनी तदर्थ जिल्हा व सत्र न्यायालय-०२ अमरावती यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील गैरअर्जदार नं.१ शेख तनवीर शेख मुश्ताक व गैरअर्जदार नं.२ मो.साकेब अनवर मो.अजाज युआर रहीम यांना पेपर प्रसिध्दीद्वारे नोटीस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दिनांक २३.०४.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वि.तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश-०२, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे, वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू दाव्याची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक १३.०२.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिले असे.

अमरावती
दिनांक १३.०२.२०२६

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३३/२०२६
**उषाताई व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२३.०३.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Ushatai Vasantarao Wankhade, Age 75 Yrs. Occu.: Housewife R/o Near Tushar Telar Anand Nagar, Amravati.
2. Nilesh Vasantrao Wankhade, Age 39 Yrs. Occu.: Labour R/o Matakhidki, Gadgadeshwar Road, Near Hanuman Temple, Anand Nagar, Ukali, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **विकास वसंतराव वानखडे** हे दिनांक 20.11.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **उषाताई व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **उषाताई व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि.................. रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **राजीक खाँ युनूस खाँ** अर्जात नमूद जन्म दिनांक **०८.०७.१९७८** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **जन्म नोंदीबाबत अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशी करुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अ.खालीक अ.मजीद (ग्रा.पं.सदस्य) | ५) अ.खालीक अ.मजीदे (ग्रा.पं.सदस्य) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४७/२०२६
**श्रेयस व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१२.०३.२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :** 1. Shreyas S/o Madhao Tale,
Age 40 Yrs. Occu.: Job
R/o Near Municipal Garden, Rathi Nagar, Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **साधना माधव टाले** हे दिनांक 13.10.1986 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **श्रेयस विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रेयस विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

प्रो.नं.४८८/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.१३.०२.२०२६

वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय

किरकोळ अर्ज क्र./८०/२०२६ दिनांक १६.०३.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्जदार -**
१. गयाबाई देविदास तायडे, वय ७७ वर्षे, धंदा - घरकाम
२. मंगला सुरेश खाडे, वय ५८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.लाईत, ता.मुर्तिजापूर, जि.अकोला
३. सुनिता धर्मेंद्र वानखडे, वय ४७ वर्षे, धंदा - घरकाम
रा.पथरोट, ता.अचलपूर, जि.अमरावती
४. राजेश देविदास तायडे, वय ४५ वर्षे, धंदा - शेती
सर्व रा.कोळंबी, ता.दर्यापूर, जि.अमरावती

**--- विरुध्द ---**

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **देविदास पूर्णाजी तायडे** हे दिनांक **२२.१०.२०२५** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** मयत **देविदास पूर्णाजी तायडे** यांनी त्यांचे जीवंतपणी सेंट्रल बॅंक ऑफ इंडिया शाखा दर्यापूर येथे खाते उघडले होते. त्या खात्याचा खाते न.२१५९८८३७४० असा असून त्या खात्यात त्यांचे नांवे २०,९००/- एवढी रक्कम जमा आहे.

आज दि.१३.०२.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

भूमि अभिलेख विभाग
उप-अधीक्षक भूमि अभिलेख, अमरावती यांचे कार्यालय,
जिल्हाधिकारी अमरावती कार्यालयाचे मागे कॅम्प, अमरावती-४४४६०२

### जाहीर नोटीस

प्रति,
१) जेमिनी ब्रिजमोहन कासट, रा.आशा लक्ष्मी अपार्टमेंट एल-२०४, रवी नगर, नागपूर, ता.जि.नागपूर
२) चैतन्य श्रीकांत गणोरकर, रा.कचेरी रोड, कॅम्प अमरावती, ता.जि.अमरावती
३) निखिल श्रीकांत गणोरकर, रा.कचेरी रोड, कॅम्प अमरावती, ता.जि.अमरावती
४) सईदा ज.तजकुल हसणजी, रा.मालवीय चौक, मोर्शी रोड, अमरावती
५) शहनाज ज.तजमुल हसणजी, रा.मालवीय चौक, मोर्शी रोड, अमरावती
६) कानीज ज.जोयेब हसणजी, रा.मालवीय चौक, मोर्शी रोड, अमरावती

### सुनावणी नोटीस

प्रस्तुत प्रकरणी मौजा अमरावती येथील शिट नं.३१, प्लॉट नं.१६ या मिळकतीच्या आखीव पत्रिकेवरील नावाची नोंद दुरुस्त करणेकरीता महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २५८ नुसार परवानगी मिळणेबाबत मा.जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, अमरावती येथे अपील दिनांक २९.१०.२०२५ रोजी सादर करण्यात आले होते. त्या अनुषंगाने इकडील कार्यालयात सदर प्रकरणी दि.१०.०२.२०२६ रोजी अपील निांक नेमण्यात आलेली होती. सदर प्रकरणी आपणास उत्तरवादी म्हणून पार्टी करण्यात आलेले असल्याने उपरोक्त प्रकरणी आपली बाजू मांडण्याकरीता रितसर आपणास नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत. परंतु आपण प्रकरणात गैरहजर असल्याचे दिसून येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी दिनांक २४.०२.२०२६ रोजी मा.पीठासन अधिकारी, उप अधीक्षक भूमि अभिलेख, अमरावती यांचे समोर सुनावणीकरीता ठेवण्यात आलेले आहे. सबब आपण दिनांक २४.०२.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता उप अधीक्षक भूमि अभिलेख अमरावती कार्यालयात न चुकता उपस्थित रहावे. सुनावणीस हजर न राहिल्यास प्रकरणात पुढील कार्यवाही करण्यात येईल, कृपया याची नोंद घ्यावी.

शिक्का

**उप-अधीक्षक**
भूमि अभिलेख, अमरावती

## नगर पंचायत कार्यालय, ढाणकी
## ता.उमरखेड, जि.यवतमाळ
## निविदा सुचना क्र.१०

ढाणकी नगर पंचायत येथील वैशिष्ट्यपूर्ण योजने निधीमधून खालील कामाच्या ई-निविदा द्वी-लिफाफा पध्दतीने महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग पंजीबध्द असलेल्या योग्य त्या वर्गातील कंत्राटदारांकडून मागविण्यात येत आहे. कामाच्या निविदा केवळ ई-निविदा **बी-१** पध्दतीने सादर करावयाच्या आहेत. निविदेच्या अटी व शर्ती तसेच विस्तृत नमुना नगर पंचायतच्या नोटीस बोर्डवर व बांधकाम विभागात दिनांक १७.०२.२०२६ पासून पहावयास उपलब्ध आहे.

**कामाचा तपशील खालीलप्रमाणे-**

**१) ढाणकी नगर पंचायत जिल्हा यवतमाळ नमो उद्यान विकसित करणेबाबत**
**(अंदाजपत्रक रक्कम ८१,२५,१९८/- रुपये)**

शिक्का

**स्वा/-**
**(डॉ.अजय गोविंदराव कुरवाडे)**
**मुख्याधिकारी,**
**नगर पंचायत, ढाणकी**

## चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्र.०२)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 953/2025

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक: **दिशा एज्युकेशन फाऊंडेशन, अमरावती, ता.जि.अमरावती एफ-१७५६६**

बाबत अर्जदार - **स्वप्नील अरुण गावंडे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - काही नाही**

**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) -** मौजा पेठ अमरावती सर्व्हे नं.३८/१ व ३६ न्यू कृष्णार्पण कॉलनी मधील प्लॉट नं.१४ व १६ दोन्ही प्लॉट मिळून ६६९१ चौ.फुट. पुर्वेस - खाली जागा, पश्चिमेस - २५ फुटाचा रस्ता, उत्तरेस - २५ फुटाचा रस्ता, दक्षिणेस - सर्व्हीस लाईन

**स्थावर मालमत्ता अंदाजे किंमत रु.३२,००,०००/- (बत्तीस लाख रुपये)**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **१०.०२.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**(र.र.ठाकरे)**
**अधीक्षक,(न्यायशाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१९९/२०२५
**श्रीमती शिवानी अधिक एक -वि- निरंक**
पुढील ता.२४.०३.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
१. शिवानी श्याम भागडे, वय २६ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
२. रुद्र श्याम भागडे, वय ०३ वर्षे, व्यवसाय - निरंक
अर्जदार नं.१ ही स्वतःकरीता व अ.पा.क.आई म्हणून अर्जदार नं.२ करीता
लग्नापुर्वीचा पत्ता - रा.शिवणगांव, ता.तिवसा, जि.अमरावती
लग्नानंतरचा पत्ता - दोन्ही रा.शंकर नगर, न्यू कॉटन मार्केटजवळ, अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत श्याम श्रीराम भागडे** यांचे दिनांक **१८.१२.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार शिवानी अधिक एक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शिवानी अधिक एक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१२.०२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.७३/२०२६ ने.ता.२३.०३.२०२६

**अर्जदार :**
१. श्रीमती अरुणा विलासराव श्रीखंडे, वय ५६ धंदा - घरकाम
२. प्रतिक विलासराव श्रीखंडे, वय ३४ धंदा - खाजगी नोकरी
३. अर्पिता भुष्ण लंगे, वय ३२ धंदा - गृहिणी
४. संदेश विलासराव श्रीखंडे, वय २६ धंदा - मजुरी
अर्जदार नं.१, २, व ४ रा.करजगांव, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती
अर्जदार नं.३ रा. जुने जैन मंदिराजवळ, आष्टी, ता.आष्टी, जि.वर्धा

**-- विरध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक विलास दौलतराव श्रीखंडे** यांचा मृत्यू दिनांक **२६.०८.२०२५** रोजी करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच मृतक **दौलतराव गणपतराव श्रीखंडे** यांचा दि.**२२.०८.२०१२** रोजी आणि **मृतक वच्छलाबाई दौलतराव श्रीखंडे** हिचा मृत्यू दिनांक **११.०६.२०१८** रोजी करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.७३/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.१०.०२.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# १.२० लाख चौरस फुटांमध्ये साकारले ‘श्रद्धा रियल होलसेल मॉल’

## अमरावती ठरणार मेगा फॅशन डेस्टिनेशन

**अमरावती/का.प्र.**

शहरातील शॉपिंग संस्कृतीला नवी दिशा देणारा १.२० लाख चौरस फूट क्षेत्रफळाचा भव्य ‘श्रद्धा रियल होलसेल मॉल’ रविवारी, २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता नांदगाव पेठ येथील बिजीलॅण्ड कॉम्प्लेक्समध्ये लोकार्पित होणार आहे. आधुनिक सुविधा, वैविध्यपूर्ण फॅशन कलेक्शन आणि ग्राहककेंद्री सेवा यांचा संगम असलेला हा मॉल अमरावतीकरांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे.

‘श्रद्धा’ म्हणजे विश्वासाचे प्रतीक. ग्राहकांच्या विश्वासावर उभ्या राहिलेल्या या ब्रँडने आता १.२० लाख चौ.फु.चे वातानुकूलित आणि अत्याधुनिक शोरूम उभारले आहे. यापूर्वी ‘श्रद्धा फॅमिली शॉप’मध्ये उपलब्ध असलेल्या सर्व सुविधा आता अधिक मोठ्या आणि आधुनिक स्वरूपात येथे उपलब्ध करण्यात आल्या आहेत. फॅशन, गुणवत्ता आणि वैविध्य यांचा संगम साधत हा मॉल शहरातील प्रमुख फॅशन डेस्टिनेशन म्हणून ओळख निर्माण करणार आहे.ग्राहकांच्या सोयीसाठी महिलांसाठी स्वतंत्र फीडिंग रूम, मुलांसाठी किड्स झोन, वातानुकूलित विश्रांती कक्ष, १५० जणांसाठी डायनिंग हॉल तसेच महिला-पुरुषांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या ग्राहकांसाठी भोजन व विश्रांतीची विशेष सोय असेल. २२ हजार चौरस फूट प्रशस्त पार्किंग, तीन लिफ्ट आणि आकर्षक इंटेरियरमुळे खरेदीचा अनुभव अधिक सुखद होणार आहे.मॉलमध्ये किड्स वेअर, मेन्स वेअर, लेडीज वेअर, वेस्टर्न वेअर, ब्राइडल साड्या, एथनिक कपडे, कोट-सूट, जोधपुरी, कुर्ता-पायजमा, लेहेंगा-ओढणी तसेच होलसेल साड्या, हँडलूम, गारमेंट सेक्शन, मॅचिंग सेंटर आणि शर्टिंग-सूटिंगचे मोठे कलेक्शन उपलब्ध असणार आहे. या प्रकल्पाचे इंटेरियर आयडीज इंटेरियरचे संचालक विजय लुल्ला यांनी केले असून आर्किटेक्ट रोहित पुन्शी व आरसीसी कन्सल्टंट पंकज देशमुख यांनी सहकार्य केले आहे.

लोकार्पण सोहळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणजे लोकप्रिय टीव्ही मालिका तारक मेहता का उल्टा चष्मा मधील कलाकारांची उपस्थिती. अभिनेत्री मुनमुन दत्ता (बबीता), खुशी माली (सोनू) आणि नितीश भलूनी (टप्पू) यांच्या हस्ते मॉलचे उद्घाटन होणार आहे. यानिमित्त उपस्थितांसाठी आकर्षक भेटवस्तूंची संधीही उपलब्ध करून देण्यात आली आहे.लोकार्पणाच्या दिवशी ‘जितकी खरेदी तितके फ्री’ अशी एकदिवसीय खास ऑफर जाहीर करण्यात आली आहे. ठरावीक खरेदीवर तितक्याच रकमेची फ्री खरेदी पुढील ३० दिवसांत करण्याची संधी ग्राहकांना मिळणार आहे. या ऑफरचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संचालकांनी केले आहे.२००६ मध्ये १० बाय १० च्या छोट्या दुकानातून तीन मित्रांनी सुरू केलेला हा प्रवास आज १.२० लाख चौ. फु.च्या आधुनिक मॉलपर्यंत पोहोचला आहे. रमेश गिडवानी, सुरेश गिडवानी, पुरणलाल तसेच रोशन लाल, अमीत सेवानी, सागर गिडवानी, राजेश भाटीया, सुरेश पंजवानी, दिलीप साबवानी आणि विजय गिडवानी यांच्या संयुक्त प्रयत्नांतून उभारलेला हा व्यवसाय आज मोठ्या कुटुंबात परिवर्तित झाला आहे. ग्राहकांच्या विश्वासामुळेच हा टप्पा गाठता आला असल्याची भावना संचालकांनी व्यक्त केली.‘श्रद्धा रियल होलसेल मॉल’मुळे अमरावतीतील शॉपिंग संस्कृतीला नवी ओळख मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.




# ५००१ भाविकांचा श्री गजानन महाराज विजय ग्रंथाचा महापारायण सोहळा शनिवारपासून

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

अमरावती येथील श्री संत वासुदेव जी महाराज वारकरी शिक्षण सेवा चरिटेबल ट्रस्ट, रामा, अमरावती द्वारा संचालित ज्ञानसागर आध्यात्मिक गुरुकुल, अयोध्या नगरी, चांगापुर (अमरावती) येथे जिल्हास्तरीय भव्य दिव्य स्वरूपाचा दोन दिवसीय श्री गजानन महाराज विजय ग्रंथ महापारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

हा मंगलमय सोहळा फाल्गुन शुक्ल चतुर्थी, २१ फेब्रुवारी ते फाल्गुन शुक्ल पंचमी, २२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पार पडणार असून, ३०० सेवेकऱ्यांच्या समवेत ५००१ भाविकांची उपस्थिती अपेक्षित आहे.या महापारायणाचे व्यासपीठ नेतृत्व ह.भ.प. प्रकाशजी महाराज चैतन्य (आळंदीकर) करणार आहेत. कार्यक्रमात पारायणासोबत वारकरी हरिपाठाचा गजर, एकनाथी बहुरंगी भारुड आणि काल्याचे कीर्तन यांसारखे आध्यात्मिक कार्यक्रम भक्तांना अनुभवता येणार आहेत.एकनाथी बहुरंगी भारुड ह.भ.प. संतोष महाराज भालेराव सादर करणार असून, हरिभक्त परायण गुरुवर्य अविनाशजी महाराज रोडे यांचे काल्याचे कीर्तन हे या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरणार आहे. तसेच सुमारे दहा हजार भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या महोत्सव अंतर्गत दैनंदिनी २१ फेब्रुवारी २०२६ ला सकाळी ७ वा. – श्रीराम मंदिर येथून ग्रंथ दिंडी सोहळा सकाळी ८ वा. – ग्रंथ पूजन व पारायणास प्रारंभ, सायं. ५ वा. – वारकरी हरिपाठ, रात्री ७ ते ९ वा. – एकनाथी बहुरंगी भारुड, रविवार, २२ फेब्रुवारी २०२६ सकाळी ७ वा. – श्रींच्या चरणपादुकांचा अभिषेक, सकाळी ८ वा. – ग्रंथ पूजन व पारायणास प्रारंभ, सकाळी १० वा. – काल्याचे कीर्तन, दुपारी १२ वा. – संत दर्शन सोहळा, दुपारी १ वा. – महाप्रसाद होईल, महपराणासाठी नोंदणी करण्यासाठी भाविकांनी ज्ञानसागर राम मंदिराजवळ अयोध्या नगरी चांगापूर अमरावती येथे संपर्क साधावा तसेच ८४०९८००४४४ क्रमांक संपर्क साधण्याचे आवाहन हभप आदित्य महाराज रोड यांनी केले.



# पार्डी शिवारातील पाणंद रस्त्यांच्या दुरावस्था, शेतकरी वर्ग त्रस्त



**अंजनगाव बारी**-जवळ पार्डी (देवी) येथील शेत शिवारातील देवीदास वाकोडे ते जितेंद्र भस्मे १ कि.मी. पाणंद रस्त्यांचे काम गेल्या काही वर्षीपासून रखडले असुन खडीकरण झालेल्या या रस्त्याने शेतकऱ्यांना ये- जा करणे कठिण होऊन बसले असुन मजूर, शेती साहित्य (ट्रॅक्टर, कापणी यंत्रे आणि थ्रेशर ) नेण्यात शेतकऱ्यांना अडचणी येत आहेत.

स्थानिक प्रशासन व जनलोकप्रतिनिधी दुर्लक्षामुळे पाणंद रस्त्यांच्या रखडले असल्याचे नागरिकांचे म्हणणे असुन स्थानिक शेतकऱ्यांच्या तक्रारी दखल घेऊन नुकतीची आशिष धर्माळे जिल्हाप्रमुख शिवसेना अमरावती, दिलीप ठाकरे तालुकाप्रमुख अमरावती यांनी संजय राजूरकर, BYC इंजिनियर शामल बागडे यांच्या उपस्थित या रस्त्याची पाहणी केली, असता मनमानी कारभार करणाऱ्या ठेकेदारास समज देऊन राहिलेल्या १ किलोमीटर रस्त्याचे डांबरीकरण व उर्वरित राहीलेल्या पुर्ण पाणंद रस्त्यांचे काम त्वरित करण्याच्या सुचना दिल्यात. यावेळी देविदास वाकोडे, पुरणदाजी पाटील, किशोर ढेपे, दादाराव मदणे, प्रकाश चौधरी, सुरेश वाकोडे, सुरेशजी लड्ढा, नरेश डकरे, संजय बांडाबुचे, श्रीकृष्ण भस्मे, जितेंद्र भस्मे, राजू गंगांत्रे, माहोरे, ग्रा.पं.सदस्य अजाब गंगात्रे आदी व परिसरात शेतकरी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आज जिल्ह्यात तालुकास्तरीय, जनसंवाद व तक्रार निवारण शिबीर

**चांदूरबाजार/वार्ताहर**

जिल्ह्यातील प्रत्येक गावांतील विभागनिहाय समस्या व तक्रारी जाणून घेण्यासाठी, जिल्ह्याचे पालकमंत्री मार्च महिन्यात तालुकानिहाय आमसभा घेणार आहेत. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील नागरीकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी पालकमंत्र्यांच्या निर्देशानुसार, जिल्ह्यात १८ फेब्रुवारीला तालुकास्तरीय जनसंवाद व तक्रार निवारण शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबारातील विभागनिहाय आलेल्या समस्या, नागरिकांच्या तक्रारी, तसेच जिल्हा,तालुका व ग्राम विकासाच्या अनुषंगाने नागरिकांकडून आलेल्या शिफारशी.यांचा आढावा घेऊन जिल्हयाच्या विकासाचा रोड मॅप तयार केल्या जाणार आहे. जिल्ह्याचा विकासात्मक आढावा घेण्यासाठी पालकमंत्र्यांच्या निर्देशानुसार, प्रत्येक तहसिल स्तरावर जिल्हा परिषद मुख्याधिकारी, संबंधित इतर विभागाचे वरिष्ठ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्राम सचिव, कृषि सहाय्यक व नागरीकांची संयुक्त बैठक तातडीने आयोजित करण्याबाबतचे निर्देश जिल्हाधिकारी कार्यालयाने नुकतेच सर्व संबंधित विभागांना दिले आहेत. तसेच पालकमंत्र्यांच्या निर्देशानुसार नागरिकांच्या तक्रारी, विकासकामांची सद्यस्थिती, प्रलंबित प्रस्ताव, स्थानिक पातळीवरील महत्वाच्या प्रश्नांचा सविस्तर आढावा. या जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रमासाठी, प्रत्येक तालुक्याला तीन अधिकार्यांची एक समिती तयार करण्यात आली आहे.यात एक समन्वय अधिकारी, सहायक समन्वय अधिकारी तथा सचिव जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रम यांचा समावेश आहे. तालुका निहाय या समितीत वेगवेगळ्या विभागाचे अधिकारी असतील. मात्र स्थानिक तहसिल हे या समितीचे पदसिद्ध सचिव आहेत. या जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रम शिबिराला सर्वच विभागाचे वरिष्ठ अधिकारी, तालुका स्तरावरील अधिकारी,सर्व विभागांचे कर्मचाऱ्यांना उपस्थित राहण्याचे निर्देश जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आले आहे. तसेच नागरिकांनी ही या जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित राहावे.

# उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार-२०२५ साठी प्रवेशिका मागविल्या

**अमरावती**- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी १ जानेवारी, २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम १५ मार्च, २०२६ असा आहे. राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अर्जाचे नमुने dgipr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

# शरीरयष्टी स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ

**अमरावती**-आंध्रा युनिर्व्हसिटी, विषाखापट्टणम येथे ०३ ते ०४ मार्च, २०२६ दरम्यान होणा-या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सर्वोत्कृष्ट शरीरयष्टी (पुरुष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे. चमूंमध्ये सिताबाई कला व विज्ञान महाविद्यालय, अकोलाचा निखिल उके व वेदांत ठाकरे, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोलाचा हर्ष कनोजिया, गुलामनबी आझाद महाविद्यालय, बार्शीटाकळीचा रेवित शिरसाट, नथमल गोयनका विधी महाविद्यालय, अकोलाचा क्रिष्णा बागेरे, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा बिशाल कामी आणि प्रो. राम मेघे इन्स्टिटुट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, बडनेराचा यश सरनिक याचा समावेश आहे. निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू, प्र-कुलगुरू,कुलसचिव यांनी अभिनंदन केले आहे.

## निधन



### रामरावजी इंगळे

**शिरजगांव बंड**-येथील माझी सरपंच्या श्रीमती शिल्पा धिरज इंगळे यांचे सासरे रामरावजी आकारामजी इंगळे रा. यांचे आज सकाळी १० वा. वयाच्या (८७ वर्षी) निधन झाले. त्यांच्या मागे २ मुले, २ मुली नातवंड असा बराच मोठा परिवार आहे.

### रामभाऊ कुलट



**अमरावती**- प्रतिभा साहित्य संघाचे संस्थापक अध्यक्ष विठ्ठल कुलट यांचे वडील रामभाऊ सूर्यभान कुलट यांचे १६ फेब्रुवारी रोजी पहाटे ५ वाजता वृद्धपकाळाने वयाच्या ९० व्यावर्षी निधन झाले. त्यांच्या पच्छात विठ्ठल, व पांडुरंग, ही दोन मुले असून मुली, सुना, नातवंड असा बराच मोठा मोठा आप्तपरिवार ते सोडून गेले. पुंडा येथिल त्यांच्या शेत शिवारात त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आला.यावेळी त्यांचे संपूर्ण नातेवाईक, त्यांचे चाहते वर्ग व गावातील मंडळी उपस्थित होती.

# तालुक्यात एकाच दिवशी तब्बल ३५०० जात प्रमाणपत्रांचे वाटप

## ११२ गावांना दिलासा,आदिवासी बांधवांची धावपळ थांबली, विद्यार्थ्यांना मोठा आधार



**धारणी/वार्ताहर**

डोंगर-दऱ्यांनी वेढलेल्या, अतिदुर्गम मेळघाट परिसर भागात प्रशासनाने अभूतपूर्व उपक्रम राबवत एकाच दिवशी तब्बल ३५०० जात प्रमाणपत्रांचे विनामूल्य वाटप केले. धारणी तालुक्यातील ११२ गावांतील लाभार्थ्यांना या विशेष मोहिमेअंतर्गत प्रमाणपत्रे देण्यात आली. दुर्गम भागातील नागरिकांना कागदपत्रांसाठी तहसील कार्यालयाचे वारंवार फेरे मारावे लागू नयेत, शासन सेवा त्यांच्या दारी पोहोचाव्यात, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

**दोन महिन्यांपासून नियोजन**

महाराष्ट्राचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हाधिकारी मा. आशीष येरेकर आणि सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी मा. सिद्धार्थ शुक्ला यांच्या सहकार्याने तहसील कार्यालय धारणीने मागील दोन महिन्यांपासून विशेष मोहीम राबवली.ग्राम- महसूल अधिकाऱ्यांनी गावागावांत जाऊन अर्ज स्वीकृत केले. अर्जांची छाननी, कागदपत्रांची पूर्तता आणि नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून एकाच दिवशी प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले

**विद्यार्थ्यांसाठी उपयोगी ठरला**

मेळघाटातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक प्रवेश, शिष्यवृत्ती, नोकरी व विविध शासकीय योजनांसाठी जात प्रमाणपत्र अत्यावश्यक असते. प्रशासनाच्या या पुढाकारामुळे विद्यार्थ्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाचले असून संपूर्ण भागात समाधानाचे वातावरण आहे.

‘शासन तुमच्या दारी’चा प्रत्यय

मेळघाट भागातील आदिवासी समाजासाठी हा उपक्रम केवळ प्रमाणपत्र वाटप नसून शासन खऱ्या अर्थाने त्यांच्या दारी पोहोचल्याची जाणीव करून देणारा ठरला आहे.धारणी तालुक्यातील हा उपक्रम राज्यातील इतर दुर्गम भागांसाठी आदर्श ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मेळघाटासारख्या दुर्गम भागात शासन सेवा प्रत्यक्ष नागरिकांच्या दारी पोहोचवणे हे आमचे प्राधान्य आहे. दोन महिन्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांनंतर ११२ गावांतील ३५०० लाभार्थ्यांना एकाच दिवशी जात प्रमाणपत्रे देणे शक्य झाले. कोणतेही शुल्क न आकारता पारदर्शक आणि ऑनलाइन पद्धतीने ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. पुढेही अशा लोकाभिमुख उपक्रमांना प्राधान्य दिले जाईल.’

**प्रदीप शेवाळे**
तहसीलदार, धारणी

# श्रीराम हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापनाचे धडे



**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अमरावती (जिल्हाधिकारी कार्यालय) यांच्या वतीने ‘शाळा सुरक्षा कृती’ कार्यक्रमांतर्गत श्रीराम हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, टाकरखेडा शंभू येथे ‘शाळा सुरक्षा कृती’ व आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत मास्टर ट्रेनर आपदा मित्र कौस्तुभ वैद्य, सचिन धरमकर, आकाश निमकर व सुमित बांबल यांनी विद्यार्थ्यांना महापूर, रस्ते अपघात, आग, भूकंप आदी विविध प्रकारच्या आपत्तींबाबत सविस्तर माहिती दिली. आपत्तीच्या वेळी स्वतःची काळजी कशी घ्यावी, सुरक्षितता उपाययोजना कशा कराव्यात तसेच योग्य प्रकारे व्यवस्थापन कसे करावे याबाबत मार्गदर्शन करत प्रात्यक्षिके व सादरीकरणही करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शिक्षिका सविता बेलसरे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य उमेश सोलव व शैलेश डहाके उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रशांत मालवे यांनी केले.या कार्यशाळेला शिक्षक सुनील प्रांजळे, संतोष देशमुख, संगीता लोहेकर, रीता धनैया, अतुल घुरडे, शिक्षकेतर कर्मचारी दीपक हंबर्डे तसेच विद्यार्थी संख्येने उपस्थित होते.

# संडेज ऑन सायकल’ अभियानांतर्गत झुंबा व योग कार्यक्रम

**अमरावती** - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागाच्यावतीने ‘फिट इंडिया-संडेज ऑन सायकल’ अभियानांतर्गत झुंबा व योग कार्यक्रम मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. नागरिक तसेच विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक सुदृढता, जागरुकता निर्माण व्हावी, नियमित व्यायामाची सवय लागावी, या उद्देशाने सदर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विविध विभागांतील विद्यार्थी तसेच मॉर्निंग वॉकर्स मोठया संख्येने सहभागी झाले होते.सहभागी विद्यार्थी व मॉर्निंग वॉकला आलेल्या नागरिकांनी उपक्रमाचे कौतुक करीत अशा आरोग्यवर्धक उपक्रमांचे सातत्याने आयोजन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

**महसुल व वन विभाग महाराष्ट्र शासन**

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, दर्यापुर**

क्रमांक/प्रस्तु-1/कावि/866/2025 दिनांक: 09/12/2025

**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीस द्वारे सर्वत्र लोकांना कळिवण्यात येते कि, अर्जदार चंद्रकांत केशवराव देशमुख रा. अमरावती ता. जि. अमरावती यांनी मौजा भामोद येथील शेत गट क्रमांक 382 क्षेत्र 2.28 हे. आर व पोटखराब क्षेत्र 0.18 हे. आर. गट क्रमांक 212 क्षेत्र 6.65 हे. आर व गट क्रमांक 133 क्षेत्र 3.13 हे. आर या शेतजमीनीचे वहीवाट नाना त्रंबकराव देशमुख यांचा दि.15/12/2014 रोजी मृत्यु झाला असुन त्यांचे वारस 1. सुहास केशवराव देशमुख 2. लक्ष्मीबाई गुणवंतराव देशमुख 3. प्रेरणा प्रभाकर देशमुख 4. चंद्रकांत केशवराव देशमुख यांचे नावाची नोंद होणे बाबत विनंती अर्ज कार्यालयात प्राप्त झाला आहे.

त्यामुळे अर्जदारांनी दिलेल्या अर्जावरुन जाहीरनामा प्रसिध्द करण्यात येत आहे. मौजा भामोद येथील शेत गट क्रमांक 382 क्षेत्र 2.28 हे. आर व पोटखराब क्षेत्र 0.18 हे. आर, गट क्रमांक 212 क्षेत्र 6.65 हे. आर व गट क्रमांक 133 क्षेत्र 3.13 हे. आर या शेतजमीनीचे वहीवाट नाना त्रंबकराव देशमुख यांचा दि.15/12/2014 रोजी मृत्यु झाला असुन त्यांचे वारस 1. सुहास केशवराव देशमुख 2. लक्ष्मीबाई गुणवंतराव देशमुख 3. प्रेरणा प्रभाकर देशमुख 4. चंद्रकांत केशवराव देशमुख यांचे नावाची नोंद होणे बाबत जर कोणाची हरकत किंवा अक्षेप अथवा तक्रार असल्यास अथवा प्रकरणात काही म्हणावयाचे असेल तर त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन 07 दिवसाच्या आत स्वत: अथवा आपल्या अधिवक्ता मार्फत लेखी म्हणने सादर करावेत अन्यथा 07 दिवसा नंतर जर कोणाची हरकत किंवा अक्षेप अथवा तक्रार प्राप्त झाल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच प्रकरणात कोणालाही काही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्यात येईल.

तहसिलदार
दर्यापूर

# डॉ.राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे चार दिवसीय कौशल्य विकास कार्यशाळा



**अमरावती/क्रा.प्र.**

डॉ. राजेंद्र गोड़े इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, अमरावती येथे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सहकार्याने महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास कक्ष व प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल यांच्या संयुक्त विद्यमाने अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी चार दिवसीय कौशल्य विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा संस्थेचे अध्यक्ष योगेंद्रजी गोड़े साहेब यांच्या प्रेरणेतून तसेच सचिव तन्वी गोड़े यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. पी. व्ही. बुराकले यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.कार्यशाळेचे उद्घाटन प्रा. डॉ. पी. व्ही. बुराकले यांच्या अध्यक्षतेखाली तसेच डॉ. रोहित गुप्ता (उद्घाटक) यांच्या हस्ते झाले. उद्घाटनप्रसंगी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात आणि करिअर घडणीत सॉफ्ट स्किल्सचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.कार्यशाळेच्या पहिल्या दिवशी प्रा. राधिका देशमुख यांनी ‘प्रेरणा’ व ‘ध्येय निर्धारण’ या विषयांवर प्रभावी व्याख्याने दिली. दुसऱ्या दिवशी प्रा. क्षितिज शहा यांनी वाचिक व अवाचिक संवाद तसेच चारित्र्य, नीती व नैतिक मूल्ये या विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तिसऱ्या दिवशी प्रा. आशीष कोकाटे यांनी रेझ्युमे लेखन व मुलाखत कौशल्य या विषयांवर उपयुक्त माहिती दिली. कार्यशाळेच्या अंतिम दिवशी डॉ. नमिता अवस्थी यांनी सादरीकरण कौशल्य, वेळ व्यवस्थापन व गटचर्चा या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले.कार्यशाळेचा समारोप कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यशाळेतील अनुभव व्यक्त करत हा उपक्रम व्यक्तिमत्त्व विकास व रोजगाराभिमुख तयारीसाठी अत्यंत उपयुक्त ठरल्याचे नमूद केले.या कार्यशाळेचे समन्वयक डॉ. प्रशांत अजमिरे होते, तर विद्यार्थी विकास समन्वयक प्रा. प्रणाली चांदूरकर यांनी यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले. संस्थेचे प्राचार्य, प्राध्यापकवर्ग तसेच विद्यार्थी विकास कक्ष व प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल यांच्या सहकार्यामुळे हा उपक्रम यशस्वी ठरला.

# आदिवासी शेतकऱ्यावर वाघाचा हल्ला

## चिखलदरा तालुक्यातील रेट्याखेडा येथील घटना

**चिखलदरा/प्रतिनिधीः-** रात्री पत्नी सोबत शेतात गेलेल्या शेतकऱ्यावर वाघाने अचानक हल्ला केल्याची घटना सोमवारीं रात्री तालुक्यातील रेट्याखेडा गावात समोर आली आहे. यामुळे गावात खळबळ उडाली आहे. मुन्ना झापू जामुनकर (वय ४५) असे जखमी शेतकऱ्याचे नाव आहे. चिखलदरा येथे प्राथमिक उपचारानंतर त्याला अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. जिथे त्याच्यावर उपचार सुरू आहे.



माहितीनुसार रायपूर ते रेट्याखेडा गावातील कोर क्षेत्रामध्ये घनदाट जंगलामध्ये मुन्ना झापू जामुनकर यांचे शेत आहे. नेहमीप्रमाणे सोमवारी सायंकाळी सात वाजता मुन्ना जामुनकर पत्नीसोबत शेतात गेले होते. मुन्नाला शेताजवळ म्हशीवर कुत्र्याच्या आवाज आला. यामुळे त्याने टॉर्च मारला तर त्याला वाघ दिसला. या वाघाने अचानक त्यांच्यावर हल्ला केला. वाघाला पाहून पत्नीने आरडाओरडा केला. आणि गावकऱ्यांना बोलावले. नागरिकांचा आवाज एकूण वाघ जंगलाकडे पळाला. दरम्यान वाघाच्या हल्ल्यात मुन्ना जामुनकर गंभीर जखमी झाले होते. त्यांना तात्काळ प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले आणि तेथून जिल्हा सामान रुग्णालयात रेफर केले. वाघाने त्यांच्या पायावर हातावर आणि डोक्यावर हल्ला केला होता. यामध्ये ते गंभीर जखमी (पान २ वर)

## इंस्टाग्रामवरील 'ट्रेडिंग' आमिष
# ६ लाखांची फसवणूक

**अमरावती/प्रतिनिधीः-** सोशल मीडियावरील आकर्षक गुंतवणूक जाहिरातींच्या जाळ्यात अडकून शहरातील एका युवकाची तब्बल सहा लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. शेअर मार्केटमध्ये हमखास नफा व सुरक्षित परताव्याचे आश्वासन देत ही रक्कम उकळण्यात आली. या प्रकरणी शहर सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, नवाथे प्लॉट परिसरातील युवराज रूपराव खोडस्कर (वय ४०) हे खाजगी नोकरी करतात. ते अधूनमधून शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करीत असल्याने ७ ऑक्टोबर २०२५ रोजी इंस्टाग्रामवर दिसलेल्या 'ट्रेडिंगरायझर' नावाच्या ऑनलाईन ट्रेडिंग कंपनीच्या जाहिरातीवर त्यांनी विश्वास ठेवला. संबंधित लिंकवर क्लिक करून त्यांनी आपला मोबाईल क्रमांक व इतर माहिती नोंदवली. दोन दिवसांनी 'तेजस शुक्ला, अंधेरी (मुंबई) येथील ट्रेडिंगरायझर कंपनी' अशी ओळख सांगणाऱ्या व्यक्तीने त्यांच्याशी संपर्क साधला. मोठा परतावा आणि कमी जोखीम असल्याचे सांगत एक विशेष (पान २ वर)

# पंचवटी ते कांता नगर मार्गावर पाईपलाईन फुटली

## लाखों लिटर पाणी वाया



**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक पंचवटी ते कांता नगर मार्गावर मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहासमोर सोमवारी मध्यरात्री मजीप्राची पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन फुटल्याने लाखों लिटर पाणी वाया गेले तसेच संपूर्ण रस्ता जलमय झाला होता. परिसराला तलावाचे स्वरूप आले होते. यामुळे अमरावती शहर सह बडनेराची जलपूर्ती बाधित झाली होती.

माहितीनुसार शहराला पाणीपुरवठा करणारी मजीप्राची पाईपलाईन सोमवारीं रात्री पंचवटी ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत जाणाऱ्या मार्गावर दोन ठिकाणी फुटल्याने लांब अंतरापर्यंत पाण्याचा जोरदार प्रवाह वाहत होता. पीडीएमसी मुलींच्या वसतीगृहासमोर रस्त्यावर पाणीच पाणी साचल्याने विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. काही वेळातच परिसर तलाव सदृश्य दिसू लागला. पाणी साचल्याने वाहतुकीवर परिणाम झाला होता. नागरिकांना मोठ्या अडचणीचा सामना (पान २ वर)

# शासकीय योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवा -खासदार बळवंत वानखडे

**अमरावती/प्रतिनिधीः-** केंद्र शासनाच्या वतीने सर्व सामान्य नागरिकांच्या हितासाठी विविध योजना राबविण्यात येतात. जिल्ह्यात प्रामुख्याने मेळघाटातील आदिवासी भागातील जनतेचे जीव सुकर व्हावे, यासाठी त्यांच्यासाठी असलेल्या शासकीय योजनांचा लाभ विनाव्यत्यय देण्यात यावा, असे निर्देश खासदार बळवंत वानखडे यांनी दिले.

जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची सभा खासदार वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी आमदार गजानन लवटे, प्रविण तायडे, महापौर श्रीचंद तेजवाणी, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मनपा आयुक्त सौम्या शर्मा,



मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, परीविक्षाधिन अधिकारी कौशल्या एम., अशासकीय सदस्य मोरेश्वर वानखडे, जिल्हा विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रिती देशमुख यांच्यासह नगरपालिकेचे अध्यक्ष उपस्थित होते.

खासदार वानखडे म्हणाले, महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतील कंत्राटी कर्मचारी संपावरून परत आले आहे. त्यामुळे येत्या काळात कामावरील मजूर परत येतील, याची काळजी घ्यावी. मेळघाटात होळी हा सण महत्त्वाचा असल्याने मजूरी वेळेवर करण्यात यावेत. धारणी परिसरातील मका खरेदीची रक्कम शेतकऱ्यांच्या हाती पडावी, यासाठी प्रयत्न करावेत. यासोबतच मेळघाटातील रस्ते, पाणीपुरवठा, वीज, (पान २ वर)

# दहेंड्यात 'बोकड्यांचा शंकरपट' महाराष्ट्रात प्रथमच अनोखी शर्यत

**मेळघाटातील यात्रेत नवा इतिहास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

**धारणी/प्रतिनिधीः-** मेळघाटातील धारणी तालुक्यातील दहेंडा येथे महाशिवरात्री निमित्त भरलेल्या पारंपरिक यात्रेत यंदा एक अनोखा इतिहास घडला. बैलांच्या पारंपरिक शंकरपटाऐवजी प्रथमच 'बोकड्यांचा शंकरपट' आयोजित करण्यात आला. महाराष्ट्रातच नव्हे तर देशात प्रथमच असा प्रयोग झाल्याचा दावा आयोजकांनी केला असून, या नाविन्यपूर्ण उपक्रमाने यात्रेला वेगळीच रंगत आली.



परंपरेनुसार शंकरपटमध्ये बैल आणि छकड्यांची सांगड घालून शर्यत घेतली जाते. मात्र दहेंड्यात यंदा बैलांऐवजी बोकडं आणि लहान छकडे जोडून धाव शर्यतीचे आयोजन करण्यात आले. सुरुवातीपासूनच या स्पर्धेबाबत ग्रामस्थांमध्ये उत्सुकता होती. शर्यत सुरू होताच उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट करत स्पर्धकांना दाद दिली. संपूर्ण मैदानात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते.या रोमांचक स्पर्धेत खाऱ्याटेंबरु येथील बोकड्यांनी (पान २ वर)

# शेतात महिलेवर अत्याचार; आरोपीस १० वर्षांची सक्तमजुरी

**अमरावती/प्रतिनिधीः-** बोरगाव धर्माळे परिसरात शेतात वास्तव्यास असलेल्या तरुणीवर बळजबरीने लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आरोपीस १० वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश (क्र. ३) यशवंत आनंद गोस्वामी यांच्या न्यायालयाने मंगळवारी (दि. १७) हा निकाल जाहीर केला. जिवनु रिमकलाल धुर्वे (वय ३७, रा. धागडीया, जि. छिंदवाडा; सध्या बोरगाव धर्माळे) असे दोषी ठरविण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.



प्रकरणातील माहितीनुसार, २८ जून २०२४ रोजी २२ वर्षीय विवाहित महिला पती व लहान बाळासह शेतातील घरात राहत होती. त्यावेळी पती बाहेर गेले असताना आरोपीने घरात जबरदस्तीने प्रवेश करून महिलेला मारहाण केली व तिच्यावर अत्याचार केला. पीडितेने दिलेल्या तक्रारीवरून नांदगाव पेठ पोलिस ठाण्यात भारतीय दंड विधानाच्या कलम ३७६, ४५२ व ३२३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास अधिकारी अविद्या पुंजाजी शिरसाट यांनी या प्रकरणाचा सखोल तपास करून पुरावे संकलित केले. सरकारीं पक्षाने न्यायालयात दहा साक्षीदार तपासले. वैद्यकीय अहवाल व (पान २ वर)

# छत्रपती शिवराय सुराज्य निर्माण बाईक रॅली गुरुवारी

## बुद्ध जयंती उत्सव समितीचे आयोजन



**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उद्या गुरुवार १९ फेब्रुवारी रोजी सर्वत्र आनंदाने साजरी करण्यात येणार आहे. या निमित्य बुद्ध जयंती उत्सव समितीच्या वतीने छत्रपती शिवराय सुराज्य निर्माण बाईक रॅली भीमटेकडी ते शिवटेकडी पर्यंत काढण्यात येणार असल्याची माहिती आज मंगळवार १७ फेब्रुवारी रोजी (पान २ वर)

# विलासनगरात भरदुपारी कार ने घेतला पेट

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील विलासनगर परिसरात मंगळवारी (दि.१७) दुपारी अचानक एका कार ने पेट घेतल्याने एकच खळबळ उडाली. विकास विद्यालयाजवळ उभी असलेली कार काही क्षणांत ज्वाळांच्या विळख्यात सापडली. सुदैवाने जीवितहानी टळली; मात्र वाहन पूर्णपणे जळून खाक झाले. अंदाजे १५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले जाते.



दुपारी सुमारे २.१५ वाजता आग लागल्याची माहिती मिळताच अमरावती महानगरपालिकेच्या अग्निशमन नियंत्रण कक्षातून तात्काळ पथक रवाना करण्यात आले. पाळी प्रमुख सुनील काकडे व केंद्रप्रमुख प्रेमानंद सोनकांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली फायर (पान २ वर)

# शिवाजी नगर येथे शॉर्टसर्किटमुळे घराला आग

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरातील शिवाजी नगर परिसरात पद्माकर नानासाहेब सांगोले यांच्या राहत्या घराला शॉर्टसर्किटमुळे अचानक आग लागली. ही घटना समजताच परिसरात एकच खळबळ उडाली. नागरिकांनी तत्काळ धाव घेऊन आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. आगीमुळे घरातील घरगुती साहित्याचे मोठ्या प्रमाणात नूकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. स्थानिक नागरिकांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली व मदतकार्य केले. यावेळी महेंद्र भांडे, अस्लम मन्सूरी, अनिकेत पडोळे, यश शर्मा, तुषार काळे, दर्शन (पान २ वर)



# मेघे लेआउट परिसरात १.९८ लाखांची घरफोडी

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील वृदान कॉलनी, मेघे लेआउट परिसरात बंद घरावर चोरट्यांनी डल्ला मारत जवळपास १ लाख ९८ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी गाडगेनगर पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.



मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी अतुल उदयकुमार राऊत (वय ५१) हे १४ फेब्रुवारी रोजी सकाळी बाहेरगावी गेले होते. १५ फेब्रुवारी रोजी रात्रीपर्यंत घर बंद होते. या कालावधीत अज्ञात चोरट्यांनी संधी साधून घरात प्रवेश केला. दरम्यान, परिसरातील काही शेजाऱ्यांना संशयास्पद हालचाल दिसल्याने त्यांनी राऊत यांना दूरध्वनीवर माहिती दिली. घराची पाहणी केल्यानंतर (पान २ वर)


# रुग्णालयातून अल्पवयीन मुलगी गायब

**अमरावती/प्रतिनिधीः-** राजापेठ पोलिस ठाण्यातंर्गत एका खाजगी रुग्णालयात भाचीच्या उपचारासाठी आलेल्या महिलेची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी गायब झाल्याची घटना समोर आली आहे. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. माहिती नुसार बैलहरपुर निवासी पन्नास वर्षीय महिला आपल्या दोन महिन्याच्या भाचीची प्रकृती बरी नसल्याने तिला राजापेठ ठाणे क्षेत्रातील एका खाजगी रुग्णालयात १४ फेब्रुवारी रोजी सकाळी घेऊन आली होती. तिच्या सोबत तिची १७ वर्षाची अल्पवयीन मुलगीही होती. आई आणि मुलगी रुग्णालयात भाची सोबत थांबल्या होता. रविवारी रात्री ८.३० वाजता सुमारास १७ वर्षीय अल्पवयीन अचानक बेपत्ता झाली. आईने तिचा सर्वत्र शोध घेतला पण ती मिळाली नाही. मुलीला कोणीतरी फूस लावून पळून घेऊन गेले अशी तक्रार आईने राजापेठ ठाण्यात दिली आहे. पोलिसांनी कलम १३७ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.पुढील तपास सुरू आहे.

# बेनोडामध्ये पिसाळलेल्या श्वानाचा थैमान

## एकाच दिवशी सहा जणांना चावा

**बेनोडा/प्रतिनिधीः-** मोर्शी तालुक्यातील बेनोडा (शहीद) येथे सोमवारी (दि.१६) सकाळी एका पिसाळलेल्या श्वानाने सहा जणांना चावा घेतल्याची घटना घडली. सकाळी ६ ते १० वाजण्याच्या दरम्यान हा प्रकार घडला. त्यामुळे गावात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.



जखमींमध्ये कमलेश कवडेती (वय १२), मयूर कोहरे (वय ५), पूजा खसारे (वय २७), निकेश निळकंठे (वय ३०), मनुबाई फरकाडे (वय ४८) आणि राजेंद्र बारमासे (वय ४५) यांचा समावेश आहे. लहान मुलांसह (पान २ वर)

# श्री दिगंबर जैन सिद्धक्षेत्र मुक्तागिरी येथे जैनेश्वरी दीक्षा कार्यक्रम

## विदर्भात पहिलेच आयोजन

**अचलपूर/प्रतिनिधीः-** श्री दिगंबर जैन सिद्ध क्षेत्र मुक्तागिरी येथे १६ फेब्रुवारी सोमवार पासून १९ फेब्रुवारी गुरुवारपर्यंत भव्य जैनेश्वरी दीक्षा समारोचे आयोजन करण्यात आले आहे . यामध्ये विद्या शिरोमणी आचार्य श्री १०८ समय सागर जी महाराज जी यांच्या प्रमुख उपस्थितीत या समारोह चे आयोजन करण्यात आले आहे.



यामध्ये विविध मांगलिक कार्यक्रमाचे आयोजन केल्याची माहिती १७ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध सिद्ध क्षेत्र मुक्तागिरी येथे संपन्न झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये अध्यक्ष अतुल कळमकर, अनुप गांधी , आशुतोष झोहरापूर आणि शशांक चवरे यांनी दिली.

श्री दिगंबर जैन सिद्ध क्षेत्र मुक्तागिरीचे अध्यक्ष अतुल कळमकर यांनी पत्रकार परिषदेत माहिती (पान २ वर)

# महामार्ग ओलांडणाऱ्या वृद्धेला दुचाकीची धडक

## -तिवसा बसस्थानका समोरील घटना

**तिवसा/प्रतिनिधीः-** राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या तिवसा बस स्थानकासमोरून महामार्ग ओलांडणाऱ्या ८० वर्षीय वृद्ध महिलेला अचानक दुचाकीने धडक दिली.ही घटना आज (दि.१७) सकाळी १०:३०वाजता दरम्यान घडली. यात वृद्ध महिलेच्या डोक्याला दुखापत झाली असून त्यांच्यावर तिवसा उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहे.





नाणीबाई आकाराम मुन्द्रे,रा. वणी ममदापुर असे गंभीर जखमी वृध्द महिलेचे नाव आहे तर देवेष दिनेशराव इंगोले(वय २५.रा.वणी ममदापुर) असे गंभीर जखमी (पान २ वर)

## प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट येथे
# 'एन्जॉय २०२६' सांस्कृतिक महोत्सव

## -समीर चौगुले व प्रियंदर्शनी इंदलकर प्रमुख अतिथी

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक विदर्भ युथ वेलफेयर सोसायटी द्वारा संचालित प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट येथे आयोजित वार्षिक सांस्कृतिक महोत्सव 'एन्जॉय २०२६' यंदा अधिक भव्य स्वरूपात साजरा होत आहे. मराठी सिनेसृष्टीतील लोकप्रिय अभिनेते समीर चौगुले व अभिनेत्री प्रियंदर्शनी इंदलकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. यांच्या उपस्थितीमुळे यंदाचा महोत्सव अधिकच आकर्षक व उत्साहपूर्ण ठरणार आहे.

विद्यार्थ्यांच्या कला, सर्जनशीलता आणि सांस्कृतिक कौशल्यांना व्यासपीठ देणारा 'एन्जॉय २०२६' महोत्सव विविध रंगतदार कार्यक्रमांनी नटलेला असून, युवा ऊर्जेचा उत्स्फूर्त आविष्कार या निमित्ताने अनुभवायला मिळणार आहे.

या कार्यक्रमास विदर्भ युथ वेलफेयर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख (पान २ वर)